म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3436

आकलन

बाबुराव गायकवांड



REFBK-0026938

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

संदर्भ
3936
ग्रंथ २६६३८
163



आकलन

डॉ. बाबुराव गायकवाड

REFBK-0026938

प्रचार प्रकाशन
कोल्हापूर

प्रकाशन क्रमांक / १८४

प्रकाशक
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब प्लॉट नं. ४/अ
नलवडे कॉलनी
सम्राटनगर, सागरमाळ
कोल्हापूर – ४१६ ००८
फोन – २०६६८

© सौ. सुमन गायकवाड
प्राध्यापक निवास
कर्नाटक विद्यापीठ
धारवाड ५८० ००३

प्रमुख वितरक
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
१३ ई, महालक्ष्मी चेंबर्स
सेंट्रल एस. टी. स्टॅण्डसमोर
कोल्हापूर ४१६ ००१

मुद्रक
हरीश विनायक चौधरी
अंजीश कमर्शियल आर्ट प्रिंटर्स
६६९ ई, शाहूपुरी ३ री गल्ली
कोल्हापूर ४१६ ००१

मुखपृष्ठ
अनंत खासबारदार
४२, सदानंदी, सन्मित्र सोसायटी
राजारामपुरी, कोल्हापूर ४१६ ००८

प्रथम आवृत्ती
ऑगस्ट, १९९२

मूल्य रु. ४० फक्त

आकलन Aakalana

डॉ. बाबुराव गायकवाड Dr. Baburao Gaikwad

वाङ्मयाच्या अभ्यासकांना ...

मनोगत

' दृष्टिक्षेप 'नंतरचे ' आकलन ' हे माझे समीक्षेचे दुसरे पुस्तक प्रसिद्ध होताना मला आनंद वाटतो.

आदरणीय गुरुवर्य डॉ. गो. मा. पवार, प्रा. गो. म. कुलकर्णी, प्रा. केशव मेश्राम, डॉ. सुधीर रसाळ, डॉ. प्रल्हाद वडेर, डॉ. ल. रा. नसिराबादकर, डॉ. आनंद यादव, डॉ. सरोजिनी वैद्य, इ.च्या समीक्षालेखनाने मला सुजाण मार्ग दिला, एखाद्या कलाकृतीचे वस्तुनिष्ठपणे आकलन करायला शिकविले. त्यातही मी माझी आस्वादकाची भूमिका कायम ठेवून कलाकृतीचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या पुस्तकातील बहुतेक लेख सभा, संमेलने व चर्चासत्रे इ.च्या निमित्ताने लिहिले गेलेले आहेत. हे लेखन पुस्तकरूपाने येण्यासाठी यातील काही लेखांचा विस्तार करावा लागलेला आहे. या पुस्तकातील विचारांचे मूल्यमापन वाचकांनीच करावयाचे आहे. पुस्तकाच्या निमित्ताने विचारमंथन व्हावे ही इच्छा. पुनर्लेखनाच्या वेळी सर्वश्री. डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. सोमनाथ कोमरपंत, डॉ. विश्वनाथ शिंदे, प्रा. सुखराम हिवराळे, डॉ. बा. घों. रामपुरे, प्रा. विष्णू वासमकर, प्रा. राजन गवस, इ. मित्रांचे व माझी पत्नी सौ. सुमन गायकवाड हिचेही मौलिक सहकार्य लाभले.

प्रचार प्रकाशनच्या संचालिका सौ. नंदिनी गवळी यानी आस्थेने पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी पार पाडली. प्राचार्य भाऊसाहेब गवळी यांचा प्रेमळ सहवास हा तर एक सुखाचा ठेवाच. या पुस्तकाच्या निमित्ताने या सर्वांनी जे प्रेम दिले, त्या सर्वांचा मी आभारी आहे. या पुस्तकाचे मुद्रण सुबक केल्याबद्दल अंजीश कर्मशियल आर्ट प्रिंटर्सचे चालक व कर्मचारी यांचेही आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

डॉ. बाबुराव गायकवाड
मराठी विभाग
कर्नाटक विद्यापीठ, धारवाड

दि. १० जुलै, १९९२



१

दलित आत्मकथन : एक दृष्टिक्षेप

दलित काव्यानंतर आत्मकथनाचे दालन समृद्ध होत असलेले दिसते. आतापर्यंत वीस–बावीस आत्मकथने प्रसिद्ध झालेली आहेत. मराठीतील आत्मचरित्र वाङ्मय व दलित आत्मकथन वाङ्मय सारखे नसले तरी त्यांची वैशिष्ट्ये काही बाबतीत समान आहेत. दोन्हींमधील महत्त्वाचा फरक ' दलित आत्मकथन : निमित्त ' या प्रास्ताविकात संपादकद्वयाने चांगल्या पद्धतीने सांगितला आहे. काही अपवाद वगळता आत्मचरित्राचे लेखन जीवनाच्या उतारवयात झालेले दिसून येते. तोपर्यंत ही मंडळी जीवनातील भलेबुरे प्रसंग पचवून पैलतीराकडे नेत्र लावून बसलेली असतात. जीवनातील अनेक प्रसंगांचे तोपर्यंत विस्मरण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. अनेक बाबतींतले दुःखही बोथट होण्याची शक्यता असते. रिकामपणीची कामगिरी किंवा उद्‌बोधन म्हणूनही लेखन सुरू होते. काळजात सलणारे दुःख व्यक्त करण्यासाठी हे लेखन झालेले असेल, असे म्हणता यावयाचे नाही.

जातीयतेच्या पाशवी कोंडीत ' फुटो पाहे प्राण ' यामुळे दलित आत्मकथनाचे लेखन सुरू झाले आहे. दलितांच्या बाबतीत हे दुःख त्यांच्या जन्मापासूनच सुरू होते. दलित म्हणून जन्मच घेणेच येथे गुन्हा होतो. त्याच्या जातीमुळेच त्याच्या पुढील जीवनाची होरपळ अटळ झालेली आहे. मराठी वाङ्मयात जितकी आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत, त्यांतील आत्मचरित्र नायकांना ते ज्या जातीत जन्माला आले आहेत, त्याबद्दल दुःख वाटत नाही. त्यांनी तशा जाणिवा कुठे चित्रित केलेल्या

आढळून येत नाहीत. मनुष्य म्हणून वाट्याला आलेले सुखदुःखाचे अनुभव मांडण्याचाच प्रयत्न त्यांनी केलेला आहे. मानवी जीवनातील सर्वसामान्य दुःखाचा वाटेकरी दलित व्यक्ती तर आहेच; पण दलित जीवनाचा, आत्मकथनाचा 'जात' हा एक प्रमुख क्लेशकारक घटक असल्यामुळे येथूनच दलितांच्या दुःखाची खेदपूर्ण व्यथा सुरू होते,

सुशिक्षित होऊन दलितांना आपले दारिद्र्य दूर करता येते, आचारविचार व राहणीमान बदलता येते; पण बाजूस सारू म्हटले तरी 'जात' सारता येत नाही, याची खंत बऱ्याच आत्मकथनांतून व्यक्त झालेली आहे. 'आता जो जातीचा ठिपका पुशीन म्हणत होतो, तो गडद झाला होता.' [१] तसेच 'दुष्काळात घावलेल्या बाया, आमची जात समजल्यावर काहीतरी निमित्त काढून धुण्याभांड्याची कामं सोडून पळून जात, किंवा मुले वरच्या मजल्यावरून खेळून आली की जिन्यात वरच्या माणसाने बादलीने पाणी टाकले.' [२] ही जातीमुळे शंकरराव खरातांसारख्या विद्याविभूषित व सन्माननीय व्यक्तीला अशी अपमानास्पद दिलेली वर्तणूक सहन करावी लागते.

बहुतेक मराठी आत्मचरित्रकारांचे लेखन हिंदुसंस्कार–प्रभाव घेऊनच झालेले दिसून येते; पण दलित आत्मकथनाच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रेरणादायी ठरलेले आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानामुळे दलितांमध्ये नवे आत्मभान निर्माण झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानीही आत्मकथन केले आहे. त्यांचे संपूर्ण जीवनच दलितांना एक दीपस्तंभ आहे; म्हणूनच मोठ्या प्रमाणात दलित आत्मकथने लिहिली जात आहेत.

दलितांतील निरनिराळ्या जातिजमातींतून ही आत्मकथनं लिहिली जात आहेत, ही बाब विशेष महत्त्वाची वाटते. 'बलुतं' (दया पवार), 'मु. पो.: देवाचे गोठणे' (माधव कोंडविलकर), 'उपरा' (लक्ष्मण माने), 'गवाळ' (दादा मल्हारी मोरे), 'ऐरणीच्या घणा' (वैजनाथ कळसे), 'काटचावरची पोटं' (उत्तम बंडू तुपे) ही अनुक्रमे महार, चांभार, कैकाडी, पिंगळा / कुडमुडे जोशी, लोहार व मांग या दलितांतर्गत जातिजमातींतील व्यक्तींची आत्मकथनं आहेत.

मानवमुक्तीच्या लढ्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी हाक दिल्यानंतर सर्वांत पुढाकार घेतलेला महार समाज आज सर्वच क्षेत्रांत (इतर दलितांपेक्षा) आघाडीवर आहे. साहित्याच्या क्षेत्रात काही अपवाद वगळले, तर हाच समाज आगेकूच करताना दिसतो. आत्मकथन हा साहित्यप्रकारही याला अपवाद नाही. जवळजवळ बारा आत्मकथनं या समाजातून उदयाला आली आहेत. 'आठवणींचे

पक्षी ' (प्र. ई. सोनकांबळे), ' तराळ–अंतराळ ' (शंकरराव खरात), ' फांजर ' (ना. सं. झोडगे), ' आभरान ' (पार्थ पोळके), ' अक्करमाशी ' (शरणकुमार लिंबाळे), ' गावकी ' (रुस्तुम अचलखांब), ' कुस्ती ' (विजय सिरसट), ' अंतःस्फोट ' (कुमुद पावडे), ' माझ्या जल्माची चित्तरकथा ' (शांताबाई कांबळे), ' जिणं आमुचं ' (बेबी कांबळे), ' हाडकी हडवळा ' (नामदेव ढसाळ), ' अजून उजाडायचं आहे ' (माधव कोंडविलकर), ' हकीकत आणि जटायू ' (केशव मेश्राम) या पुस्तकांचे स्वरूप कादंबरीसारखे आहे; पण त्यात आत्मानुभवाचे बोल आहेत. काहींनी अशा लेखनाला आत्मपर लेखन तर ' Auto Novel ' असेही म्हटले आहे. कादंबरीलेखनात वास्तवतेला कल्पनेचा साज चढलेला अमान्य करता येत नाही. तेव्हा अशा लेखनात निखळ आत्मपर लेखन घडणे अशक्य, हे येथे नोंदवावेसे वाटते.

काहीशा वेगळ्या व लक्ष वेधून घेणाऱ्या आत्मकथनात ' कथा माझ्या जन्माची ' (नामदेव व्हटकर), ' मला उद्ध्वस्त व्हायचंय ' (मल्लिका अमर शेख), ' रामनगरी ' (राम नगरकर), (काही अभ्यासकांनी सदर आत्मकथनांचा उल्लेख ' दलित आत्मकथन ' असा केला आहे.), ' अक्करमाशी ' (शरणकुमार लिंबाळे) या आत्मकथनांचा उल्लेख करावासा वाटतो.

मल्लिका अमर शेख या मातृसंबंधाने ब्राह्मण, वडिलांकडून मुसलमान आणि नामदेवराव ढसाळांशी लग्न झाल्यामुळे महार / नवबौद्ध गणल्या जाण्याचा संभव आहे. नामदेव ढसाळ हा दलित चळवळीचा आघाडीवरचा नेता. तापट व बंडखोर वृत्तीचा. त्याच्या जीवनाचा धर्मच जणू संघर्ष. अशा व्यक्तीच्या जीवनात सहधर्मचारिणी म्हणून येणाऱ्या स्त्रीच्या हातून आत्मकथन झाले नसते तरच नवल !

सदर आत्मकथनात नामदेवाचा रागीटपणा, लंपटपणा, विक्षिप्तपणा, अव्यवहारीपणा व अवाजवी पौरुष्य इ. गुणावगुणांसह नामदेवचे व्यक्तिचित्र मल्लिका अमर शेखनी व्यवस्थित रेखाटलेले आहे. लग्न केल्यामुळेच नामदेव मल्लिकेशी तिच्या अपेक्षेपेक्षा वेगळा, विचित्र वर्तन करतोय असे काही नाही. नामदेव आहे तसाच आहे. मग त्याला सर्व पुरुषवर्गाचा प्रतिनिधी कल्पून, त्याच्याशी संसार करताना आपल्या भावजीवनाची परवड झाली. यासाठी पुरुषप्रधान संस्कृतीला न्याय मागण्याचे प्रयोजन मात्र कळत नाही. नामदेवमुळे आपली आत्मकथा सनसानटी झाल्याशिवाय राहणार नाही हा सुप्त विचार मात्र हे आत्मकथन लिहिताना असावा असे वाटल्याशिवाय राहत नाही.

आईवडिलांच्या प्रेमविवाहामुळे त्यांच्या कुटुंबावर कोसळलेले दुःख किंवा स्वतःच्या विवाहानंतर नवबौद्ध म्हणून जगावे लागताना स्वकीयांकडून तसेच

परकीय लोकांकडून होणारा छळ आणि त्यामुळे एक स्त्री म्हणून झालेली मानसिक कोंडी यांचे फारसे चित्रण येत नाही. नवऱ्याच्या वर्तणुकीची लक्तरेच केवळ त्या वेशीवर टांगताना दिसतात.

दलित चळवळीने स्वीकारलेल्या बौद्ध धर्माच्या आचरणातील विसंगतीचे जे निरीक्षण त्यानी नोंदविले आहे (आशूचा वाढदिवस साजरा करण्यापूर्वीचा वाद [१]) ' दलित समाजावर धर्मांतराचा तसा काहीच परिणाम झाल्याचं जाणवत नाही. मरीआई आणि यल्लमा या देवींच्या जागी बुद्धाची मूर्ती आली, एवढाच फरक. ' [२] इ. आत्मपरीक्षण करायला लावणारे आहे. स्पष्टवक्तेपणा आणि सडेतोड वृत्तीचा या आत्मकथनातून प्रत्यय येतो, ही जमेची बाजू म्हणावी लागेल.

काहींनी ' रामनगरी 'चा अंतर्भाव दलित आत्मकथनात केला, तरी राम नगरकर स्वतःला दलित कल्पून घ्यायला तयार होतील का ? कारण ते ज्या जातीत जन्माला आले, ती जात गावगाड्यात राहते. तसेच ती स्वतःला कधीही अस्पृश्य समजत नाही. नाहीतर ' पण आम्हा महार–मांग अशाच हलक्या जातीचे केस ते कापत नाहीत ! आमचा त्यांना विटाळ होतो. ते आम्हाला शिवत नाहीत. ' [३] असं नोंदविण्याची गरज शंकरराव खरातांना पडली नसती. बारा बलुतेदारांपैकीच त्यांची जात. बलुतेदारांपैकी सुतार–कुंभार यांचीही घरे गावकुसाबाहेर नाहीत. या सर्वांचे सवर्णांशी दैनंदिन व्यवहार (बेटी व्यवहार वगळून) कसलाही भेदाभेद न करता होतात; त्यामुळे त्यांनी अस्पृश्यांच्या वाट्याला आलेली अपमानास्पद वागणूक कधी अनुभवली नाही. ते कधी दलितांचे जीवन जगलेच नाहीत; म्हणून त्यांच्या आत्मकथनाचा दलित आत्मकथनात अंतर्भाव करणे योग्य वाटत नाही. नाहीतर डॉ. सदा कऱ्हाडे यांच्या ' एका स्पृश्याची डायरी ' याचाही विचार या बाबतीत करावा लागेल. राम नगरकर किंवा सदा कऱ्हाडे हे सवर्णांपैकी आहेत; म्हणून त्यांच्या वाट्याला त्यांच्या समाजाकडून किंवा इतरांकडून उपेक्षितपणा आला नाही असा अर्थ होत नाही.

शरणकुमार लिंबाळे यांच्या ' अक्करमाशी 'मुळे नीती-अनीतीच्या कल्पना बाळगून समाजात मिरवणाऱ्यांना जबरदस्त हादरा दिला आहे. आई अस्पृश्य, बाप लिंगायत तर आई–आजीवरोवर सांभाळ करणारा ' दादा ' मुसलमान. लिंबाळेंनी कोणती जात लावावी ? कोणत्याही आत्मकथनात व्यक्त न झालेला हा अस्वस्थ करणारा जीवघेणा प्रश्न. बापाची जात मिळू शकत नाही, तर आईच्या जातीमुळे गुदमरणारे व्यक्तित्व. त्यात पडलेली दारिद्र्याची भर व ' अक्करमाशी ' म्हणून स्वकीयांकडूनही होणारी अवहेलना याचे हृदयद्रावक कथन लिंबाळे करतात. दलित साहित्यालाच नव्हे तर मराठी साहित्यालाही हा नवा अनुभव.

शंकरराव खरात व नामदेव व्हटकर वगळले तर बाकीचे आत्मकथनकार तीस–पस्तीसच्या आसपासचे आहेत. या लेखकांचा भूतकाळ त्यांच्या जगण्याशी निगडित असाच आहे. कालचा अनुभव फारसा शिळा किंवा बोथट झालेला नाही; त्यामुळे त्यांनी तो संवेदनशील मनाने जशास तसा अक्षरबद्ध केलेला आहे; त्यामुळे जात व गरिबीच्या वेदना आताही ठणकताना दिसतात. एवढ्या लहान वयातच यांना कसले आले आहेत अनुभव ? 'अनुभव काय वय विचारून येतात ? आत्मकथन लिहायला आयुष्याची लांबी काय करायचीय ? आत्मकथन हे आयुष्याच्या लांबीरुंदीवरून लिहिण्यापेक्षा त्याची खोली पाहून लिहिणं बरं नव्हे का ?' [६] हे मल्लिका अमर शेखनी दिलेले उत्तर योग्य वाटते. जीवनाचा अर्थ 'साठी' ओलांडल्याशिवाय कळत नाही, असे तर म्हणता येत नाही. जीवनानुभव मांडण्याची क्षमता व जीवनाचे वेगळेपण पाहिजे तर आपण शोधू शकतो.

हे आत्मकथनकार सर्व बाबतींत या देशातील हिंदुधर्माने नाकारलेल्या समाजाचे (अस्पृश्य) घटक आहेत. मिळालेल्या उपेक्षित जीवनाची परवड ते वाचकांपुढे धीटपणे मांडण्याचा प्रयत्न करताहेत. आपण आत्मकथन लेखन करीत आहोत, (आपल्या जीवनासंबंधी व त्यानुषंगाने आपल्या समाजाविषयीची माहिती देतो आहोत), ही जाणीव सदर लेखन करणाऱ्यांकडे आहे. (भलेही काहींना आत्मकथनाचे निकष माहीत नसतीलही.) पण दया पवार, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, शरणकुमार लिंबाळे, शंकरराव खरात, माधव कोंडविलकर, अचलखांब इ. आत्मकथनापूर्वी लेखक, कवी व नाटककारही आहेत. नाही म्हटले तरी साहित्यप्रकारांचे ज्ञान यांना असण्याची शक्यता नाकारता येत नाही; म्हणून आत्मकथनातला एखादा प्रसंग सफाईदारपणे मांडण्याकडे मनाचा कल गेला असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. शिवाय आपले व्यक्तित्व आतून–बाहेरून वाचकांसमोर ठेवीत आहोत, पण ते किती व कसे ठेवायचे ? हे त्यांच्यावरच अवलंबून असते; म्हणून काही आत्मकथनांतील प्रसंग संस्कारित केल्यासारखे वाटतात, तर काही भडक वाटतात. तरीही त्यांतील तीव्रता कमी होत नाही.

दलितांची आत्मकथनं महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेली आहेत; त्यामुळे जीवनवैचित्र्याचा व परिसराच्या वेगळेपणाचाही प्रत्यय या आत्मकथनांतून येतो; 'आठवणींचे पक्षी,' 'गावकी,' 'ऐरणीच्या घणा,' (मराठवाडा), 'मु. पो देवाचे गोठणे' (कोकण), 'बलुतं' (मुंबई व अहमदनगर), 'तराळ–अंतराळ,' 'आभरान,' 'फांजर,' 'उपरा,' 'काटचावरची पोटं,' 'कथा माझ्या जल्माची,' 'माझ्या जल्माची चित्तरकथा' (प. महाराष्ट्र), 'अक्करमाशी,' 'गबाळ' (सोलापूर), 'अंतःस्फोट' (नागपूर) या परिसरातील लोकाचार, रूढी–परंपरेचा व तेथील दलित जीवनाचा वास्तव परिचय आपणास करून देतात. त्यामुळे भाषेच्या

व अभिव्यक्तीच्या बाबतीतही वेगळेपणा आलेला दिसतो. काहींनी ग्रांथिक भाषेचा वापर केला असला, तरी एखादा प्रसंग / अनुभव त्या त्या परिसरातील त्या त्या समाजाच्या बोलीभाषेतून व्यक्त केलेला आढळतो; म्हणून ही आत्मकथनं एकरंगी झालेली वाटत नाहीत; ' उपरा 'मुळे कैकाडयांची, ' आठवणींचे पक्षी 'मुळे मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील महार समाजाची अस्सल मराठी, 'काटयावरची पोटं 'मध्ये काही प्रमाणात मातंगांची बोली आली आहे; यामुळे भाषेच्या विविध रूपांची ओळख तसेच आजपर्यंत न योजिल्या गेलेल्या म्हणी व वाक्प्रचारांची मराठी भाषेत लक्षणीय भर या आत्मकथनांमुळे पडत आहे. मराठी भाषेच्या वैभवासाठी ही अभिनंदनीय अशीच गोष्ट आहे.

दलित आत्मकथनं एका व्यक्तीबरोबरच त्यांच्या समाजाचेही चित्रण करतात. ' यामुळे या आत्मकथनांना सामाजिक दस्तऐवजांचे स्थान प्राप्त झाले आहे. ' [१] हे प्रा. प्रकाश मेदककरांचे म्हणणे रास्त वाटते. या आत्मकथनकारांनी आतापर्यंत जे जीवन जगले, भोगले व पाहिले, त्याचे वास्तवदर्शी कथन करण्याकडे त्यांचा कल असलेला दिसतो. काही आत्मकथनांना जोडलेल्या प्रास्ताविक / दोन शब्द व मनोगतांचा मागोवा घेतला तर त्याचा प्रत्यय येऊ शकेल. ' गावकी,' ' तराळ–अंतराळ,' ' मला उद्ध्वस्त व्हायचंय, ' ' अक्करमाशी, ' ' उपरा, ' ' आठवणींचे पक्षी ' आणि ' गबाळ ' या पुस्तकांत लेखकांनी व्यक्त केलेली मनोगते विचार करायला लावणारी आहेत. दलितांनी ' जगलेलंच जगणं ' पुन्हा आठवून लिहिणे, म्हणजे मृत्यूचा अनुभव घेण्यासारखेच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याची प्रेरणा तसेच डॉ. म. ना. वानखडे, प्रा. म. भि. चिटणीस व डॉ. गंगाधरराव पानतावणे यांच्यासारख्या सन्माननीय व्यक्तींच्या प्रोत्साहनाबरोबरच शंकरराव खरात (वकील, माजी कुलगुरू व वेळोवेळी मिळालेली पदे), नामदेव व्हटकर (माजी आजदार, नट, लेखक इ.) प्र. ई. सोनकांबळे, केशव मेश्राम, कुमुद पावडे, रुस्तुम अचलखांब, वैजनाथ कळसे (प्राध्यापक), माधव कोंडविलकर (शिक्षक), शरणकुमार लिंबाळे (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक) समाजात प्रतिष्ठित पावलेली मंडळी असल्यामुळे आपण येथपर्यंत कोणत्या परिस्थितीतून आलो हे सांगण्याचो ऊर्मी त्यांच्या मनात येणे सहजशक्य आहे. याशिवाय काही आत्मकथनांचा उदय होण्यास तत्कालीन परिस्थितीच कारणीभूत झाल्यासारखे वाटते. लक्ष्मण मानेंच्या जीवनात शशीसारखी धीरगंभीर, सोज्वळ व त्यागी अशी स्त्री आली, म्हणूनच या आत्मकथनाला काही मूल्ये प्राप्त होतात. आपल्या गतजीवनाकडे बघण्याची चालना नकळत तिनेच दिली, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

' उपरा ' व ' गबाळ या आत्मकथनांमुळे भटकी जमात गाढवावर,

घोडचावर फाटके–तुटके बिऱ्हाड लादून पोटासाठी कशी रानोमाळ फिरत होती; तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनव्यवहारातील चालीरीती, घातक अशा जातपंचायती व बालविवाहाचे विदारक दर्शन पहिल्यांदाच आपणास होते. त्यांचे पशुतुल्य अवस्थेतलं जगणं बघून मन सुन्न होऊन जाते.

'कथा माझ्या जन्माची' हे नामदेव व्हटकर यांचे आत्मकथन अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या ढोर जातीतील एका व्यक्तीचे आहे. 'एका सुशिक्षित हरिजनाला जीवनात जेवढे करता आले, तेवढे मी करण्याचा आटोकाट प्रयत्न केला.' [८] असे त्यानीच म्हटल्याप्रमाणे हे आत्मकथन प्रांजळपणे, कुठेही आत्मस्तुती किंवा आत्मश्लाघा न येऊ देता केलेले आहे. या जातीशी निगडित अशा चांभार जातीच्या व्यक्तीचे 'मु. पो. देवाचे गोठणे' हे आत्मकथन दैनंदिनीचा घाट देऊन माधव कोंडविलकरानी लिहिले आहे. स्वतः लेखकाने या लेखनास आत्मचरित्रात्मक कादंबरी [९] असे म्हटले आहे.

चर्मकार समाजाच्या व्यथा–वेदनांवरोवरच खेडचामध्ये, एका अस्पृश्य जातीच्या शिक्षकाला सवर्णांकडूनही व स्वतःच्या जमातीकडूनही तिरस्कारपूर्ण व जीवघेणी वागणूक मिळते, याचे चित्रण स्पृहणीय आहे; पण काही दैनंदिनीमध्ये 'स्व'त्व गोंजारण्याचा प्रयत्न लेखकाकडून नकळत झालेला दिसून येतो. आपण एक शिक्षक व आपल्या थोरामोठ्यांशी ओळखी–पाळखी असूनही ही माणसे आपणास मानत नाहीत, ही खंत दिसते. अशा प्रसंगी कमालीचा रस घेऊन व भाववित्रश होऊन लेखक लिहितो; म्हणून 'वाचनाची भूक असणारा, लिहिणारा, थोरामोठ्यांशी पत्रव्यवहार करणारा असा कोंडविलकरांचा जो माणूस आहे, त्याचे खासगी जीवन डायऱ्यांच्या नोंदीतून ठिवकत राहते.' [१०] हे प्रा. प्रकाश मेदककर यांचे म्हणणे रास्त वाटते.

'फांजर'मध्ये नानासाहेबांचे भावजीवन कमी व त्यांच्यातला कार्यकर्त्याचा पिंडच अधिक व्यक्त होताना दिसतो. काही प्रसंगांतील अस्पृश्यता वजा केली, तर इतर व्यक्तीलाही ते भोगावे लागले असते, असे वाटते! या आत्मकथनांत 'गावकी'प्रमाणेच विसंगतीपणाही येतो. 'आत्मकथन' हे अनुभवाच्या कथनाची मागणी करते; पण यामध्ये क्वचित प्रसंगी वर्णन करण्यावरच भर दिसतो.

प्र. ई. सोनकांबळेंनी 'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथन ललित लेखांच्या धाटणीने लिहिले आहे. हे सलग आत्मकथन नसून आठवतील तशा आठवणी आहेत; पण आपल्या बालपणात अस्पृश्यता, दारिद्रच व पोरकेपणामुळे जे भोगावे लागले आहे, त्या प्रसंगांची रंगरंगोटी व कसलेही भाष्य न करता सांगितल्यामुळे त्याला प्रवाहीपणा व अस्सल रूप प्राप्त झाले आहे.

' बलुतं ' हे पहिले दलित आत्मकथन. त्याने पुढील दलित आत्मकथनांना एक दिशा दाखवून दिली. त्यातील स्त्री व्यक्तिरेखांमुळे त्याविषयी अनेक वाद–प्रवाद झाले. ही स्त्री प्रकरणं आत्मकथा रंजक करण्यासाठी घुसवली असावीत, असा प्रथमदर्शनी भास होतो; पण या सर्व स्त्रिया हिंदुसंस्कृतीच्या अमानुषपणाला बळी पडलेल्या आहेत आणि एकेकाळच्या दया पवारांच्या भावजीवनाशी त्या निगडित होत्या. मग त्यांना टाळून पवारानी आत्मप्रतारणा का करावी ? कोणत्याही स्फोटक मनःस्थितीत का होईना, पण सईला सोडून नवा संसार थाटण्याचा विचार (पुरुषप्रवृत्तीचा द्योतक जरी वाटला तरी) हा एका स्त्रीवर केलेला अन्याय वाटतो. मुंबईच्या बकाल वस्तीत व आपल्या खेडेगावातील अस्पृश्यतेमुळे गुदमरणारे व्यक्तित्व व त्याची झालेली परवड, ही वेदना या आत्मकथनातून सलत असलेली दिसते.

' ऐरणीच्या घणा 'मध्ये दारिद्र्यामुळे झालेली उपासमार, जातीयतेचे बसलेले जीवघेणे चटके व प्राध्यापक असतानासुद्धा विद्यापीठात एम. फिल.साठी केलेली हेतुपूर्वक अडवणूक याचे विदारक चित्रण वैजनाथ कळसे यानी विद्रोही वृत्तीने केले आहे.

' तराळ–अंतराळ ' यामध्ये आटपाडीची एक व्यक्ती अस्पृश्य जीवनातील दारिद्र्य सहन करून, वकील ते कुलगुरू असे सन्मान मिळवताना कोणत्या अवस्थेत जगली, यावरून तिच्या जीवनाचा बोध इतरांना घेण्यासारखा आहे; पण हीच आपल्या जीवनाची इतिश्री होती, अशी तृप्तीची भावना शंकरराव खरातांच्या या आत्मकथनातून डोकावल्याशिवाय राहत नाही.

गावकीची कामे करणे, मृत जनावरं ओढून नेणे, मृतांचा सांगावा देणे, वेसकर पाळी मागणे, जनावरे फाडणे व मृत मांस खाणे, तसेच लग्नप्रसंगी पंगतीशेजारी उष्टे–पाष्टे मिळेल म्हणून घुटमळणे, रणरणत्या उन्हात घोटभर पाण्यासाठी तिष्ठत उभे राहणे, गावातले फाटके–तुटके कपडे आणून तेच घालून शाळेत जाणे व उपासपोटी मेलेले, सडके कुत्रे ओढून टाकणे असे अनेक ज्वलंत व दाहक अनुभव बऱ्याच आत्मकथनांतून वाचावयास मिळतात.

क्रूर जातिव्यवस्था व विषम समाजरचनेतून होरपळून निघाल्याशिवाय कोणताही दलित माणूस सुटला नाही, याची कटू कहाणी ही आत्मकथनं सांगतात. मिळेल तसे जीवन जगण्यात, दुःख–यातना भोगण्यात व परिस्थितीनुसार वागण्यात बहुतेक आत्मकथनकारांच्या समाजाचा पूर्वार्ध गेला आहे. हा भोग सर्वच आत्मकथनांतून उद्वेगजनक व खेदपूर्ण असाच वाटतो. कला ज्ञानाची व मनाची कक्षा रुंदावण्याचेही कार्य करते. सदर आत्मकथनांनी हेही साधले आहे.

सुशिक्षितपणामुळे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे चैतन्य अंगात भिनल्यामुळे पूर्व दलित जीवनात जे जे जगलेले, भोगलेले तेही नाकारण्याची प्रक्रिया सुरू होते. इथल्या अन्यायी रूढी–परंपरेला, वर्णव्यवस्थेला व देवधर्माला ठोकरण्याची वृत्ती काही आत्मकथनांच्या उत्तरार्धात सुरू झालेली दिसते. त्यामुळे मूक मनेही पेटली जातात आणि अस्थिर वाटणाऱ्या समाजात क्रांतिप्रवणता निर्माण होते. ती खेड्यापाड्यांतून पसरते. 'नवरदेवास मारुतीच्या देवळाकडे गावाबाहेरील रस्त्याने नेण्यास गावकऱ्यांची हरकत नसते; पण नवरदेवाला गाडीत बसवून गावातून मिरवत नेणे, म्हणजे गावाचा अपमान असतो; म्हणून गावातली तरणीबांड पोरं काठ्या–कुऱ्हाडी अन् तलवारी घेऊन नवरदेवाच्या गाडीसमोर उभे राहून दलितांना ताकीद देताना म्हणतात, 'तुमच्या मायला तुमच्या ! घेडग्यायच्या लई माजलेत का ? एक पाऊल फुडं टाकलं तर आधी नवरदेवाची खांडळी करू अन् मग तुमची.' [११] हा संघर्ष मानेगावची माणसे डॉ. बाबासाहेबांचे भाषण ऐकून येऊन त्यानी सांगितल्याप्रमाणे वागण्याची हिंमत दाखविल्यामुळे होतो. म्हणजे उत्तरार्धामध्ये जागृत दलितमनाचे दर्शन घडताना दिसते.

दलितांतर्गत जातिजमातींचे परस्परांशी अतिजिव्हाळ्याचे किंवा अतिदुराव्याचेही संबंध चित्रित झाल्याचे आढळून येत नाही. विद्रोह, प्रक्षोभ व चीड यांबरोबरच दलितेतरांनी केलेले साहाय्य व त्यांच्याविषयी व्यक्त झालेली सहानुभूती ही बाबही या आत्मकथनांना वेगळे परिमाण प्राप्त करून देते.

बायकोला घेऊन जाण्यासाठी आलेल्या नामदेवला दरिद्री म्हणून सासरची माणसे बायकोशिवाय घालवून देताना, मदतीला आलेले हमीदसाहेब, [१२] 'आहेर' चित्रपटाच्या कामासाठी मदत करणारी ख्रिश्चन बाई कार्मो डिसुझा. [१३]

पाच–सहा पिशव्यांतून गहू, तांदूळ, डाळी व ज्वारी देणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर, [१४] शशीबरोबर लग्न होण्यासाठी मदत करणारी सुरेश शिपूरकर, नारायण, ऊर्मिला सबनीस, रवींद्र सबनीस, अनंतराव पाटगावकर व प्राचार्य गायकवाड [१५] ही मंडळी.

शांताबाई कांबळेना शिकत असताना मदत करणारे पाटील मास्तर, सुधा अत्रे, भालचंद्र माडगूळकर व देशमुखसाहेब इ. सवर्णांच्या वागणुकीची दुसरी बाजू आहे. ज्यांच्यामुळे हे आत्मकथनकार समाजात ताठ मानेने वावरू शकतात, ही कृतज्ञतेची भावना त्यांच्या मनात कायम असलेली दिसते.

ही आत्मकथने डॉ. बाबासाहेबांच्या बौद्ध धम्म स्वीकारानंतरची आहेत. धर्मांतराने ढवळून निघालेला दलित समाज किंवा बौद्ध धम्माचा त्याच्यावर पडलेला प्रभाव ('कुर्स्ती' या विजय सिरसटांच्या आत्मकथनात थोडेसे आलेले वगळून) वगैरेंचे प्रभावी असे चित्रण आपणास पाहावयास मिळत नाही.

सदर आत्मकथनात आत्मकथानायकाचे अस्वस्थ मन दिसून येते. इथल्या समाजव्यवस्थेशी, जातीशी व कुटुंबाशीही ते संघर्ष करण्याच्या पवित्र्यात उभे राहिलेले दिसते; म्हणून थोड्या प्रमाणात का होईना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाची प्रेरणा सार्थकी लागली, असे म्हणावेसे वाटते.

संदर्भ

१ उपरा : पृ. १६६.
२ तराळ–अंतराळ : पृ. ३९३–३९२.
३ मला उद्ध्वस्त व्हायचंय : पृ. ७६–७७.
४ कित्ता : पृ. ९४.
५ तराळ–अंतराळ : पृ. २२४.
६ मला उद्ध्वस्त व्हायचंय : पृ. १२७.
७ अस्मितादर्श दिवाळी अंक १९८३ : पृ. ९५.
८ कथा माझ्या जन्माची : पृ. २८१.
९ अस्मितादर्श दिवाळी अंक १९८३ : पृ. १४३.
१० कित्ता : पृ. ९५.
११ गावकी : पृ. ३५.
१२ कथा माझ्या जन्माची : पृ. १४६.
१३ कित्ता : पृ. २०९.
१४ उपरा : पृ. १५१.
१५ कित्ता : पृ. १३८.

२

' विचार शिल्पा 'चे सौंदर्य

पिंपळनेर येथे बालपण घालविल्यानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी शिक्षणासाठी वयाच्या चौदाव्या वर्षी वाईस आले. तेथे केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे) यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कृतचे अध्ययन करीत असताना धर्म, तत्त्वज्ञान, रामायण, महाभारतादी प्राचीन साहित्यशास्त्र व धर्मग्रंथांचेही ज्ञान त्यांना प्राप्त करता आले. ' त्या वेळी वाईला नवे जग व जुने जग विचाराच्या क्षेत्रात एकमेकांशी संघर्ष, सुसंवाद करीत एकत्र नांदत होते. ' असे शास्त्रीजी म्हणतात. त्या वातावरणात शास्त्रीजींच्या मनाची घडण झालेली आहे. त्यामुळे नव्या-जुन्यांचा एकत्र मेळ घालण्याची वृत्ती त्यांच्या ठिकाणी तेव्हापासूनच जोपासू लागली होती असे वाटते.

कार्ल मार्क्स, इबेर्ट स्पेन्सर, व्हाईट हेड, रसेल, मॅक्स वेबर, फ्रॉईड इ. विचारवंतांच्या विचारांवर शास्त्रीजींचा पिंड पोसत होता; पण कुण्याही एका विचारवंताच्या विचारात ते गुरफटून पडलेले दिसत नाहीत. प्रा. रा. ग. जाधवाना दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात, ' आदर्श विचारवंत हा सतत विचारशील असतो. आदर्श विचारवंत म्हणजे जो ज्ञानाची, विचारांची उपासना पूर्ण झाली आहे, असे मानत नाही आणि विचारांच्या नव्या कक्षांकडे सतत ओढला जातो तो होय. ' हे त्यांचे म्हणणे त्यानाही चपखलपणे लागू पडण्यासारखे आहे.

शास्त्रीजींच्या एकंदर विचारप्रणालीची दिशा शोधू गेल्यास साधारणपणे आंतरराष्ट्रीय ऐहिक मानवतावाद आणि उदारमतवाद ही दोन सूत्रे तीत प्रामुख्याने आढळून येतात.

म्हणूनच ज्ञानाची अखंड साधना करणारा कर्मयोगी विद्वान व विचारवंत म्हणून त्यांची ख्याती आज भारतभर होते. ' खरा विद्वान ज्ञानसंचिताचा संरक्षक व समीक्षक असतो. ' या प्रा. रा. ग. जाधवांच्या म्हणण्याची प्रचीती आपणास लक्ष्मणशास्त्री जोशींच्या व्यक्तित्वात व लेखनात येते. प्राचीन साहित्यशास्त्राचे अध्ययन व परिशीलन एवढेच न करता त्यानी सभासंमेलनांतून जुने विचार नव्या रूपात मांडलेले दिसून येतात.

एक प्रभावी वक्ता म्हणूनही ते समाजाला ज्ञात आहेत. ' धर्मकोशाची संपादनी, हिंदू धर्माची समीक्षा, वैदिक संस्कृतीचा इतिहास ' इ. त्यांच्या ग्रंथांचे वाचन केले तर ' सामाजिक प्रबोधन ' हीच त्यांच्या लेखनकार्याची प्रेरणा असल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या परंपरा आणि नवता यांच्यात अन्वर्थकता शोधण्याचा त्यांचा प्रयत्न सदोदित चाललेला असतो. समाजाला प्रेरक ठरणारे जाणून घेणे आणि विचारांती ते प्रकट करणे, या नव्या विचारसरणीचा पाया घालणारे शास्त्रीजी एक डोळस विचारवंत आहेत.

शास्त्रीजींचे लेखन काहींना लालित्यपूर्ण असे वाटत नाही. धीरगंभीर व आकलनास काहीसे बोजड वाटते. याचे कारण त्यांच्या लेखनशैलीत नाही, तर जो विषय त्यांना विवेचन करावयाचा आहे, त्याच्यात आहे. इतर लेखकांप्रमाणे त्यांच्या लेखनाला वाङ्मयाची फूटपट्टी आपणास लावता येत नाही. ' विचार शिल्पा 'च्या प्रस्तावनेत प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, ' शास्त्रीजींच्या लेखनाचे सौंदर्य त्यांच्या विचारात आहे. ' याचा प्रत्यय आपणास ' विचार शिल्पा 'तील लेखनातूनही येतो. शास्त्रीजींची विचारपद्धती शुद्ध तर्कसंगतीवर भर देऊन शुद्ध विचार घडविणारी आहे. शास्त्रीजी विचारवंत असण्यापूर्वी ते एक संवेदनशील मनुष्य आहेत. एवढेच नव्हे तर रा. ग. जाधवानी म्हटल्याप्रमाणे, ' शास्त्रीजींच्या ठिकाणचा माणूस विलक्षण रसिकसंपन्न असा आहे. म्हणूनच ते माणसाची सुखसमृद्धी अनुभवण्यातच मानवी जीविताचे सार्थक आहे, अशी विचारधारा व्यक्त करू शकतात. तो विचार कसा तो सर्वांगीण व सम्यक विचारबोध आणि हेच त्यांच्या व्यक्तित्वाचे लक्षण आहे. '

मनुष्याचे आचार-विचार व स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी पाश्चिमात्य विचारवंतांनी संघर्ष केला. शास्त्रीजींनीही त्याच विचारांचा धागा कणखरपणे आपल्या आचरणात आणला; पण त्यानी कुठल्याही तत्त्वप्रणालीची बांधिलकी

स्वीकारणे पसंत केले नाही. पारंपरिक अध्ययन पद्धतीत त्यांची वैचारिक घडण झाली असूनही स्वतंत्र विचाराने त्यानी वेगळी वाट शोधलेली दिसते. परंपरेने प्राप्त झालेली लोकपरायण विचारसरणी जशीच्या तशी स्वीकारून या जगात जगण्याचे सामर्थ्य लाभणार नाही, तर जगण्याचा अर्थ समजला तरच या जगात यशस्वीपणे जगता येते; याची त्याना जाणीव झाली असावी आणि हा विचारवंत विश्वाचा अर्थ शोधण्यासाठी जणू ज्ञानप्रकाश प्राशन करून बाहेर पडला. हे जग अधिक चांगले कसे बनवता येईल; याचीच काळजी लागलेले मन त्यांच्या लेखनातूनही डोकवताना दिसते.

मनुष्याला जुने पूर्णपणे सोडता येत नाही व नवेही जसेच्या तसे स्वीकारता येत नाही, आत्मसात करता येत नाही. तत्त्वांच्या किंवा विचारांच्या बाबतीतही तशीच अवस्था झालेली दिसून येते. म्हणून नव्या–जुन्याचा मेळ घालणारे कार्यक्षम तत्त्वज्ञान समाजाला नेहमी हवे असते; पण भारतीय समाज जुन्यालाच चिकटून आहे त्यासाठी भारताच्या पूर्वपरंपरेची वस्तुनिष्ठ चिकित्सा शास्त्रीजीना करावी लागली. त्याशिवाय नव्या संकल्पित परिवर्तनाची दिशा गवसणार नाही, याची त्याना खात्री वाटली होती, असे वाटते; म्हणूनच नव्या विज्ञानमूल्यांची व समाजमूल्यांची सांगड घालण्याचा ध्यास त्यांच्या लेखनात झालेला आढळतो. प्रामुख्याने अखिल मानव्याचा विचार करणारा मानवतावाद हेच त्यांच्या जीविताचे कार्य आहे, हे लक्षात येते. याचा प्रत्यय त्यांच्या ' विचार शिल्पा 'तील लेखांमधूनही येतो.

' विचार शिल्पा 'त शास्त्रीजीनी धर्म, विज्ञान व समाज या तीन बाबींवर प्रकाशझोत टाकलेला आहे. त्यांच्या मूळ विचारांचा गाभा हा माणसाची सर्वांगीण उन्नती होणे हा आहे. धर्म आणि विज्ञान हे माणसांच्या सुखासाठी कार्यरत असावे, राहिले पाहिजे, अशी शास्त्रीजींची धारणा आहे. माणसाचे चारित्र्य उन्नत करणे, हे जगातील सर्व धर्मांचे मुख्य उद्दिष्ट आहे. ' धर्म ' या शब्दाचा अर्थच धारणा असा आहे. समाजातील व्यक्तींनी परस्परांशी वागताना सद्गुण धारण करावेत; म्हणून धर्म आपणास दुर्गुणांपासून दूर राहण्यास शिकवतो. यातूनच प्रत्येक धर्मातील तत्त्वज्ञान अवतरले आहे. हे तत्त्वज्ञान त्या त्या समाजातील मूळ पुरुषांनी समाजव्यवस्था सुव्यवस्थित राहावी यासाठी निर्माण केलेले आहे. ते अधांतरी आलेले नाही, म्हणून तर्कतीर्थ जोशी म्हणतात, ' धर्म आणि देव मनुष्याने संरक्षणाचे निर्माण केलेले मानसिक उपाय आहेत. ' (माधव गडकरी यानी तर्कतीर्थ जोशींच्या ' लोकसत्ते 'साठी घेतलेल्या मुलाखतीमधून) म्हणजे परिस्थितीनुसार निर्माण होणाऱ्या भयाने धर्माची व देवांची निर्मिती मानवाने केली आहे. म्हणूनच धर्मामध्ये देव, दैव, कर्मकांड व पूजाअर्चा यांबाबतीत जे स्तोम माजले – माजत आहे, त्याला त्यांचा विरोध आहे. ईश्वर आहे यावरच त्यांचा विश्वास नाही; म्हणून परंपरेने धर्मामध्ये जे सांगितले

आहे, ते ते बुद्धिवादी दृष्टीने ते नाकारताना दिसतात.

कुणी एका ऋषिमुनीने केलेल्या कल्पितावर माणसे आजपर्यंत विश्वास ठेवत आली. त्याचे अंधानुकरण करीत राहिली. त्यामुळे अंधश्रद्धा वाढीस लागली. अंधश्रद्धा तर भारतीयांच्या जीवनाचा स्थायीभावच बनलेली आहे. जोपर्यंत पारंपरिक पद्धतीच्या देवरचना आम्ही मनातून काढून टाकणार नाही, तोपर्यंत ती तशीच वाढत राहणार आहे. यासंबंधी शास्त्रीजीनी, ' धर्माचे इतिहासातील स्थान ' या निबंधात उद्‌बोधक विवेचन केलेले आहे.

वेदकालीन धर्मकल्पना कशा प्रकारची होती ? हे सांगताना जीव, जगत आणि परमात्मा यांसंबंधी जे तत्वज्ञान येते, त्यासंबंधी ते म्हणतात, ' ज्ञानाची निष्काम उपासना करण्यात मोक्ष आहे. ज्ञानानंद हाच परमार्थ आहे, तत्त्वचिंतन हे एक स्वतः सिद्ध मूल्य आहे. या गोष्टीची शिकवण वैदिक तत्वज्ञान देते आणि ही शिकवण फसवी नाही, हेही आपणास पटते; कारण ज्ञानाशिवाय या जगात मनुष्य कुचकामी ठरतो. आता हे ज्ञान वर उल्लेखिलेल्या तीन तत्त्वांसंबंधी असेल तर उत्तमच. '

' प्राणी, पशू, पक्षी, वृक्ष व नद्या इ. वस्तूंच्या ठायी देवत्व थापून वेळप्रसंगी त्यांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञ व बलिदान करण्याची प्रथा या जगातील संप्रदायात पसरलीही. या वस्तू माणसांच्या मनात देवत्वाचे प्रतीक म्हणून दृढ झाल्या होत्या; यामुळे मूलतत्त्व व त्याचा विचार बाजूला पडून हीन धर्मकल्पनांचा सुळसुळाट झाला होता. ' शास्त्रीजी सांगतात की ' हीन धर्मकल्पनांच्या बंधनातून मुक्त करणारा विचार माणसांना प्रथम वेदांनी सांगितला, तो म्हणजे सर्व चराचर विश्व हे एकाच ईश्वराचे स्वरूप आहे. तुम्ही पूजत असलेली सर्व प्रतीके एकाच विश्वात्मक परमात्म्याचे आविर्भाव आहेत; अशा रीतीने जणू विश्वधर्म समन्वयाचाच मार्ग दाखविला, त्या वेळी हाच मूलभूत विचार होता. ' म्हणून तर्कतीर्थ जोशी याच निबंधात म्हणतात, ' अत्यंत मूलभूत आणि वरिष्ठ विचारांचा आणि प्रश्नांचा परामर्श घेणे हे तत्त्वज्ञानाचे एक प्रमुख कार्य असते, ते वेदकालीन या विचारात आलेले आपणास आढळते. '

मानवाच्या अतिप्राचीन पिढीत (रानटी अवस्थेत) धर्म ही कल्पना कशी उदय पावली असावी ? समाजसूत्र बद्ध ठेवण्यासाठी काहीतरी नियंत्रण हवे असते, असा एक विचार आपणास करता येईल.शास्त्रीजी म्हणतात, 'असूर राष्ट्रांत जगातील प्राचीनतम शासन विधान म्हणजे कायदा अथवा राजधर्मशास्त्र हे अस्तित्वात आले असले पाहिजे. हिंदुस्थानातही तसेच झाले असले पाहिजे; कारण रानटी टोळ्यांचा प्रमुख हा एक प्रकारे राजाच होता. त्याच्या नियंत्रणाखालीच टोळीचा दैनंदिन

व्यवहार होत असे; त्यामुळे त्या त्या टोळीची विचारधारा, संस्कृती वेगवेगळी ठरली असावी. निरनिराळ्या संस्कृतींप्रमाणे वागणाऱ्या मानवगटांची भली मोठी उतरंड निर्माण झाली आणि त्यातूनच जातिसंस्थेचीही निर्मिती झाली. तत्कालीन हीन ठरलेल्या संप्रदायाचे व धर्मकल्पनांचे काहींनी अनुसरण केले. त्या त्या समाजाचे व्यवसाय हे नैसर्गिक भेद ठरले. त्यांनी स्वतःच्या धार्मिक चालीरीतींच्या परंपरा अबाधित ठेवल्या.' तर्कतीर्थ जोशींनी भाष्य करताना म्हटले आहे, ' त्यामुळे मनुष्याचे मन आणि व्यवहार अत्यंत संकुचित, कृत्रिम, पोकळ, व्यर्थ, अडगळीवजा असलेल्या संप्रदायाच्या बंधनात बंदिस्त झाले. याचमुळे व्यापक कायदा लागू पडेल, असा समाज अस्तित्वात आला नाही. हिंदुस्थानात तर राज्यसंस्थेने केलेले कायदे वेळ-प्रसंगी जुजबी; पण त्या त्या वंशाच्या, जातीच्या, प्रांताच्या चालीरीतींनाच कायद्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. याचा प्रत्यय काही प्रमाणात आजच्या काळातही येतो. '

समाजस्वास्थ्यासाठी समाजाला शासनपद्धतीची आवश्यकता असते; कारण मनुष्य पारलौकिकापेक्षा ऐहिक जीवनात सुखी होणे पसंत करतो. सुख, शांती व समृद्धी यांतच मानवी जीवनाचे कल्याण असते. त्या दृष्टीने वेदांनी सांगितल्याप्रमाणे चराचरांत ईश्वर सामावलेला आहे. जीवनाच्या ठायी आत्म्याच्या रूपाने त्याचा अंश आहे. असे जर असेल तर जगातील सर्व जाति-धर्मांचा ईश्वर एकच होईल. माणूसही सारखाच, मग त्याचे पूजास्थानही एक का असू नये ? पण धर्मात आलेल्या कर्मकांडामुळे माणसे ' परमतत्त्वा 'ला विसरली. समाज विस्कळीत झाला. त्यामुळे यापेक्षा नव्या धर्माची आवश्यकता समाजाला भासू लागल्यास नवल नाही. ' वंश, जाती, राष्ट्र इ. मर्यादा ओलांडून मनुष्यास शांतीचा आणि सत्याचा संदेश देणारा धर्म हा विश्वधर्म असतो.' असे तर्कतीर्थ जोशी म्हणतात. बौद्ध धर्माच्या नैतिक मूल्यांवर शास्त्रीजींचा भर अधिक असलेला जाणवतो. ' बौद्ध धर्माने कर्मकांड धिक्कारले आणि नैतिक वर्तनावर अधिक भर दिला. तृष्णाविजय हाच एक मोक्षाचा उपाय होय, असे बौद्ध धर्माने सांगितले. अहिंसा, सत्य इ. नीतिधर्म निरपवाद पालन करण्यातच मनुष्याची जीवनसफलता आहे, हे त्या धर्माच्या उपदेशाचे सार होय. ' म्हणूनच संस्कृतीच्या सर्व थरांत हा धर्म शिरला, असे शास्त्रीजीना वाटते.

परमार्थासाठी धर्मतत्त्वे राबवली तर सर्व मानवाचा विश्वधर्म होऊ शकतो; पण स्वार्थासाठी माणसे धर्मतत्त्वे वापरतात आणि मग धर्म जाचक बनू लागतो. ' धर्ममूल्यांची चर्चा ' या निबंधात शास्त्रींनी म्हटले आहे, ' धर्मसंस्थेवर सत्ताधारी वर्गाच्या लोकांचा प्रभाव पडतो व ते त्या धर्ममूल्यांचा व धार्मिक विचारसरणीचा उपयोग सामान्य जनतेला गुलामगिरीत व अज्ञानात ठेवण्याकडे करतात. त्या वेळी मनुष्यानेच जन्माला घातलेला व राखलेला धर्म व ईश्वर मनुष्यावर कुरघोडी करतो. '

मनुष्याच्या आत्म्याचा विकास धर्माने व्हावा, अशी अपेक्षा अध्यात्मवादातही असली पाहिजे आणि विकसित झालेल्या अशा आत्म्याने सामाजिक ध्येयाची कास धरली पाहिजे; म्हणूनच 'उच्च ध्येयाची साधना म्हणजे अध्यात्मवाद होय' असे जोशींना वाटते; कारण विश्वातील सगळ्या घडामोडी एकमेवाद्वितीय, चेतन, विचारशील, सर्वशक्तिमान, सर्वव्यापी परम आत्म्याच्या इच्छामात्रेकरून घडतात. आत्म्याचाच आविर्भाव म्हणजे हे विश्व होय.' (उपनिषद, गीता, शंकराचार्य, इस्लाम, ख्रिश्चन धर्म व हेगेलसारखे अध्यात्मवादी तत्त्ववेत्ते ह्यांचा हा अध्यात्मवाद आहे.)

निरनिराळ्या धर्मांतील तत्त्वे कशी तयार झालेली असावीत ? याविषयी तर्कतीर्थ म्हणतात, 'ज्ञात विश्वाच्या पोटी गर्भित अशा कल्पनांचा आरोप करून बनविलेली निरनिराळी काल्पनिक विश्वे म्हणजे धार्मिक तत्त्वे होत आली आहेत. त्यांतील खऱ्याखोट्याची त्याने पारख केलेली नाही. अज्ञात, अचिन्त्य व अनंत विश्वापुढे नम्र होणे हे शास्त्रींना पटते. त्याविषयीची नम्रता व जिज्ञासाही माणसाच्या ठिकाणी असावी; पण त्या जिज्ञासेपोटी धार्मिक दृष्टिकोनातून विचार करण्यापेक्षा वैज्ञानिक बुद्धिनिष्ठेने विचार करणे त्याना योग्य वाटते, असे आपणास या लेखांचे वाचन केल्यास जाणवते.

'धर्म हा लोकांवर वजन कसे मारावे, याचीच काळजी घेत आलेला आहे; म्हणूनच विश्वाचे गूढ सहजलीलेने उकलून दाखविता येते, असा गर्वही तो वाहतो,' असे तर्कतीर्थ जोशी म्हणतात; म्हणूनच निरनिराळ्या धर्मांतील धर्माचार्यांनी धर्माची मक्तेदारी स्वतःकडे घेतलेली दिसते; त्यामुळे धर्मवेत्ते व त्यांच्यातील मतभेदही वाढत गेले. एकाच परमात्म्याच्या बाबतीत अनेक मते निर्माण झाली आणि जो तो आपल्याच मतांना खरे मानून त्या त्या धर्माचे ते कट्टर अभिमानी बनले. त्याचा परिणाम धर्माच्या नावावर अनेक आक्रमणे, लढाया व तंटेबखेडे होण्यात झाला.

धर्मसंस्थापक स्वतःच देवाचा पुत्र, अवतार, दूत मानून धर्माच्या नावाने माणसांच्या मनावर स्वतःचे अनेक विचार बिंबवू लागले.सार्वत्रिक हिताच्या दृष्टीने ते लागू पडत नसले, तरी त्याची त्यांनी पर्वा केली नाही. ख्रिश्चन धर्माविषयी तर्कतीर्थ लिहितात, 'सुरुवातीला या धर्मात कर्मकांड, मंदिरपूजा, विधी व उत्सव असे काही नव्हते; पण सेंट पॉलने या धर्माची युरोपात रोमन साम्राज्यात स्थापना केली व वरील उपचार पद्धती स्वीकारली. नंतरच्या धर्माचार्यांनी पुढेपुढे तर मूर्तिपूजाही आणली. युरोपात ख्रितपूर्व असलेली गुलामगिरीही त्याने मान्य केली.' यावरून धर्म, मानवाच्या शांती–समृद्धीसाठी न उरता माणसांना गुलाम बनवून दास्यात ठेवण्याचे एक साधन बनले, हे शास्त्रीजी मोठ्या खुबीने दाखवून देतात. त्यांचे

मुस्लिम धर्माविषयीचे विवेचनही ध्यानात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, ' महंमदाच्या वेळी अरबस्थानात सुसंस्कृत असा धर्म नव्हता. '

त्यांचे मुस्लिम धर्माविषयीचे मत ध्यानात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, ' महंमदाच्या वेळी अरबस्थानात सुसंस्कृत असा धर्म नव्हता. त्यांचे संघटित असे राज्यही नव्हते. व्यापाराच्या निमित्ताने येणाऱ्या टोळयांचे अनेक संप्रदाय व धर्मप्रकार होते, त्यांच्यात धर्मदृष्टया व उपासनादृष्टया बहुदेवतावादी संस्कृती नांदत होती. पुरोहित वर्ग निर्माण झाला होता. त्यांच्याकडे सामाजिक स्वामित्व आले होते. त्यांनी मूर्तिपूजा वाढवून नीतीपेक्षा आणि ऐहिक व्यवहारापेक्षा कर्मकांडाचेच अधिक स्तोम माजविले होते. मानवी द्वैत, पुरोहितांचे वर्चस्व, मूर्तिपूजा आणि कर्मकांड यांचा समूळ नाश करण्यासाठीच जणू महंमदाने सर्व धर्मांतील चांगल्या विचारांचा मागोवा घेऊन इस्लाम धर्माची स्थापना केली. त्यांनी देवाचा संदेश तलवार उचलून सांगितला व सर्वांना एकाच देवाच्या छत्राखाली आणले. ' तर्कतीर्थ म्हणतात, ' हा धर्म ख्रिस्ती धर्माप्रमाणे केवळ धार्मिक नव्हता. त्यात राजकीय अर्थही भरलेला होता; कारण अरबांची संघटना करून देवांची तलवार पांगू लागली की, ' एक तर इस्लामचा स्वीकार करा; नाहीतर खंडणी द्या. ' पण मुळात पाहिले तर साम्राज्य-स्थापनेच्या मुळाशी नैतिक प्रेरणाही होती; कारण या धर्माने परधर्मसहिष्णुताही बाळगलेली आहे, ' ही गोष्टही ते नोंदवायला विसरत नाहीत.

हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन व इस्लाम धर्मांच्या मूलभूत तत्त्वज्ञानाचा मागोवा घेत, त्या धर्मांतील विचार समाजधारणेस कितपत पोषक होते, यांचा साधार आलेख तर्क, ' विचार शिल्पा 'तील धर्मासंबंधीच्या लेखांमधून मांडतात.

धर्मभावनेला लागलेले अनिष्ट वळण पुसण्याचा प्रयत्न भारतात ब्रिटिश राज्याची स्थापना झाल्यानंतर सुरू झाला, याची चर्चा त्यानी ' महाराष्ट्रातील धर्म-सुधारणेचे आंदोलन ' या निबंधात केलेली आहे. विशेषतः हिंदूंची अंधश्रद्धेत गुर-फटलेली व अगतिकतेत सापडलेली विवेचक बुद्धी मुक्त झाली, असे ते म्हणतात. ब्रिटिश राज्यामुळे सामाजिक, धार्मिक संस्था बदलण्यास मदत झाली. त्यांच्यामुळे आधुनिक विचारांची दृष्टीही लाभली. नव्या विचारांची व भारतीय बोधनाची पहिली ज्योत पूर्वेस बंगालमध्ये अठराव्या शतकाच्या अखेरीस राजा राममोहन रॉयच्या रूपाने लागली. त्यांच्या कार्याला पूरक ठरणारी जीवनदृष्टी देणारे लोक-हितवादी गोपाळ हरी देशमुख व जोतिबा फुले हे दोन महापुरुष १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात उदयास आले.

पाश्चिमात्य विद्येने धर्माच्या चौकटीत असणाऱ्या, पण त्याची त्याला जाण नसणाऱ्या तीन मूलभूत मूल्यांची प्रस्थापना या देशात केली. ती तीन मूल्ये म्हणजे बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सर्व मानवांची राष्ट्रनिरपेक्ष, वंशभेदनिरपेक्ष नैसर्गिक

समता ही होत. यामुळे इतर धर्मांकडे सहिष्णू व बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून पाहता येऊ लागले. माणसाच्या जीवनमानाचा मानवी हिताच्या दृष्टीने बुद्धिवादी विचार सुरू झाला. त्यामुळे धर्मग्रंथांतील रूढी व अंधश्रद्धेवर आधारलेले आचारांचे नियमन म्हणजे खरा धर्म नव्हे, अशी जाणीवही दृढ होऊ लागली.

या नवीन मूल्यांच्या निकषांवरच हिंदुस्थानातील (महाराष्ट्रातील) समाज-सुधारकांनी धर्मपरिवर्तनाचा पाया घातला. या सुधारकांनी धर्मासंबंधी माणसांच्या मनात घर करून बसलेल्या भ्रामक कल्पनांना तडा देण्याचे कार्य सुरू केले; कारण धर्मातील कल्पना त्या वेळच्या धर्ममार्तंडांनी एखाद्या देवाचे किंवा एखाद्या नदीचे वर्णन करून त्यात ईश्वर आणून ठेवून ब्राह्मणास पैसा मिळण्याची तजवीज केली होती, असा विचार 'शतपत्रां'तून लोकहितवादीनी मांडला. तो शास्त्रीजीनाही पटलेला दिसतो.

धर्म हा माणसाचे व्यवहार, आचार, विचार इ साठी काही नियमन किंवा मर्यादा निश्चित करतो आणि त्याच्यापुढे एक श्रेष्ठ उद्दिष्ट ठेवून त्याला महान बनविण्याची प्रेरणा देतो; पण आतापर्यंतच्या धर्मकल्पनांनी अशाप्रकारचे कार्य केलेले नाही. उलट माणसाला घाबरवण्याचे, पंगू बनविण्याचे, अदृश्य शक्तीचे दास बनविण्याचे, सामर्थ्याची धमक असतानाही लाचार बनविण्याचे कार्य केले आहे; त्यामुळे मनो-विकारांनी ग्रासलेली माणसे आणखीच भयभीत झाली. त्यामुळे देव, देवता, गुरू, गोसावी, पीर इत्यादींच्या मागे लागून त्यांना प्रसन्न करून घेतले, तरच आपल्यावरचे संकट टळेल, मनोकामना पूर्ण होईल, अशी आशा बाळगून दुसऱ्यांच्या कृपेची याचना करीत राहिली. धर्मामध्ये नमूद केलेल्या विचारांप्रमाणे माणसांनी स्वतःची आत्मशक्ती बलशाली बनवायला पाहिजे होती; पण धर्माच्या हेकेखोरांनी त्यांचे लक्ष त्या विचाराकडे केंद्रित होऊच दिले नाही; त्यामुळे मनुष्य गोंधळात सापडला. त्याचा परिणाम धर्माच्या नावाखाली अधर्म बोकाळला, याचे कारण भारतीयांच्या ठिकाणी असलेला वैज्ञानिक दृष्टीचा अभाव, हेही असू शकेल.

धर्मकल्पनेप्रमाणे इथला काही समाज शारीरिक कर्मे करणारा तर काही बौद्धिक कर्मे करणारा होता. त्यातही श्रेष्ठ–कनिष्ठतेचा दर्जा लावण्यात आला होता. त्यातच शूद्र गणल्या गेलेल्या जाती विद्येपासून दूर ठेवल्या होत्या; त्यामुळे व्यवसायविषयक ज्ञानाला पुस्तकी विद्येचा आकार लाभला नाही. परंपरागत जुन्या विद्यांमध्ये सर्व ज्ञान साठलेले आहे व तेच सत्य आहे, अशी भावना दृढ झाली. त्यातच जातिभेदामुळे सामाजिक अभिसरण कुंठित झाले. व्यक्तीच्या व्यक्तित्वाच्या विकासाला सामाजिक अभिसरण आवश्यक असते, असे शास्त्रीजी म्हणतात; पण ते कधी भारतीय समाजात, पर्यायाने हिंदुधर्मात झाले नाही. त्यामुळेच भारतात धर्मसंस्था विरुद्ध वैज्ञानिक संस्था असा संघर्ष कधी झाला नाही, असे मत 'वैज्ञानिक

दृष्टी आणि भारतीय संस्कृती ' या निबंधात शास्त्रीजी नोंदवतात. तसे झाले असते तर जाचक धर्मकल्पनांतून भारतीय समाज यापूर्वीच मुक्त झाला असता, असेच जणू शास्त्रीजीना म्हणायचे आहे, असे वाटते.

धर्म, दैव व देवाच्या नावावर आपला भार टाकून आपण जगत असतो. हे जगणे विज्ञानाने तपासून पाहिले असते, तर फोल ठरले असते. दैवाधीनता सोडून स्वकर्तृत्वाने आपण जगू शकलो असतो, हे सांगण्यासाठीच जणू सदर निबंधातच शास्त्रीजी म्हणतात, ' भलत्याच खोट्या (भ्रामक) फुकट जाणाऱ्या त्याच अगणित जीवनशक्तींना सत्यसृष्टीतील वास्तवानुसार ध्येय सिद्ध करण्याची साधने सापडली आहेत व सापडत आहेत. ' याचाच अर्थ असा की, माणसाने धर्माची विज्ञानाशी सांगड घातली तरच मानवी जीवन सुसह्य होईल, हेच शास्त्रीजींना जणू सूचित करावयाचे आहे. अशा प्रकारचे जीवनप्रेरक विचारसौंदर्य ' विचार शिल्पा 'तील लेखनातून प्रकट होताना आढळते.

३

शिक्षक आणि समाज

शिक्षक आणि समाज हे मानवी जीवनाचे मूलभूत घटक आहेत. शिक्षकाशिवाय समाज आणि समाजाशिवाय शिक्षक ही कल्पनाच अस्तित्वात येऊ शकत नाही. हे दोन्ही घटक परस्परांशी संबंधित असे आहेत. पैसा परमेश्वर समजणाऱ्या अवस्थेत शिक्षणाला व शिक्षकाला कोणते स्थान समाजात मिळते, याचा विचार केला पाहिजे. पैशाचे मूल्य वाढत असल्यामुळे मानवी मूल्ये घसरत आहेत. आज जगात पैशाने कुठलीही गोष्ट विकत घेता येते; त्यामुळे शिक्षकाशिवायही शिक्षण मिळणे काही अवघड गोष्ट नाही; पण काहीही झाले तरी शिक्षक, शिक्षण, विद्यार्थी व समाज यांचा संबंध पूर्वापारपासून चालत आला आहे, पुढेही चालू राहील. या सर्व घटकांचा राष्ट्राच्या प्रगतीसाठी समन्वय असणे अत्यंत आवश्यक गोष्ट आहे, यासाठी आपण शिक्षक व समाज यांचा परस्पर संबंध कसा असावा, कसा आहे, याचा विचार करू. शिक्षक म्हणजे शिकवणारा, विद्यादान करणारा, ज्ञान देणारा होय. मनुष्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण ही आवश्यक गोष्ट आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे, अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणारी गोष्ट म्हणजे शिक्षण. या दृष्टीने शिक्षण हा मनुष्याचा तिसरा डोळा म्हटले तरी चूक ठरू नये.

आता विद्यार्थी म्हणजे काय ते पाहू. विद्या संपादन करणारा, ज्ञान अर्जन करणारा, ज्ञान आत्मसात करणारा तो विद्यार्थी. मग तो शाळेत जाऊन शिकणारा असेल किंवा स्वतः शिकणारा असेल.

'जो जो जयाचा घेतला गुण। तो तो म्या गुरू केला जाण।'

असे श्री गुरुदेव दत्त सांगतात. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात माणसाला गुरू असतोच; कारण 'सद्गुरुर्वीण ज्ञान काही। सर्वथा होणार नाही।' असे रामदास सांगतात. सर्वार्थाने मनुष्य जीवनभर विद्यार्थीच असतो. तो सतत नवीन काहीतरी शिकत असतो. इथं केवळ अनुभव हाच शिक्षक असतो; पण आपणास शाळेतील व समाजात असलेल्या शिक्षक व विद्यार्थ्यांचा विचार करादयाचा आहे.

विद्यार्थी म्हणजे काय ? हे पाहिल्यानंतर समाज कशाला म्हणतात ते थोडक्यात ध्यानात घेऊ. समाज ही निरंतर प्रक्रिया आहे. शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचाही समाजात अंतर्भाव होतो. वेगवेगळ्या संबंधाने परस्परांशी बांधल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज. विद्यार्थी, शिक्षक व पालक या सर्वांचे अस्तित्व समाजात आहे. एवढेच नव्हे तर त्यांचे परस्परांशी घनिष्ट संबंध आहेत; त्यामुळे मुलाला शाळेत घातले व नोकरी करायची म्हणून शिक्षकाने शिकविले तसेच मुलाने आपण शिकलो, असे म्हणून आपली जबाबदारी संपली असे म्हणता यायचे नाही. शिक्षणामुळे लोकशाही म्हणजे काय ? स्वातंत्र्य म्हणजे काय ? हे आम्हाला कळायला लागले आहे. स्वातंत्र्याने व लोकशाहीने आम्हाल। कर्तव्य व अधिकार बहाल केले आहेत; पण आज प्रत्येकजण कर्तव्यापेक्षा अधिकाराचीच भाषा अधिक बोलतो. कर्तव्य केल्यानेच आपणास व्यापक अधिकार मिळणार आहेत, हे आपण सोयीस्करपणे विसरतो व हक्क दाखविण्यासाठी वेगवेगळ्या बाबतींत व वेगवेगळ्या पातळ्यांवर झगडतो; त्यामुळे सर्वांचा भविष्यकाळ चिंतेचा विषय झाला आहे.

पारतंत्र्यापेक्षा आज शिक्षणाचा विस्तार अधिक झाला आहे. तरी प्रत्येकाच्या मनात अस्थिरतेचे, गोंधळाचे सावट सतत दबा धरून आहे. शिक्षणाचा खेड्या-पाड्यांत व समाजाच्या सर्व थरांत काहीएक प्रमाणात प्रचार-प्रसार होऊनही असे का व्हावे ? आजच्या शिक्षक, विद्यार्थी व समाज यांच्या परस्परसंबंधात कुठे गफलत निर्माण होतेय का ? असे प्रश्न सहजच विचारी माणसाच्या मनात निर्माण होतात. आपल्या देशाला सगळ्याच गोष्टींची महान परंपरा आहे. आजच्या मानाने पूर्वीच्या काळात भारतात सुबत्ता व सुस्थिती अधिक होती, असे बोलले जाते. तसे पाहिले तर शिक्षणामुळे काही क्षेत्रांत दृष्ट लागण्यासारखी प्रगतीही झाली आहे. तरी पण आजचा समाज सुखी-समाधानी आहे का? याचे बहुतेक 'नाही' असेच उत्तर मिळेल. याचे कारण शिक्षण व शिक्षकाकडे बघण्याची आमची दृष्टी बदललीय, असे म्हणता येईल का ? मला वाटते, आजचे शिक्षण साध्य राहिले नाही. ते एक साधन बनले आहे.साधने ही माणसाच्या भौतिक गरजा भागवू शकतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले, तर शिक्षण हे व्यवहारार्थी-पोटार्थी झाले आहे.

एखाद्या पालकाला विचारले, ' तू मुलाला का शिकवतोस ?' तर तो उत्तर देईल, ' मुलाला डॉक्टर, वकील, इंजिनियर इ. करायचंय. नोकरी करून मुलाने पांग फेडावेत, म्हणून शिकवतोय. ' या पालकाच्या म्हणण्यात तसे काही गैर नाही. त्याची ती जैविक गरज आहे. मग शिक्षकही ' गरज तसा पुरवठा ' या न्यायाने शिकवून मुलांना वरच्या वर्गात ढकलीत राहतो. एकदा का हायस्कूलचे शिक्षण ओलांडले, की मग पुढच्या पदव्या मिळवणे तसे फारसे कठीण नसते. कारखान्यातून इतर मालाचे उत्पादन व्हावे तसे हजारो विद्यार्थी बाहेर पडतात. पदव्या घेऊन नोकरीच्या शोधात फिरतात. तेव्हा ते बहुतेक आपल्या शिक्षकांनाही विसरलेले असतात. त्यांच्यासोबत असते केवळ पदव्यांचे शिक्के मारलेले कागदपत्र. ही शिक्षणामुळे झालेली प्रगती की अधोगती ? नोकरीसाठी समाजात उपासतापास करीत वणवण फिरणारे विद्यार्थी समाजाला व शिक्षकाला हवे आहेत का ? शिक्षणाचे ध्येय केवळ नोकरी मिळण्यापुरतेच मर्यादित आहे का ? मला वाटते, ' बहुजन हिताय । बहुजन सुखाय । ' याबरोबरच माणसाच्या आत्म्याचा, चारित्र्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणे, हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. ज्या म. फुले यानी ' विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली । नीतीविना वित्ता गेले । वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले । ' म्हटल्याप्रमाणे त्या विद्येचे महत्त्व आज तरी आम्हाला समजले आहे का? ज्या दलितांना शिक्षणाच्या सर्व सोयी उपलब्ध आहेत असे म्हटले जाते, त्यांचा तरी सर्व बाबतींत विकास झालेला आहे का ? शिक्षणामुळे माणसांतील अज्ञान, दारिद्र्य व रानटीपणा नष्ट व्हावा, ही साधी अपेक्षा आहे. आजच्या शिक्षणाने माणसामाणसांची मने सांधली जातात का ? समाजातील माणसांचा परस्परसंवाद घडून येतोय का ? याचाही विचार झाला पाहिजे. हे जर होत नसेल, तर शिक्षण देणारे आम्ही शिक्षक व शिक्षणप्रणाली कुठे कमी पडतेय का ? याचाही शोध घ्यावा लागेल.

शिक्षण देणारा, ज्ञान देणारा, दुसऱ्या शब्दांत त्याला गुरू म्हणू. भारतीय संस्कृतीत गुरूचा महिमा फार आहे. गुरूने त्या महिम्याला जागून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. शिक्षकांशिवाय जन्मभर आपण दुसरे कोणी नाही. शिकवणे हेच आपले जीवितकार्य ही जाणीव शिक्षकाने मनात बाळगली पाहिजे. दुसरी नोकरी मिळत नव्हती; म्हणून शिक्षकी पेशा पत्करला. शिक्षक होण्याचे ध्येय होते, शिकविण्याची आवड आहे, म्हणून शिक्षक झालो असे सांगणारे कितीसे शिक्षक मिळतील ? मग मनाविरुद्ध या पेशात आलेले शिक्षक साईड–बाय–साईड कोंबडचा पाळ, शेळचा–मेंढरे घे, म्हशी आण असा विविध प्रकारचा उद्योगही सुरू करतात. पैसा मिळविणे हे त्यांचे ध्येय सुरू होते. कारणे काहीही असोत. आज शिक्षणक्षेत्रात नैराश्याचे वातावरण पसरलेले आहे. त्याचा शिक्षक, विद्यार्थी, पालक पर्यायाने समाज

व राष्ट्रावर परिणाम होतो. राष्ट्राच्या विकासात शिक्षक व विद्यार्थ्यांचा सर्वांपेक्षा अधिक वाटा असतो, हे विसरता येणार नाही. शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे खरे तर शिक्षकाची प्रतिष्ठा वाढायला पाहिजे; पण आज शिक्षकांना पूर्वीसारखी प्रतिष्ठा आहे, असे दिसत नाही. 'मास्तर' म्हणून त्याची भलावण केली जाताना आपण बघतो. याला जबाबदार शिक्षक की समाज ? याचाही शोध घेतला पाहिजे.

समाजाकडून आपली उपेक्षा होतेय, याचे दुःख करीत बसण्यापेक्षा आपला दर्जा सुधारण्याचा प्रयत्न शिक्षकांनी करावा, असे मला वाटते. आज क्रमिक पुस्तकांशिवाय इतर पुस्तकांचे वाचन करण्याची आवड किती जणांना आहे ? आणि इतर पुस्तके वाचली तर पगारवाढ थोडीच होते ? की त्याचा तावडतोब काय फायदा मिळणार आहे ? जो हाडाचा शिक्षक आहे, तो असे प्रश्न मनात न आणता आपले वाचन वाढवीतच असतो. ज्याचे मन दुसऱ्या व्यवसायात गुंतलेले आहे, असा शिक्षक शाळा–कॉलेजात हजेरी लावून क्रमिक पुस्तकेच विद्यार्थ्यांपुढे ठेवतो. विद्यार्थ्यांच्या पदरात किती पडले, काय पडले, याचा फारसा विचार केला जात नाही. आजच्या विद्यार्थ्यांनाही पदरात काही पाडून घेण्याची फारशी गरज आहे, असे वाटत नाही. त्यांचा प्रश्न परीक्षेत पास होण्यापुरता मर्यादित असतो. वर्गात कोरे राहिलेले विद्यार्थी मग ट्यूशन किंवा गाईडच्या आधीन होतात. शिकवणी देणारे व गाईड लिहिणारे काहीजण शिक्षकाचा व्यवसाय केलेले असतात. काही जण शिकवणी करण्यासाठी शिक्षकी पेशा सोडतात, असे ऐकण्यात येते. अशांच्या दृष्टीने शिक्षकी पेशातला अपुरा पगार, हेही कारण असू शकेल ? पण प्रपंच चालवण्यापुरता पगार प्रत्येक नोकरदाराला मिळतो. त्यात शिक्षकही अपवाद नाही; पण काहींची श्रीमंत होण्याची मनीषा असेल, तर या व्यवसायात अशक्यच म्हणावे लागेल.

प्रामाणिकपणे वागून या व्यवसायात शिक्षकाला ज्ञानाने, मनाने फार तर श्रीमंत होता येईल, अशा शिक्षकाचा कुठलाही समाज व राष्ट्र मानसन्मान करील, यात शंका नाही; पण मानसन्मान मिळविण्यासाठी शिक्षकाने खऱ्या अर्थाने गुरुपद मिळवायला पाहिजे. गुरू होणे तेवढे पैसे मिळविण्याइतके सोपे नाही. गुरूत संतपणाचे मिश्रण व्हावे लागते. संतपणा अवगत करणे तर त्यापेक्षाही कठीण. 'संत जेणे व्हावे । तेणे जग बोलणे सोसावे ।' आम्हाला कुणाचे बोलणे आज सहन होत नाही; कारण आम्ही आत्मकेंद्रित झालो आहोत. माझ्याशिवाय दुसरे काही नाही ही भावना आजच्या शिक्षणाने वाढीस लागली आहे. सहेतुकपणे दुसऱ्यास डिवचण्याची प्रवृत्ती बोकाळते आहे. माणसे एकमेकांचा द्वेष करू लागली आहेत. त्यामुळे कलहाचे वातावरण समाजात वाढत असलेले दिसते.माणसे एकमेकांशी फुकटचं नीट बोलायला तयार नाहीत. अशा वेळी विद्यार्थ्यांबरोबर समाजाला अनुरागाचा मार्ग

दाखविणारे गुरूचे मन असलेले शिक्षक पाहिजेत. 'विश्वची माझे घर।' या संत-वचनाची जाणीव मनात ठेवून शिक्षकांवर जरी समाजाकडून हल्ला झाला तरी तो थोपविला पाहिजे. थोडक्यात शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचे नाते कौटुंबिक असायला पाहिजे.

ज्या गावात, समाजात शिक्षक वावरतो, तेथे त्याला उपरेपणाची वागणूक दिली जाऊ नये. काही ठिकाणी हितसंबंधी मंडळी शिक्षकाला आपला / गावचा नोकर या भूमिकेतून वागवताना दिसतात. येनकेन प्रकारे आपला त्याच्यावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असतो. अशा शिक्षकांकडून राष्ट्र उभारणीचे व भावी समाज घडविण्याचे कार्य कसे होऊ शकेल ? ज्या राष्ट्रात स्त्रीचा सन्मान होतो, ते राष्ट्र संपन्न होते, असे म्हटले जाते. तद्वतच ज्या समाजात शिक्षकाचा सन्मान केला जातो, तो प्रगतीकडे जातो, असे मला वाटते; म्हणून समाजाकडून शिक्षकाला सहानुभूतीची वागणूक मिळणे अवश्य ठरते. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यांची आपणास जितकी आवश्यकता आहे, तितकीच समोरच्या माणसासही आहे ही जाणीव ज्या वेळी प्रत्येकाच्या मनात निर्माण होईल, तेव्हा शिक्षक व समाजाचा संवादी सूर लागेल, असे वाटते. यासाठी शिक्षकांनी आपले चारित्र्य विकसित करून विद्यार्थ्यांचे नैतिक बळ वाढविणारे, तसेच उपजीविकेबरोबरच त्यांची 'मानवता' जागृत करणारे शिक्षण दिले पाहिजे; तरच काहीसा निर्भय व परिपूर्ण समाज घडण्यास मदत होईल.

आपल्या मुलाचे शाळेत नाव दाखल केले, पाटी–पुस्तके घेऊन दिली, फी भरली, की आपली जबाबदारी संपली, एवढ्यावरच पालकांनी समाधान मानू नये. हायस्कूलपर्यंत विद्यार्थ्याचे मन अतिसंस्कारक्षम असते. चांगल्या गोष्टी याच वेळी विद्यार्थी आत्मसात करतात. या वेळचे योग्य संस्कार त्यांना जन्मभर पुरतात; म्हणून शिक्षकांबरोबरच विद्यार्थ्याकडे त्यांच्या आई–वडिलांचेही बारकाईने लक्ष असणे आवश्यक ठरते. आपला मुलगा शाळेत जातो का ? तेथे काय शिकतो ? तो कसा वागतो ? याचेही पालकांनी अवलोकन करणे जरुरीचे आहे. या उलट 'सुटली शाळा, बरं झालं. जा, जनावरांना पाणी पाज. शेतात भाकरी घेऊन जा. बाजारातून भाजी घेऊन ये.' अशा प्रकारची कामे शक्यतो टाळून त्याचे मन अभ्यासात कसे रमेल, गुंतून राहील, याची काळजी घेणे फायदेशीर ठरते. याचा अर्थ फावल्या वेळात विद्यार्थ्याने काही काम करू नये, असा होत नाही. काही विद्यार्थी कामे करून शिकतात. आपल्या कुटुंबाचे व राष्ट्राचेही नाव द्विगुणित करतात; त्यामुळे उद्योग व शिक्षण 'यांचीही सांगड शिक्षकाला व विद्यार्थ्याला घालता आली पाहिजे.

आजच्या शिक्षणप्रणालीत काहीएक बदल होणे सर्वांच्या हिताचे ठरेल. मातृ-

भाषेतून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले तर कुठलाही विषय जड वाटणार नाही. त्याचबरोबर जागतिक भाषा व प्रादेशिक भाषा व्यवहारासाठी अवगत असणे हिताचे ठरते. दुसरा एक विचार म्हणजे, पोथीनिष्ठ शिक्षण आता बंद झाले पाहिजे. काल्पनिक देवदेवता, अंधश्रद्धा व विघातक रूढींचे चित्रण असलेले धडे विद्यार्थ्यांच्या माथी मारू नयेत. आपण एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करतो आहोत. त्या दृष्टीने वास्तवाचे दर्शन घडविणारे विज्ञाननिष्ठ भूमिकेतून शिक्षण दिले गेले पाहिजे. त्याचबरोबर प्राचीन परंपरेत जे जीवनावश्यक, त्रिकालाबाधित, सर्वांच्या हिताचे, मानवी जीवनात मांगल्य निर्माण करणारे जे असेल, त्याचा योग्य रीतीने अभ्यासक्रमात समावेश करावा. राष्ट्राभिमान व प्रेम वाढीस लागावे, यासाठी राष्ट्रासाठी प्राणार्पण केलेल्या महापुरुषांचे उदात्तीकरण न करता तेजस्वी चरित्र अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या पुढे ठेवले गेले पाहिजे. प्रत्यक्ष अनुभूती व अनुभवाच्या पातळीवर शिक्षण देण्यावर कटाक्ष असावा. या तयारीने शिकविण्याची क्षमता शिक्षकाने निर्माण केली पाहिजे, तरच घोकंपट्टी न करता कुठलाही विषय विद्यार्थ्यांच्या लक्षात राहील. मैत्री, करुणा, सेवाभाव व शिस्तीचे पाठ या काळातच विद्यार्थ्यांना मिळाले तर जीवनातील संकटाला ते आत्मविश्वासाने सामोरे जाऊ शकतील. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्यांच्या शारीरिक उन्नतीकडेही लक्ष दिले पाहिजे; कारण सुदृढ शरीरातच सुदृढ मन वास करते. मन चांगले तर जग चांगले. जग सुंदर दिसू लागले को शिक्षकाने शिक्षणाचे उद्दिष्ट गाठले, असे म्हणता येईल.

४

मराठीतील दलितेतर लेखकांचे दलित जीवनावरील साहित्य व दलित जाणिवा

आज मराठीत वेगवेगळे साहित्यप्रवाह जोमाने सुरू असलेले दिसून येतात. 'दलित साहित्य' हे त्यांपैकीच एक आहे. दलित साहित्याने प्रचलित मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली; तसेच इतर साहित्यप्रवाहांच्या मानाने आपले वेगळेपणही सिद्ध केले आहे.

'काही तरी तरावया गावे,' हा प्राचीन साहित्याचा हेतू आधुनिक साहित्यात लोप पावला आणि साहित्य परमार्थाऐवजी लौकिक विषयाकडे झुकले. सद्य: जीवनाविषयीची जाणीव आधुनिक साहित्यात दृढ होऊ लागली. माणसाचे जीवन, त्याचे जगणे याला या साहित्यात महत्त्व येऊ लागले. 'देव दानवा नरे निर्मिले। नरेचि केला हीन किती नर' या कवी केशवसुतांच्या जाणिवेचे सहृदय माणूस चिंतन करू लागला. केशवसुतांच्या या प्रकारच्या नव्या जाणिवांनी एकंदर मराठी साहित्य निर्माण होऊ लागले म्हटले तरी चालेल. महायुद्धांचा जागतिक साहित्यावर जसा परिणाम झालेला आहे, तसाच भारतीय स्वातंत्र्याच्या क्रांतीचाही परिणाम येथील समाजजीवनावर व पर्यायाने साहित्यावरही झालेला आहे; म्हणून स्वातंत्र्यानंतर मराठी साहित्यात वेगळे चित्रण होऊ लागले. त्यातल्या त्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची पहिली पिढी लेखन करायला लागल्यानंतर मराठी साहित्याच्या क्षेत्रातील

अनुभवक्षेत्र बदलले. ह्या बदलाचा एक महत्त्वाचा आविष्कार म्हणजे दलित साहित्याची निर्मिती होय.

शिक्षणाचा लाभ झालेला दलित वर्गातील लेखक दलितांवर लादल्या गेलेल्या अन्यायाची व दुःखाची मीमांसा करू लागला व स्वाभाविकपणे त्याने विद्रोहाच्या व प्रक्षोभाच्या जाणिवेतून दलित जीवनाचे चित्रण करून साहित्याची निर्मिती करावयास प्रारंभ केला; पण दलित जीवनाचे चित्रण केवळ दलित लेखकांनीच केलेले आहे, असे नाही तर विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून काही दलितेतर लेखकांनीही काहीएक प्रमाणात त्यांच्या कथा–कादंबऱ्या व नाटकांतून दलितांचे चित्रण केलेले आहे.

दलितेतरांचे दलित जीवनावरचे साहित्य समजून घेण्याकरिता दलित जाणीव म्हणजे काय ? हे लक्षात घेतले पाहिजे. त्यासाठी दलित साहित्याचे स्वरूप व त्याच्यापाठीमागील प्रेरणांचा थोडक्यात विचार करावा लागेल. दलित साहित्याचा उदय होऊन आज पाव शतक होत आहे. अनुभव व अभिव्यक्तीने दलित साहित्य वरचेवर सकस होत चालले आहे. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व त्यांच्या विचारांची जाण दलित साहित्यिकांना ठेवणे भाग आहे. दलितांमध्ये सुधारणा घडून याव्यात, शिक्षणाचा प्रसार व्हावा, सवर्णांनी दलितांना माणसासारखे वागवावे, दलितांचे दुःख व दैन्य नाहीसे व्हावे, धर्म व जातीच्या नावाने त्यांची होणारी पिळवणूक व अन्याय, अत्याचार नाहीसा व्हावा यासाठी त्यांच्या पूर्वी व त्यांच्या समकालीन कार्य करणाऱ्या महात्मा जोतिबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांचेही कार्य दलित साहित्याच्या निर्मितीस उपयोगी पडलेले आहे; पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतःच अस्पृश्य समाजात जन्माला आल्यामुळे व या समाजाला सहन कराव्या लागणाऱ्या दाहक अनुभवांचे चटके त्यानी सहन केले होते; त्यामुळे या सर्वांपेक्षा डॉ. आंबेडकरानी दलितांमध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटविण्याचे कार्य अधिक जोमाने केले; म्हणूनच डॉ. आंबेडकरांशिवाय दुसरा कोणी आपला उद्धारकर्ता नाही, ही जाणीव दलितांमध्ये निर्माण झाली.

डॉ. आंबेडकरानी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्था, महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह, त्यांनी चालविलेली नियतकालिके तसेच घेतलेली बौद्ध धम्माची दीक्षा इ. लहानमोठ्या घटनांचा दलितांच्या मनावर व जीवनावर विशेष परिणाम होऊन ते दलितांचे जीवन बदलण्यास प्रेरक ठरले; त्यामुळे १९६५ नंतर लिहिलेल्या दलित साहित्याची ते प्रामुख्याने प्रेरणा ठरतात. अलीकडे महाकारुणिक गौतम बुद्ध व मार्क्स यांच्या विचारांनुसारही दलित साहित्यात चित्रण होताना आढळते. दलित साहित्याचा विषय प्रामुख्याने दलित

जीवन असल्यामुळे प्रथम दलित म्हणजे काय, ते बघावे लागेल.

' दलित म्हणजे अनुसूचित जातिजमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जाती, आदिवासी इ. ' असे नामदेव ढसाळ म्हणतात, तर ' केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे, तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत, ते सर्व दलित होत, ' असे डॉ. म. ना. वानखडे म्हणतात, तर ' हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय होत आलेला आहे, अशा अस्पृश्य व हरिजनांनाच ' दलित ' शब्द लावावा आणि याच वर्गातील साहित्यिकांनी लिहिलेल्या लिखाणास ' दलित साहित्य ' म्हणावे, ' असे प्रा. केशव मेश्रामाना वाटते. या व्याख्यांना पूरक असे दलित जाणिवेविषयी मत मांडताना डॉ. गो. मा. पवार म्हणतात, ' अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातीत जन्म घेतलेल्या लेखकांनी प्रकट केलेल्या तदानुषंगिक जाणिवेला माझ्या मते दलित जाणीव म्हणावं. ' दलित व दलित जाणीव म्हणजे काय ? याचा विचार केल्यानंतर दलित साहित्य म्हणजे काय, ते विचारात घेऊ.

' दलितांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभ व विद्रोही साहित्य म्हणजे दलित साहित्य होय, ' असे डॉ. म. ना. वानखडे म्हणतात; तर ' दलितांनी दलितांसाठी लिहिलेले साहित्य नव्हे, तर दलित संवेदनशीलतेतून जन्मलेले ते दलित साहित्य होय. ' असे गो. पु. देशपांडे म्हणतात.

' दलितांनी दलित जाणिवा लक्षात घेऊन सम्यक् परिवर्तनासाठी लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य, ' असे बाबुराव बागूल व प्रा. शरद्चंद्र मुक्तिबोध यांना वाटते, तर ' दलित साहित्यात सामाजिक व आर्थिक कोंडीमुळे संतप्त झालेल्या मनाचा आविष्कार व्यक्त होतो, ' असे पु. ल. देशपांडे व डॉ. ग्रामोपाध्ये यांना वाटते.

इथपर्यंत आपण दलित, दलित जाणीव व दलित साहित्य म्हणजे काय ते विचारवंतांच्या मतांचा मागोवा घेत विचारात घेतले आहे. केवळ अस्पृश्य जातीत जन्म झाल्यामुळेच दलित वर्ग हा सर्व दुःख-वेदनांचा वाटेकरी झाला, हे विचारवंतांच्या विचारातून स्पष्ट होते. भारतीय समाजात एका समाजघटकावर लादलेली अस्पृश्यता ही कृत्रिम समाजनिर्मित व एका वर्गाच्या स्वार्थासाठी निर्माण केलेली आहे; म्हणून या समाजव्यवस्थेने जपलेल्या व जोपासलेल्या रूढी, परंपरा, रीतिरिवाज व देवधर्म या कल्पनांविरुद्ध मानवतावादी दृष्टीने निषेध नोंदविणे, ही व्यापक सामाजिक स्वरूपाची प्रेरणा दलित साहित्यनिर्मितीच्या पाठीशी असल्याचे दलित साहित्याच्या अभ्यासकांना मान्य आहे.

दलितांच्या दुरवस्थेला सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक बाबीही कारणीभूत झालेल्या आहेत, असे डॉ. सदा कऱ्हाडे, डॉ. यशवंत मनोहर, वि. वा. शिरवाडकर व वसंत पळशीकर यांना वाटते. हे आंबेडकर व मार्क्सच्या विचारधारेनुसार दलित

साहित्याकडे बघतात; पण दलितांच्या वाटचाला आलेले दुःख व दारिद्र्य हे त्यांना मिळालेल्या अस्पृश्यतेमुळेच आलेले आहे, असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. प्रभाकर मांडे व प्रा. रा. भि. जोशी यांना वाटते. आतापर्यंतचे विवेचन ध्यानात घेतले, तर प्रक्षोभ, विद्रोह व दुःख या त्रयींच्या माध्यमातून दलित साहित्यात दलितांच्या जीवनाचे चित्रण होते, हे समजणे कठीण जाणार नाही.

जन्मजात अस्पृश्यता लादून या समाजव्यवस्थेने दलितांचा छळ केला. त्यांच्या अशा अवमानित जगण्याचे चित्रण करणे व या समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोहाची जाणीव प्रकट करणे, हा दलित साहित्याचा एक प्रमुख विशेष आहे. इथल्या समाजव्यवस्थेने दलितांना तुच्छतेची वागणूक दिली, दारिद्र्यात खितपत ठेवले; म्हणून या समाजरचनेबद्दल दलितांना चीड येणे, ही अत्यंत स्वाभाविक गोष्ट आहे; म्हणून ज्या ज्या सामाजिक, धार्मिक बाबींमुळे दलितांवर अन्याय–अत्याचार होत आहेत, त्या त्या बाबींविरुद्ध विद्रोह केला पाहिजे, ही भूमिका दलित साहित्य ही संज्ञा प्राप्त होण्यापूर्वी लेखन करणाऱ्या बंधु माधव, बाबुराव बागूल इ. दलित लेखकांच्या साहित्यात पाहावयास मिळते.

दलित साहित्यात जन्मजात अस्पृश्यतेबरोबरच दलितांच्या वाटचाला आलेल्या दारिद्र्याचेही चित्रण प्रभावीपणे केले जाते. या दृष्टीने अण्णाभाऊ साठे यांची ' स्मशानातील सोनं ' व बाबूराव बागूल यांची ' भूक ' ही कथा उल्लेखनीय आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या 'स्मशानातील सोनं' या कथेतील 'रेड्याचं वळ अंगी असलेल्या भीमाला मुंबईत फिरूनही काम मिळत नाही. तेव्हा त्याला स्मशानातील मढ्याच्या राखेत सोनं असतं, हा जगण्याचा एक अजब मार्ग सुचतो. त्यासाठी तो रात्रंदिवस स्मशानं पालथी घालतो. एका रात्री स्मशानात एकीकडे कोल्हे भीमाचे लचके तोडीत होते आणि त्याची दोन्ही बोटं प्रेताच्या दातांत अडकून बसली होती. बोटं बाहेर काढण्यासाठी भीमा प्रेतावर प्रहार करीत ओरडू लागला, ' भडव्या सोड मला. ' शेवटी भीमाला बोटं गमवावी लागली. '

बाबूराव बागूलांच्या ' भूक ' कथेत गरीब भागू कोळिणीची सतत पडणाऱ्या पावसाने त्रेधा उडाली आहे. थोडा पाऊस थांबल्यानंतर ती नदीवर मासे धरायला जाते. मुले पावसात वाहत आलेल्या सापाची खेळतात. थोड्या वेळाने मुलांना पाहिजे असलेला आहिर मासा मिळाल्यानंतर ते घरी येतात. रात्री आहिर मासा खाऊन झोपल्यानंतर भिकाला नदीत पळवून लावलेला साप चावल्याचे स्वप्न पडते. तो जागा झाल्यानंतर आईला सांगतो. तेव्हा साप चावून आई मेल्याचे तिला आठवते. आपण व मुलांनी आहिर मासा खाल्ला नाही, तर सापच खाल्ला, या भीतीने भागू कोळीण मरते. दारिद्र्याने दलितांच्या संवेदना कशा नष्ट होतात, याचे प्रभावी चित्रण या कथेत येते.

'आपली भूक भागविण्यासाठी कुत्र्याच्या तोंडातील मांसाचा तुकडा काढण्याचा लहानगा प्रल्हाद प्रयत्न करतो व त्याला कुत्रा चावतो,' असे हृदयद्रावक चित्रण प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात येते.

अस्पृश्य जातीत जन्म झाल्यामुळे दलितांना कसे अवमानित जिणे जगावे लागते, याचे अनेक दलित लेखकांच्या साहित्यातून प्रभावीपणे चित्रण केलेले आढळते. 'गणा खोताच्या पोराला 'पाणी वाढा,' अशी विनवणी करीत नकळत त्याच्या मातीच्या भांड्याला अशोक शिवतो. तेव्हा त्याला खोताचा मुलगा जिवे मारतो,' असे योगीराज वाघमारे यांच्या 'प्रायश्चित्त' या कथेत चित्रण येते.

'दादू महाराचा मुलगा शिकून–सवरून आपल्या गावाकडे जाणाऱ्या बैलगाडीत बसतो. गाडीवानाला बोलताना दादू महाराच्या मुलाची जात माहीत होते. तेव्हा तो त्याचे सामान गाडीच्या खाली फेकून देत शिव्या देतो,' असे अविनाश डोळस यांच्या 'शिक्षण बोंब मारतं' या कथेत चित्रण येते.

दलित साहित्याचे स्वरूप व दलित जाणिवा लक्षात घेतल्यानंतर आपण दलितेतर लेखकांच्या दलित जीवनाचे चित्रण असलेल्या साहित्याचा थोडक्यात विचार करू. १९२५ पासून ते आतापर्यंत बऱ्याच दलितेतर लेखकांनी त्यांच्या साहित्यातून दलितांच्या जीवनाचे चित्रण केलेले पाहावयास मिळते. सुरुवातीच्या काळात दलितांच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या श्री. कृ. कोल्हटकर, वा. म. जोशी, साने गुरुजी, वि. स. खांडेकर, वि. वा. हडप, ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. व्यं. केतकर, ना. सी. फडके, र. वा. दिघे इ. दलितेतर लेखकांवर म. गांधींच्या अस्पृश्यता निवारण चळवळीचा वैचारिक प्रभाव पडलेला आहे; त्यामुळे त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्याच्या प्रबोधनाच्या हेतूने दलितांच्या जीवनाचे चित्रण केलेले पाहावयास मिळते, म्हणून या लेखकांच्या साहित्यात दलित लेखकांप्रमाणे दलित जीवनांची प्रमुख वैशिष्ट्ये चित्रित होत नाहीत; कारण या लेखकांना दलित जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव नाही; म्हणून त्यांनी दलितांच्या जीवनाचे कल्पनेने चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

दलितांच्या जीवनाविषयी सद्भावना या दलितेतर लेखकांच्या मनात होती. अस्पृश्यता नष्ट होऊन दलितांची स्थिती सुधारली जावी, अशी तळमळ सदर लेखकांच्या ठिकाणी होती; म्हणून ते आपल्या साहित्यात दलित जीवनाचे चित्रण करण्यास प्रवृत्त झालेले आहेत.

दलितांच्या जीवनाचे चित्रण करणारी श्री. कृ. कोल्हटकर यांची 'श्यामसुंदर' ही पहिली कादंबरी आहे. जातिभेद नष्ट व्हावेत, ही इच्छा कोल्हटकरांच्या मनात असल्यामुळे ब्राह्मणवर्गीय श्यामला नाना मराठे बनवून दलित वस्तीत

सुधारणा घडवून आणण्यासाठी ते पाठवितात. दलित वस्तीतील लोकांत मिळून-मिसळून जातिभेद मोडण्याचा प्रयत्न करणारा पहिलाच नायक कोल्हटकरानी चित्रित केलेला आहे, तर वि. स. खांडेकरांच्या 'दोन मने' या कादंबरीत जन्माने ब्राह्मण, पण एका महाराने सांभाळ केला म्हणून तो महार झालेला 'श्री' हा नायक चित्रित होतो; पण तो दलितासारखा वाटतच नाही. कादंबरीत दलितपणाच्या कुठल्याच वेदना त्याला भोगाव्या लागत नाहीत. तो कॉलेजमध्ये शिकतो. क्रिकेट-सारख्या खेळात तो प्रवीण आहे. एवढेच नव्हे, तर उच्चवर्णीय सिनेमा नटीच्या प्रेमातही पडतो; पण कादंबरीच्या शेवटी बाबासाहेब आंबेडकरांच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या प्रभावाने खांडेकर प्रभावित होऊन की काय, त्याला गावच्या देवीच्या देवळासमोरील तळ्याच्या सत्याग्रहाला पाठवून आपल्या ध्येयाची पूर्ती करून घेतात; म्हणून सदर कादंबरीत दलितांच्या वास्तव जीवनाचे चित्रण येत नाही.

या काळातील वर उल्लेखिलेले इतर दलितेतर लेखकही दलितांच्या घरा-दारांचे, त्यांच्या उद्योगधंद्यांचे तसेच त्यांच्या राहणीमानाचे व भाषेचे चित्रण फारसे करीत नाहीत व केले तरी ते कमी पडतात; कारण दलितांच्या जीवनाचे चित्रण करण्यापाठीमागे त्यांचा उद्‌बोधनाचा हेतू आहे. दलितेतर लेखकांच्या दलित जीवनाच्या चित्रणात काही उणिवा राहण्याचे कारण म्हणजे दलित व दलितेतर या दोन वर्गांत सामाजिक दृष्ट्या या कालखंडात फार मोठे अंतर होते; त्यामुळे दलितेतरांना दलितांचे जीवन व त्यांचे अंतरंग जवळून माहीत होणे कठीण होते. दुरून दलितांची घरे कशी दिसतात ते त्यांनी पाहिले होते; म्हणून त्यांच्या चित्रणात तेवढीच नोंद होते; त्यामुळे दलितांचे वास्तव जीवन या लेखकांना चित्रित करता आलेले नाही व ते करता येणेही कठीण होते.

ना. सी. फडके यांच्या 'प्रतिज्ञा,' ग. ल. ठोकळ यांच्या 'गावगुंड,' र. वा. दिघे यांच्या 'सराई' या कादंबऱ्यांतून दलितांच्या जीवनाचे चित्रण रंजनाच्या व विषयवैचित्र्य आणण्याच्या हेतूनेच केल्यासारखे वाटते.

स्वातंत्र्यानंतर आपल्या साहित्यातून दलितांच्या जीवनाचे यथायोग्य चित्रण करणारे विभावरी शिरूरकर आणि व्यंकटेश माडगूळकर हे दोनच दलितेतर लेखक दिसून येतात. या काळात समाज प्रबोधनामुळे दलित व दलितेतर या दोन वर्गांत सामाजिकदृष्ट्या अंतर कमी होऊ लागले होते; त्यामुळे परस्परांच्या जीवनाची काहीएक प्रमाणात ओळख होऊ लागली होती. तसेच दलितेतर लेखक दलितांत मिळून मिसळून काम करीत होते. या दृष्टीने विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' या कादंबरीत आबा नावाच्या मांग–गारूडयाच्या मुलाची त्याच्या अस्पृश्य जातीमुळे व दारिद्र्यामुळे कशी वाताहत होते, याचे प्रभावी चित्रण आलेले पाहावयास मिळते.

तसेच व्यंकेटश माडगूळकरांच्या अनेक कथांतून दलितांच्या जीवनाचे विविधांगांनी चित्रण झालेले पाहावयास मिळते. त्यानी दलित साहित्य ही संज्ञा प्राप्त होण्यापूर्वी लिहिलेल्या 'देवा सटवा महार,' या कथेत पहिल्यांदा विद्रोह प्रकट होतो. 'विनाकारण' शिव्या देणाऱ्या देवी डॉक्टराला देवा म्हणतो, 'ये बांवलीच्या, चावडीच्या खाली ये म्हणजे तुझे तोंड खेटराने फोडतो.' माडगूळकरानी दलितांचे दारिद्र्य, त्यांचा होणारा भावनिक कोंडमारा, दलितांच्या स्वभावासह अनेक कथांतून चित्रित केला आहे; पण याच काळातल्या रणजित देसाई यांच्या 'बारी' वा. भ. बोरकर यांच्या 'भावीण,' दुर्गा भागवत यांच्या 'महानदीच्या तीरावर,' या कादंबऱ्यांतून व पु. भा. भावे, अरविंद गोखले यांच्या कथांतून दलितांच्या जीवनाचे रोमँटिक व भडक स्वरूपात चित्रण आलेले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर दलित लेखकांच्या बरोबर दलितेतर लेखकांनीही बऱ्याच प्रमाणात दलितांच्या जीवनाचे चित्रण केलेले पाहावयास मिळते. दलित समाजात झालेल्या जागृतीमुळे व त्यांच्या अनेक चळवळींनी दलितेतर लेखकही प्रभावित झाला; त्यामुळे या काळात जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक व अरुण साधूंसारखे दलितेतर लेखक दलितांच्या जीवनाचे चित्रण करण्यास पुढे सरसावले. हे लेखक बहुतेक पत्रकारितेचा व्यवसाय करणारे होते; त्यामुळे त्यांनी आपल्या साहित्यात शहरातील झोपडपट्टीतून राहणाऱ्या दलितांच्या जीवनाचे चित्रण केलेले पाहावयास मिळते; पण हे चित्रण वर्तमानपत्रीय कुतूहल भागविण्याच्या दृष्टीने केलेले आहे, असे वाटते. त्यामुळे दलितांच्या अंतर्गत जीवनाचे व त्यांच्या भाषेचे चित्रण त्यांना फारसे करता आलेले नाही.

मधु मंगेश कर्णिक यांची 'भाकरी आणि फूल' व अरुण साधू यांची 'त्रिशंकू व बहिष्कार' या कादंबऱ्या अपवाद आहेत. या कादंबऱ्यांत अल्पप्रमाणात का होईना, दलितांच्या चळवळीचे, त्यांच्या बदलत जाणाऱ्या मानसिकतेचे प्रभावी चित्रण येते. या कादंबऱ्यांतून वास्तवातील दलित माणसासारखे नायकही कल्पिले आहेत. त्यांचे बोलणे–वागणे दलित वृत्तीला अनुसरून चित्रित करण्यात हे लेखक काहीएक प्रमाणात यशस्वी झालेले आहेत; पण याच लेखकांवर लेखन करणारे महादेव मोरे, र. वा. दिघे, आनंद यादव, गो. नी. दांडेकर, शंकर पाटील, चंद्रकुमार नलगे इ. दलितेतर लेखक दलितांतील निरनिराळ्या जातींच्या माणसांचे चित्रण करीत असूनही दलितांच्या जीवनाचे यथार्थ चित्रण त्यांना करता आले नाही. हे लेखक आपापल्या लेखनपिंडानुसार व संवेदनशीलतेनुसार दलितांच्या जीवनाचे चित्रण करताना दिसतात. काही लेखकांचा लेखनस्वभाव हा भडक, सनसनाटी, लैंग्य चित्रण करण्याचा प्राधान्याने असतो. असे लेखक जेव्हा दलित जीवनाचे चित्रण करू पाहतात, तेव्हा दलित जीवनातील विदारक भागाचे चित्रण करण्याऐवजी

त्यांच्या जीवनातील लैंग्य व भडक असा भागच ते चित्रणविषय म्हणून निवडताना दिसतात. त्यामुळे जयवंत दळवी (चक्र) व मधु मंगेश कर्णिक (माहीमची खाडी) या कादंबऱ्यांत स्त्री-पुरुष संबंधानाच महत्त्व दिलेले आढळते.

या दृष्टीने जयवंत दळवींच्या 'चक्र' या कादंबरीतले उदाहरण पहा: 'उकिडवी बसलेली अम्मा शरीराचा सारा भार हातातल्या दगडावर देऊन झटापट खोबरं-मिरच्यांचे वाटण करीत होती; त्यामुळे तिचा नितंब पसरट दिसत होता. पाटयावर वरवंटा सरकवण्यासाठी दिलेल्या प्रत्येक हिसक्याबरोबर तिचे सुटे गुबरे स्तन टक्टक् हालत होते.' (पृ. ४२)

मधु मंगेश कर्णिक यांच्या 'माहीमच्या खाडी 'तीलही चित्रण अशाच प्रकारचे आहे.

'कामाठीपुऱ्यात भिका आपली बहीण जयावरोबर गेला असताना तोंड रंगवलेली एक तरुण मुलगी त्याला लगट करीत म्हणते, 'चलो न देखो कैसी टाईट हूँ... ' तिने आपला पदर वर केला व भिकाचा हात धरून आपल्या छातीवर ठेवला.' (पृ. ८९)

आनंद यादवांच्या 'नटरंग' या कादंवरीत गुणा नावाच्या नाच्यावर जयसिंगरावांच्या माणसांकडून बलात्कार होतो, असा सनसनाटी विषय निवडला आहे. देवदासी व भावीण अनेकांच्या भोगांना बळी पडते, अशा वाचकांच्या आवडीचा विषय महादेव मोरे, रणजित देसाई व राजन गवस निवडतात. रणजित देसाई यांच्या 'समिधा' या कादंबरीत मुक्तावर होणाऱ्या बलात्काराचे चित्रण येते. र. वा. दिघे यांच्या 'कार्तिकी' या कादंबरीत कार्तिकीची गावातून नग्न धिंड काढणे व ती गरोदर कुणापासून राहिली हे कौल लावून पाहणे, तसेच गणेश आवटे यांच्या 'गणगोत' या कादंबरीत मांग जातीतील स्त्रिया बाहेरख्याली असल्याचे चित्रण येते. अशा प्रकारचा रंजक मालमसाला वापरूनच या दलितेतर लेखकांनी दलितांच्या जीवनाचे चित्रण केलेले पाहावयास मिळते; पण या लेखकांवरोबरच लेखन करणारे चारुता सागर व भास्कर चंदनशिव हे मात्र दलितांच्या जीवनाचे विविधांगांनी व प्रत्ययकारी चित्रण करतात. यांच्यासारखे दलितेतर लेखक अपवादच म्हणावे लागतील.

शेवटी दलितेतर लेखकांनी दलितेतरांच्या नजरेतून पाहिलेला दलित वर्ग असेच त्यांनी केलेल्या चित्रणाला स्वरूप प्राप्त होते, असे म्हणावे लागेल. दलित लेखक आपल्या साहित्यातून 'स्व'चा शोध घेत असतो; म्हणून दलितेतर लेखकांच्या चित्रणापेक्षा तो वेगळे चित्रण करू शकतो. चित्रणविषय व चित्रण करणारा दलित असल्यामुळे दलित लेखकाच्या साहित्याला जिवंतपणा व वास्तवता प्राप्त होते.

जन्मजात अस्पृश्यतेचा अनुभव दलित लेखकांना असल्यामुळे त्यांना आलेल्या अनुभवांचे ते स्वाभाविकपणे जिवंत व प्रत्ययकारी चित्रण करू शकतात; पण दलितेतर लेखकांना जन्मजात दलितत्वाचे दुःख काय असते, याचा अनुभव असत नाही; म्हणून त्यांना अस्पृश्यतेच्या व्यथा-वेदनांचे चित्रण करता येणे कठीण असते.

दारिद्र्यामुळे होणारी उपासमार, हालअपेष्टा व त्यामुळे जीवनाची झालेली परवड दलितेतर लेखकांना भोगावी लागली नसल्यामुळे दलितांच्या दारिद्र्याच्या दाहकपणाची प्रत्यक्ष अनुभूती त्यांना असू शकत नाही; त्यामुळे दुरून दिसणाऱ्या दारिद्र्याचे दलितेतर लेखक चित्रण करू शकले तरी दलित ज्या मानसिक पातळीवर वेदना अनुभवतात, त्याचे चित्रण दलितेतर लेखकांना करता येणे शक्य नसते.

दलितांच्या राहणीमानाची व त्यांच्या व्यवसायांची दुरून माहिती दलितेतर लेखकांना असू शकते; पण त्यांना कोणत्या अवस्थेत राहावे लागते, त्यांची आंतरिक दुःखे कोणती, हे दलित लेखकच वास्तवपणे मांडू शकतो. दलितेतर लेखकांना अंतर्गत जीवनाची माहिती नसते; त्यामुळे या वैशिष्ट्याचेही ते प्रत्ययकारी चित्रण करू शकत नाहीत.

हजारो वर्षे इथल्या समाजव्यवस्थेने अस्पृश्य म्हणून दलितांवर पशूपेक्षाही भयंकर अन्याय-अत्याचार केलेले आहेत, हे दलित लेखक विसरू शकत नाही; म्हणून या समाजव्यवस्थांविरुद्धची चीड त्यांच्या मनात असते. त्या चिडीपोटी तो दलितांवरील अन्याय-अत्याचारांचे चित्रण करतो. अशा चित्रणात देवधर्म व समाजव्यवस्था नाकारण्याची व तिच्याविरुद्ध बंड करण्याची विद्रोही जाणीव दलित लेखकाच्या साहित्यात येते. ही जाणीव घेऊन दलितेतर लेखकाला दलितांच्या जीवनाचे उत्कट चित्रण करता येणे कठीण असते; कारण दलितांच्या मनःपिंडाचे यथार्थ आकलन दलित लेखकालाच असू शकते; परंतु दलितांविषयी व्यापक सहानुभूती व मानवतावादी दृष्टी असणारे व्यंकटेश माडगूळकर, मधु मंगेश कर्णिक व चारुता सागर यांसारखे दलितेतर लेखक काहीएक प्रमाणात दलितांच्या अंतरंग जीवनाचे प्रत्ययकारी व हृदयस्पर्शी चित्रण करू शकतात. बाकीच्यांना मात्र दलित जाणिवांनुसार चित्रण करणे शक्य होत नाही.

५

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील शेवटचे दिवस

महापुरुषांचे सगळे जीवनच क्रांतीमय असते. स्वतःसाठी थोडे आणि इतरांसाठी जास्त अशा वृत्तीने असे महापुरुष जीवन जगत असतात; म्हणून अशा व्यक्ती स्वतःच्या माणसांच्या कमी व इतरांच्या हक्काच्या, मालकीच्या त्या होतात. जात–धर्म–स्थल–काल यांतून त्या बाहेर पडलेल्या असतात. डॉ. आंबेडकर हेही अशाच महापुरुषांपैकी एक होते. त्यांची बरोबरी भारतातील नव्हे तर जगातल्या कोणत्याही पुरुषाशी करता येणार नाही. त्यांच्यासारखी व्यक्ती पूर्वीही कधी झाली नाही; आणि पुढेही होणार नाही; कारण ' महापुरुष जन्मास येताच त्याची मूस निसर्ग मोडून टाकतो, ' असे इमर्सन म्हणतो.

१९४६ ते १९५६ असा डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील शेवटच्या दहा वर्षांचा कालखंड येथे मला अभिप्रेत आहे. त्यांच्या जीवनाचा हा कालखंड अत्यंत खडतर आणि तेजस्वी असा आहे. या कालखंडात एक तर त्यांची प्रकृती त्यांना म्हणावी तशी साथ देत नव्हती. दुसरे म्हणजे, त्याना मनस्ताप होणाऱ्या अनेक घटना घडत होत्या. तशाही परिस्थितीत डॉ. आंबेडकरानी अदम्य विश्वासाने, धैर्याने, बंडखोर व निर्भीड वृत्तीने ' मोडेन पण वाकणार नाही ' या बाण्याने केवळ अस्पृश्यांसाठीच नाही तर भारतीयांसाठी अलौकिक कार्य करून भारताची मान जगात उंच ठेवण्याचे काम केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाच्या शेवटच्या कालखंडामध्ये बारीकसारीक पण अनेक महत्त्वपूर्ण अशा घटना घडलेल्या आहेत. या ठिकाणी मी काही प्रमुख घटनांविषयी लिहिणार आहे. त्यांच्या जीवनाच्या या कालखंडात घडलेल्या घटना सहजासहजी घडलेल्या आहेत, असे वाटत नाही. काही घटना बाबासाहेबांनी हेतुपूर्वक घडवून आणलेल्या आहेत, असे वाटते आणि त्यासाठीच जणू त्यांचे जीवन होते. या कालखंडात आतून–बाहेरून विरोध असतानासुद्धा ध्येयाची पूर्ती करणाऱ्या त्या तीन घटना म्हणजे १) भारतीय राज्यघटनेची निर्मिती, २) अस्पृश्य वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्था, ३) बौद्ध धर्माचा स्वीकार (धर्मांतर).

१९२७ च्या नंतर डॉ. आंबेडकरानी आपल्या समाजाच्या उद्धारासाठी प्रखर आंदोलन सुरू केले. आपली चळवळ न्यायपूर्ण व संघटितरीत्या चालावी म्हणून व आपल्या व्यक्तीला सरकारात प्रतिनिधित्व मिळून योग्य रीतीने लढा देता यावा, यासाठी १९३६ साली त्यानी ' स्वतंत्र मजूर पक्षा 'ची स्थापना केली; पण संपूर्ण देशात अशाच प्रकारचे व्यापक कार्य करणारी एखादी संघटना असावी; म्हणून त्यानी १९४२ साली ' अखिल भारतीय शे. का. फेडरेशन 'ची स्थापना करून राजकीय आंदोलनाचे एक अनोखे पर्व निर्माण केले. त्याच वर्षी महाराज्यपालानी आपल्या कार्यकारी मंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मजूरमंत्री म्हणून निवड केली. यापूर्वी भारताच्या इतिहासात कुठल्याही अस्पृश्य जातीच्या व्यक्तीला देशाच्या राज्यकारभारात महत्त्वाचे आणि मानाचे स्थान मिळाले नव्हते; त्यामुळे ही घटना भारताच्या इतिहासात अभूतपूर्वच म्हणावी लागेल. तेव्हापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा प्रज्ञासूर्य भारतीय राजकारणात आणखीच तेजाने तळपू लागला.

भारताची घटना तयार करण्याच्या समितीवर डॉ. आंबेडकर १९४७ साली बंगालमधून निवडून आले. एका सभेच्या वेळी ' जरी जाती नि पंथ अनेक असले तरी आपण एक राष्ट्र होऊ याविषयी माझ्या मनात संदेह नाही ' हे राष्ट्राचे ऐक्य अबाधित ठेवणारे डॉ. आंबेडकरांचे विचार ऐकून घटना समिती तयार करण्यासाठी जमलेल्या सदस्यांना मोठे नवल वाटले. त्यांना त्यांच्या विशाल मनाचा प्रत्यय आला आणि त्यांची घटना समितीचे सल्लागार म्हणून नियुक्ती केली गेली; पण काही दिवसांनी घटना समितीच्या अध्यक्षपदाची माळच त्यांच्या गळ्यात पडली. अशा रीतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार बनले. त्यानी सुरू केलेल्या मानवमुक्तीच्या चळवळीची सूत्रे आता बळकट होऊ लागली होती. भारतीय राज्यघटनेच्या आधारे तरी आपल्या अस्पृश्य बांधवांना राजकीय क्षेत्रात समान पातळीवर आणून ठेवण्याची संधी डॉ. आंबेडकराना या निमित्ताने लाभली.

हजारो वर्षांपासून अस्पृश्य वर्गाला घृणास्पद व अपमानित जीवन भोगावे लागले होते. डॉ. आंबेडकर स्पृश्यवर्गीय माणसापेक्षा जास्त शिकले होते, तरी त्यांची त्यातून सुटका झाली नाही. 'अस्पृश्यांना माणसासारखे वागवावे' असे सांगूनही हिंदुधर्मीय आपली अमानुष वृत्ती बदलण्यास तयार नव्हते. नरदेहाला कलंकभूत असलेली अस्पृश्यता त्याना नष्ट करायची होती. त्यानी पूर्वी म्हटले होते की, 'हिंदुधर्माने लादलेली ही गुलामगिरी – अस्पृश्यता – नष्ट करण्यात अपयशी ठरलो, तर मी स्वतःला गोळी घालीन,' ही प्रतिज्ञा पूर्ण करण्याची वेळ जवळ आली होती.

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; पण हे स्वातंत्र्य मिळाले कुणाला ? इंग्रज असतानाही अस्पृश्यांची स्थिती गुलामासारखीच होती. त्यांच्यापूर्वी हजारो वर्षे तीच परिस्थिती. यापुढेही शासनकर्ते दुसरे येतील; पण अस्पृश्यांची स्थिती तीच राहणार का ? अशाप्रकारचे विचार डॉ. आंबेडकरांच्या मनात येत असावेत ? भारतीय माणसाला मिळालेल्या स्वातंत्र्याचा समप्रमाणात उपभोग घेता यावा, म्हणून डॉ. आंबेडकरानी देशोदेशींच्या राज्यघटनांचा अभ्यास करून जगामध्ये श्रेष्ठ ठरलेली लोकशाही शासनप्रणाली भारताच्या राज्यघटनेमध्ये प्रतिपादिली. व्यक्तींना मूलभूत हक्कांची हमी दिली. व्यक्ती कितीही महान–लहान असो, गरीब–श्रीमंत असो, कोणत्याही जातिधर्माची वा पंथाची असो, कायद्यापुढे ती समान आहे. कायद्यानुसार धर्म–पंथ–जातीच्या नावाखाली एखाद्याला अस्पृश्य समजणे, हा कायद्याने गुन्हा आहे, याची ताकीद देऊन कायद्याने अस्पृश्यतेचे उच्चाटन केले.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी !' अशी स्त्री भारतीय संस्कृतीने, वर्णव्यवस्थेने अतिशूद्र समजून तिच्या विकासाचे सर्व मार्ग रोधून ठेवले होते. व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली 'हिंदू कोड बिला'च्या निमित्ताने राव कमिटीने केवळ दोनच कलमांचो सुधारणा दर्शविली होती. पण डॉ. आंबेडकरानी 'हिंदू कोड बिला'ची विविध अंगांनी तपासणो करून दत्तकविधान, घटस्फोट, उत्तराधिकार व पोटगीविषयीचा सर्वसमावेशक समान कायदा होण्याच्या दृष्टीने बिलाची पुनर्रचना केली; पण स्त्री–शूद्रांना नागविणाऱ्या हिंदुधर्ममार्तंडांनी बिलाला कसून विरोध केला. त्यात स्वामी करपात्रींचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. पुढे पंडित नेहरू यानी हे बिल थोडे थोडे करून संपूर्ण गाळले.

स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही प्रणित तत्त्वांवर भारतीय राज्यघटनेचा पाया मजबूत करण्याचा डॉ. आंबेडकरानी प्रयत्न केला. '२६ जानेवारी, १९५० रोजी आपण प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा स्वीकार करणार आहोत व त्यानंतर आपण ही घटना कशी राबवणार आहोत ?' अशाप्रकारचा प्रश्नही त्यानी

विचारला होता. राजकीय क्षेत्रात एक माणूस, एक मूल्य पाळले जाईल; पण इतर क्षेत्रांत कसे पाळणार ? 'लोकशाहीच्या चार मूल्यांची परस्पर फारकत झाली, तर लोकशाहीचा पराभव होईल व मोठ्या मेहनतीने घडविलेला राजकीय लोकशाहीचा महाल सामाजिक व आर्थिक क्षेत्रात ग्रस्त आणि त्रस्त झालेले लोक उद्ध्वस्त करून टाकतील,' असा डॉ. आंबेडकरानी त्या वेळी इशाराही दिला होता. डॉ. आंबेडकरानी राज्यघटनेच्या निर्मितीने अस्पृश्यता आणि गुलामगिरी नष्ट केलीच; पण तीमधून 'आदर्श माणूस' घडण्यासाठी मार्गदर्शनही केले आहे.

'गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून द्या; म्हणजे तो बंड करून उठेल' असे डॉ. आंबेडकर म्हणत; पण ते समजण्यासाठी शिक्षित माणसाची गरज असते. विद्येशिवाय माणसाला स्वतःची ओळख होऊ शकत नाही. विद्या (शिक्षण) मानवी जीवनात क्रांती घडवू शकते. अस्पृश्यांना शिक्षणापासून दूर ठेवल्यामुळेच तो हिंदू धर्ममार्तंडांची शिकार बनला. 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकात म. फुले म्हणतात 'विद्येविना मती गेली, मतिविना नीति गेली, नीतिविना गति गेली, गातिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले.' कारण शिक्षण घेण्याचा आणि देण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच मनूने दिला होता. या बाबतीत अस्पृश्य अपात्र होत, अशी शिकवण त्यांच्या गळी उतरविली होती. त्यामुळे 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' या वृत्तीने अस्पृश्य राहू लागला व हिंदुधर्मियांनी स्वार्थापोटी त्यांच्यावर दास्य लादून, त्यांना गुलामाचे जिणे जगण्यास भाग पाडले. शिक्षणावाचून अस्पृश्यांचे आत्मबल जागे होणार नाही, हे विद्येला 'उपास्यदेवता' मानणाऱ्या डॉ. आंबेडकरानी ओळखून १९४६ साली मुंबई येथे 'पीपल्स सोसायटी' नावाची शिक्षणसंस्था स्थापन करून 'सिद्धार्थ कॉलेज' सुरू केले. खेड्यापाड्यातील अस्पृश्य बांधवांना शिक्षण मिळावे, म्हणून १९५० साली औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविद्यालय' सुरू केले.

स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धार शिक्षणामुळेच घडून येणार आहे; म्हणून शिक्षणाच्या बाबतीत स्त्रियांनीही मागे राहू नये, असे ते सांगत. 'तुमच्या साडीला पन्नास ठिगळे असली तरी चालतील; पण ती स्वच्छ असली पाहिजे, याची काळजी घ्या. तुम्ही शिकलात तर पुष्कळच प्रगती साधेल,' असा स्त्रियांना त्यांचा संदेश आहे.परिश्रमपूर्वक अभ्यास करून उच्च शिक्षण मिळवावे आणि त्या शिक्षणाच्या जोरावर वैयक्तिक सुखसोयींवरोबरच आपल्या समाजाला समृद्ध व सन्मान्य कसे बनविता येईल यावर त्यांचा भर होता. शिक्षणामुळे मनविकास, त्याचवरोबर चारित्र्याचा विकास व समाजस्वास्थ्यही साधले जावे, असा त्यांचा कटाक्ष असलेला दिसतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्याविभूषित झाले तरी अस्पृश्य म्हणून होणारी त्यांची अवहेलना थांबली नाही. हिंदुधर्मियांनी त्यांच्या वर्तणुकीत सुधारणा घडवून आणावी, अशाप्रकारचे आवाहन त्यानी अनेकदा करूनही हिंदुधर्ममार्तंडाच्या वागण्यात काही बदल झाला नाही. उलट नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशावेळी व महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या वेळी हिंदूंची नीच वृत्तीच दिसून आली. यासाठीच त्याना १९३५ साली येवले येथे घोषणा करावी लागली होती. ते म्हणाले होते, ' मी हिंदू धर्मात अस्पृश्य म्हणून जन्मास आलो, हा माझा अपराध नाही. त्याला माझा इलाजही नव्हता; परंतु हिंदू म्हणून मात्र मी मरणार नाही. ' तिथून डॉ. आंबेडकरांचा प्रकर्षाने धर्मशोध सुरू झाला होता. त्यानी अस्पृश्यांच्या ऐहिक आणि आध्यात्मिक उत्कर्षासाठी धर्म आणि धर्मांतर यांवर भर दिला, मानवतावादावर ख्रिस्ती धर्म आधारलेला आहे, असे त्याना सुरुवातीस वाटले; पण त्यातही काळे–गोरे असल्याचे बघून त्यांचे मन शीख धर्माकडे झुकू लागले; पण घटना परिषदेत अस्पृश्यांना सवलती देण्यात याव्यात, यासंबंधी चर्चा चालू असताना एका प्रमुख शीख प्रतिनिधीने मागणी केली की, ' त्या सवलती शिखांतील अस्पृश्यांनाही मिळाव्यात. ' त्यामुळे डॉ. आंबेडकरानी शीख धर्माचा विचार मनातून काढून टाकला. मुसलमान व ख्रिस्ती धर्म सोडून कोणताही धर्म स्वीकारण्याचा सल्ला सद्गुरू गाडगे महाराजानी डॉ. आंबेडकराना दिला होता. प्रत्येक धर्मातील मान्यवर माणसे त्यांच्याकडे पैशाच्या थैल्या घेऊन येत होती. मग डॉ. आंबेडकरानी बौद्ध धर्मच का स्वीकारला ? असा प्रश्न मनात सहजपणे निर्माण होतो.

डॉ. आंबेडकर प्रथम समाजसुधारक होते. ते स्वार्थासाठी स्वतःचो तुंबडी भरणारे पुढारी नव्हते. या भूमीचे व इथल्या संस्कृतीचे त्याना फार आकर्षण होते; म्हणूनच त्यानी ' रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढण्याचे ' आवाहन आपल्या बांधवांना दिले. त्यांच्या सत्कारप्रसंगी गुरुवर्य केळुसकरानी त्याना स्वतः लिहिलेले ' बुद्धचरित्र ' भेट म्हणून दिले. तेव्हापासूनच डॉ. आंबेडकरांचा बौद्ध धर्माचा अभ्यास सुरू झालेला दिसून येतो. बौद्ध धर्माच्या वेगळेपणाने व तत्त्वज्ञानाने त्यांचे मन भारावलेले होते.

इतर धर्म, धर्माची निर्मिती देवप्रणित असल्याचे सांगतात. ख्रिस्ती धर्माचा संस्थापक म्हणतो, ' मी देवाचा पुत्र. ' मुस्लिम धर्माचा संस्थापक म्हणतो, ' मी देवाचा प्रेषित ' तर हिंदुधर्माचा श्रीकृष्ण म्हणतो, ' मी देवांचाही देव आहे.' पण भगवान बुद्धाने स्वतःला साधा माणूस म्हटले आहे. माझ्या धर्माची दारे सर्वांसाठी खुली आहेत, असेही सांगितले. मानवी जीवनात दुःख आहे आणि त्याचे निवारण करण्यासाठी भगवान बुद्धाने अष्टांग मार्ग सांगितला आहे. ' प्रज्ञा व मनातील सत्प्रवृत्ती जागी करून मन सदाचाराकडे वळविले की दुःख टाळता येते, ' असे

भगवान बुद्ध सांगतात. केवळ नदीच्या पाण्याकरिता माणसा-माणसांत रक्तपात व्हावा, हे भगवान बुद्धांच्या सद्‌विचारी मनाला पटत नाही. मानवी संहारामुळे होणारे दुःख टळावे, म्हणून बुद्ध युद्धाला विरोध दर्शवितो आणि तत्कालीन नियमाप्रमाणे कुटुंबावरचा बहिष्कार टळावा, म्हणून तो परिव्रजा स्वीकारतो. मातापिता व पत्नीचा निरोप घेऊन मानवी जीवनातले दुःख निवारण करण्याचा उपाय शोधण्यासाठी गृहत्याग करतो.

जगाला प्रज्ञा आणि करुणेची शिकवण देणारा बौद्ध धर्माशिवाय दुसरा धर्म नाही. माणूस आणि माणसाचे जगातील एकमेकांशी असलेले नाते हा बौद्ध धर्माचा पाया आहे. बौद्ध धर्म हा विचार व अनुभवावर आधारलेला असून त्याचे तत्त्वज्ञान हा भारतीय तत्त्वज्ञानाचा कळस आहे.बुद्धाची संस्कृती भारताची जीवनदायी विचार-शलाका आहे; म्हणूनच हीनयान व महायान या रूढ पंथांहून भिन्न व भ. बुद्धाला अभिप्रेत असलेला बौद्ध धम्म डॉ. आंबेडकरानी आपल्या लाखो अनुयायांसह १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी नागपूर येथे स्वीकारून दीक्षा घेतली. बौद्ध धर्म हा धर्म नाही, तर एक सद्‌विचार आहे. या धर्मासारखे विशाल आणि व्यापक तत्त्वज्ञान कुठलाही धर्म, मनुष्याच्या प्रगतीसाठी सांगू शकला नाही. ' मी मोक्षदाता नसून मार्गदाता आहे ' अशी भगवान बुद्धाची भूमिका होती. त्यानी धर्मात येण्यासंबंधी कुणावरही सक्ती केली नाही, अस्पृश्यांना नवजीवन देण्यास बौद्ध धर्मच श्रेष्ठ वाटल्याने डॉ. आंबेडकरानी स्वतःही तो धर्म स्वीकारला व आपल्या बांधवांनाही बौद्ध धर्म स्वीकारण्याचे आवाहन केले.

१९४५ पासूनच डॉ. आंबेडकरांची प्रकृती त्याना साथ देत नव्हती. त्यातच पत्नी मातोश्री रमाबाईंच्या मृत्यूचा त्यांच्यावर जबरदस्त आघात झाला. मधुमेहाने शरीर पोखरणे सुरू केलेच होते. ज्या काळात त्यांना विश्रांतीची गरज होती, त्याच काळात अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याचा लढा व लेखनवाचनादी कार्य अहोरात्र करावे लागले; त्यामुळे त्याना उसंत मिळत नव्हती. वरचेवर ढासळणाऱ्या प्रकृतीची ममतेने व आपलेपणाने काळजी घेणारे कुणीतरी नेहमी जवळ असावे, असे त्याना वाटू लागले. यापूर्वी त्यांच्या आयुर्वेदाचार्यानी डॉ. आंबेडकराना प्रकृति-स्वास्थ्यासाठी दुसरा विवाह करण्याचा सल्ला दिला होता. त्याचप्रमाणे एका ब्राह्मण समाजसेविकेनेही सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी विवाह करण्याची इच्छा दर्शविली होती; पण त्या वेळी डॉ. आंबेडकरानी त्याना खडसावले होते. मग या वेळीच डॉ. आंबेडकरांच्या मनात विवाह करण्याचे विचार का घोळू लागले ? तर आपण इच्छिले समाजकार्य आपले लवकरच बरेवाईट झाले तर अपूर्ण राहील आणि अस्पृश्य समाज दिशाहीन बनेल, ही चिंता त्याना त्रस्त करीत होती.

या काळात आपल्या बांधवांना सुयोग्य धर्म द्यायचा आहे. ' मी हिंदू धर्मात

जन्मलो तरी त्यात मरणार नाही.' ही प्रतिज्ञा आठवत असली पाहिजे. डॉ. आंबेडकरानी कुठलाही धर्म स्वीकारला तरी हिंदू धर्म नामशेष होईल ही भीती धर्ममार्तंडांच्या मनात होती; म्हणून कुठल्या तरी मार्गाने त्याना धर्मांतरापासून प्रवृत्त करण्याचा व त्यासाठी दुसऱ्या बाजूने त्यांचे दुसरे लग्न रचण्याचा बेत विघ्नसंतोषी लोकांचा होता का ? याचाही विचार झाला पाहिजे; पण १९४८ पर्यंत डॉ. आंबेडकरानी तो बेत हाणून पाडला; परंतु त्यांची मोठ्या आस्थेने सेवा करणाऱ्या डॉ. कु. शारदा कुबेर यांच्याशी मात्र त्याना विवाह करणे भाग पडले; कारण त्यांचे कार्य आणि स्वास्थ्य यांची सांगड घालण्यासाठी डॉक्टर स्त्रीच उपयोगी पडेल असे त्याना वाटले असावे; पण ' त्यांचे हे दुसरे लग्न म्हणजे त्यांच्या भोवती असणाऱ्या चांडाळचौकडीने दूरदर्शीपणाने रचलेला कट असावा ' असे ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शोषित समाज आणि मी ' या पुस्तकाचे लेखक क्रांतिवीर सोहम् प्रभू गुंजणकर म्हणतात. धर्मांतरानंतर त्यांचे अवघ्या त्रेपन्न दिवसांतच महापरिनिर्वाण झाले आणि त्यांचे ' मी सारा भारत बौद्धमय करीन, ' हे स्वप्न अपुरेच राहिले; त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण प्रत्येक दलिताला अस्वस्थ करते.

डॉ. आंबेडकरांचे इच्छिलेले स्वप्न पूर्ण करण्याची जवाबदारी आता दलितांवर पडलेली आहे. त्यासाठी दलितांतील सर्व पोटजातींनी एक होऊन बौद्ध धम्मप्रसाराचे कार्य नेटाने केले तरच डॉ. आंबेडकरांच्या सुधारणेचा रथ मागे खेचला जाणार नाही, असे वाटते.

६

नारायण सुर्वे यांची कविता : काही विचार

प्राचीन काव्याचा चेहरा–मोहरा बदलून टाकण्याचे कार्य कवी केशवसुतानी केले. बदलत्या काळाची गरज ओळखून बदलती जीवनमूल्ये त्यानी आपल्या काव्यातून मांडली. स्वातंत्र्य, समता व बंधुता या त्रयीने युक्त असलेली मानवता आपल्या कवितेतून जोपासण्याचा जोमाने प्रयत्न केला. त्यांचा मानवतेचा धागा पकडून नवकाव्याच्या पिढीपर्यंतचे अनेक लहान-मोठे कवी काव्य करू लागले. एक मानवतावादी पिढीच मराठी कवितेने निर्माण केली. यांपैकी कवी अनिल, वा. भ. बोरकर, कुसुमाग्रज इत्यादी ठळक नावे आपणास घेता येतील. या पिढीने सर्वांपेक्षा माणूस मोठा (महान) समजून कल्पित व जाचक देव, दैव व धर्म, त्यामधून निर्माण होणाऱ्या अंधश्रद्धा, दैववाद व बुरसटलेल्या रूढी यांवर कोरडे ओढण्याचे कार्य आपल्या काव्याद्वारे सुरू केले.

महायुद्धामुळे जगात आणि मानवी जीवनात प्रचंड उलथापालथ झाली. नवे जीवन आणि नवे वास्तव कवींना खुणवू लागले. आधुनिक कवींच्या तडाख्यातून न पुसल्या गेलेल्या श्रद्धांना पुन्हा एकदा जोरदार तडा गेला. या महायुद्धामध्ये दुर्जनांबरोबर सज्जनांचाही भयंकर संहार झाला. याच वेळी यंत्रयुगाने उचल खाल्ली. हाडामांसाचा माणूस यंत्राचा गुलाम बनू लागला. त्याचबरोबर धनिकांची सत्तास्पर्धा वाढू लागली. त्यामुळे सगळीकडे सावकारी वृत्ती बोकाळली. त्यात सामान्य माणूस नागवला जाऊ लागला. सगळीकडे मानवतेचे भेसूर चित्र निर्माण झाले. माणसाच्या

जगण्यालाच हिडीस स्वरूप प्राप्त झाले. वाढत्या लोकसंख्येमुळे व महागाईमुळे उपासमारीची व बेकारीची एकच लाट उसळली. जगातील इतर देशांप्रमाणे भारतासही महायुद्धाची झळ पोहोचली. आधीच पारतंत्र्यामुळे भारतीय माणूस 'स्व'त्व गमावून बसला होता, त्याची दिशाहीन अवस्था झाली होती. अशा परिस्थितीत माणसाची माणूस म्हणून निर्जीव वस्तूपेक्षाही किंमत कमी झाली. अशा हलाखीचे मर्ढेकरानी आपल्या कवितेत वर्णन काहीसे उपरोधाने केलेले आपणास आढळते. त्यांच्यानंतर विफलतेचे व आशावादाचे चित्रण करणारी नवकवींची भली मोठी पिढीच मराठी काव्यात निर्माण झाली.

स्वातंत्र्य मिळाल्यास सत्ता स्वजनांच्या हाती येईल; त्यामुळे दीनदलितांना सुखासमाधानाने जगता येईल, ही माफक इच्छाही स्वातंत्र्यानंतर फोल ठरली. पारतंत्र्यापेक्षाही स्वातंत्र्यात सामान्य माणसाचे चित्र भेसूर दिसू लागले आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत दुर्बलांची घोर फसवणूक व विटंबना सुरू झाली. जिवंत माणसांना मृतांचे जिणे जगावे लागत असलेल्या या काळातील मनुजांचे चित्रण करण्यासाठी नारायण सुर्व्यांसारखा समर्थ कवी निर्माण झाला.

कवी केशवसुतानी वैश्विक मानवी मूल्यांची त्यांच्या कालखंडात पुनर्स्थापना केलेली आपणास आढळते. 'मजुरावर उपासमारीची पाळी' आणि 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' या दोन कविता अपवाद वगळता त्यांचे काव्य मध्यमवर्गीयच होते. मर्ढेकरानाही किडामुंगीसारखा जीवन जगत असलेला तत्कालीन पांढरपेशीच अपेक्षित आहेसे वाटते; कारण विडो पिऊन काडी चावत, 'या जागेवर बांधीन माडी' म्हणणारा 'गणपत वाणी'च दिसतो. फूटपाथवरचा माणूस दिसत नाही.

नवकवींनी काव्यविषय बनविताना जीवनातले कोणतेच क्षेत्र रिक्त सोडले नाही. आधुनिक कवितेच्या जाणिवा नवकाव्याने विस्तारित केल्या असल्या तरी ते पांढरपेशी जाणिवेभोवतीच फिरत असलेले दिसते. हे सर्व कवी मध्यमवर्गातून निर्माण झाले असल्यामुळेही तसे घडले असावे ? तळागाळातला माणूस तोपर्यंत काव्यसाहित्य जाणण्याइतपत शिकला असला तरी पोटाच्या इतर विवंचनेमुळे काव्याच्या क्षेत्राकडे फारसा वळला असल्याचे दिसत नाही.

१९६० नंतरची तळागाळातून शिक्षण घेणारी मंडळी जीवनाच्या हरेक क्षेत्रात उतरलेली दिसून येतात. ती इतरांप्रमाणे साहित्यशास्त्रातही रस घेऊ लागली. कवी नारायण सुर्व्यांसारखी मंडळी या आधीच या मार्गावरून वाटचाल करीत आलेली. आता ती या क्षेत्राबद्दल अधिकारवाणीने बोलू लागली. या जीवनाबद्दल जोमाने लिहून, आपली व्यथा रोखठोकपणे मांडू लागलेली आपणास दिसतात. मराठी काव्यामध्ये ज्यांचे नाव उच्चारताच क्षणभर थांबून मानाचा मुजरा करावा

असे कवी केशवसुत, वा. सी. मर्ढेकर आणि कवी नारायण सुर्वे हे कवी आहेत. सुर्वे हे आधीच्या कवींपेक्षा वेगळे आहेत. कामगार जीवनातून सारस्वतात ' थोडासा गुन्हा ' करण्यासाठी आलेले ते कवी आहेत. कोणत्याही कवीची कविता ही त्याच्या जीवनानुभवातूनच निर्माण होते. त्या कवीच्या निष्ठाही त्या कवितेत व्यक्त होत असतात; म्हणूनच नारायण सुर्वे यांच्या कवितेत कामगार जीवन प्रातिनिधिक स्वरूपात व्यक्त होणे अपरिहार्य होते. ते ज्या कामगार जगतात वाढले, हे जग ' नाही रे 'चे आहे. ' नाही रे 'च्या बळावर ' आहे रे 'ने संपत्ती कमावून घेऊन तो त्यांचे शोषण करीत आहे; त्यामुळे ' नाही रे 'च्या वाटचाला दुःख, दारिद्र्य आले आहे. अशा परिस्थितीत जगत असताना भोगाव्या लागणाऱ्या व्यथा–वेदनांचे चित्रण सुर्वे यानी आपल्या कवितेत मांडले आहे. ही अवस्था बदलण्याचा प्रयत्न एकजुटीने झाला पाहिजे, तरच त्यातून उद्या सुखाचे दिवस सर्वांच्या वाटचाला येतील असेही स्वप्न सुर्व्यांची कविता पाहताना दिसते. कधी कधी कष्टकऱ्यांच्या श्रमाला, त्यांच्या वेदनेला नवा अर्थ लाभेल, असा विश्वासही व्यक्त केला जातो. ' क्षितीज रुंद होत आहे ' या कवितेतून असाच आशय व्यक्त होताना दिसतो.

' आज माझ्या कोरड्या गा
शब्दात जाग येत आहे
आणि नव्या सृजनाचे
क्षितिज रुंद होत आहे. '

नवकाव्यापेक्षाही वेगळा आशय १९६० नंतरच्या मराठी काव्यात व्यक्त करण्यात सुर्वे यांच्या कवितेचा महत्त्वाचा वाटा आहे. आतापर्यंत मराठी काव्याने ज्या माणसाकडे डोळेझाक केली होती, अशा माणसांची नारायण सुर्वे यानी कविता लिहिली. कवितेच्या माध्यमाने त्यानी प्रथमच या माणसांना नायकत्व बहाल केले. या माणसांच्या भोवताली जगणारी माणसेच होती; पण यांच्या आणि ह्या माणसांच्या जगण्यात जमीन–अस्मानाचा फरक होता. तळागाळातल्या माणसांचे जगणे पांढरपेशांना माहीत नव्हते; पण त्यांचे कष्ट मात्र माहीत होते. १९६२ साली सुर्वे यांचा ' ऐसा गा मी ब्रह्म ' हा काव्यसंग्रह बाहेर पडल्यानंतर एक वेगळे विश्व पांढरपेशांसमोर आले. इतरांसारखे ' ब्रह्मत्व ' असणारा हा ब्रह्म कसा आहे ? तर...

' ऐसा गा मी ब्रह्म
विश्वाचा आधार ।
खोलीस लाचार
हक्काचिया ॥ '

या ब्रह्माचेही जगणे, दुःख-वेदना इतरांनाही कळल्या, तरच त्या कमी करण्याचे प्रयत्न होतील, अशीही भावना कवीच्या मनात असू शकेल ? 'ऐसा गा मी ब्रह्म' नंतर १९६६ साली 'माझे विद्यापीठ' आणि १९७५ साली 'जाहीरनामा' कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. तसेच १९८२ साली त्यांच्या निवडक कवितांचा 'सनद' हा संग्रह प्रसिद्ध झालेला आहे. सुर्वे यांची कविता संख्येने फारशी मोठी नसली तरी तिच्यावर त्या मानाने खूपच चर्चा झालेली आहे. प्रा. वसंत शिरवाडकर यानी संपादित केलेल्या 'सर्व सुर्वे' या पुस्तकातून कवी व व्यक्ती म्हणूनही नारायण सुर्वे यांची ओळख होण्यासारखी आहे

सुर्वे यांच्या तिन्हीही कवितासंग्रहांतून कामगार विश्व मोठ्या ताकदीने साकार झालेले आपणास जाणवते. म्हणजेच कामगार असल्याचे त्यांचे भान कुठेच सुटत नाही. आपण कामगार असल्याचा कवीला कमीपणाही वाटत नाही; उलट अभिमानच वाटतो. 'चार शब्द' या कवितेत कवी ठामपणे म्हणतो :

'कामगार आहे मी, तळपती तलवार आहे'

मी एकटाच नाही तर...

'एकटाच आलो नाही, युगाची ही साथ आहे.'

कामगारांच्या एकजुटीवर त्याचा विश्वास आहे.

नारायण सुर्व्यांनी आपली कविता कोणत्या हेतूने लिहिली आहे ? ती कुठल्या तत्त्वप्रणालीचे चित्रण करते का ? यावर आतापर्यंत बरीच उलटसुलट चर्चा झालेली आहे, होत राहील. मला मात्र त्या कवितेने साकार केलेला कामगार आकर्षित करून घेतो. सुर्व्यांच्या कवितेने साकार केलेले कामगारविश्व मोठे लक्षवेधक आहे. ही कविता वाचत असताना सहजपणे कामगारांच्या सुखदुःखाशी आपण समरस होतो. ही कविता कामगारांच्या ठसठसत्या वेदना मांडणारी आहे. मिळालेल्या नरकतुल्य जीवनामुळे हा कामगार बेभान–हैराण झालेला नाही. कुठेही त्याची उमेद खचलेली दिसत नाही. या जगाला आपले श्रम देत, त्या बदल्यात जगाकडून जे मिळते, ते 'दोन घेत कधी दोन देत' या पद्धतीने स्वीकारून जीवन व्यतीत करीत आहे.

खेड्यातल्या कामगारांपेक्षा मुंबईसारख्या ठिकाणच्या कामगारांच्या जीवनात असंख्य अडचणी आहेत. काम केल्यानंतर खेड्यातल्या कामगाराला हक्काची झोपडी तरी असते; पण इथे फूटपाथही वेळप्रसंगी मोकळे नसतात; म्हणून या कामगाराचे जीवनच जणू उपरे वाटावे असे. कवी आपल्या काही कवितांतून आपले जीवन मांडताना कामगारांच्याही प्रातिनिधिक जीवनव्यथाही सांगतो आहे, असे वाटते –

' ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी
पायांखालची जमीन होती
दुकानांचे आडोसे होते, मोफत नगरपालिकेची
फूटपाथ खुलीच होती. '

' माझे विद्यापीठ 'मध्ये म्हटल्याप्रमाणे या कामगारांची अवस्था झालेली असते. ' सुर्व्यांची कविता ही जशी त्यांच्या आत्म्याच्या तळमळीचा उद्‌गार आहे, तशी ती कष्टकऱ्यांच्या भावजीवनाची प्रातिनिधिक आहे. ' हे प्रा. वसंत शिरवाडकरांचे ' विधान ' ही कविता वाचताना सतत आठवते. लहानपणापासून कामगारांच्या सहवासात लहानमोठी कामे करण्याची पाळी कवीवर आली. कामगारांनी त्याला थोडीशी मायाही दिली; त्यामुळे सर्वजण त्याला आपल्या नात्याचेच वाटणे स्वाभाविक आहे. कवी मोठा झाल्यावर जगातले तमाम कामगार व त्यांच्या चळवळी, त्यांचे नेतृत्व करणारे नेते मार्क्स व एंगल्स कवीच्या विकसित होण्याच्या दृष्टीला जाणवले नाहीत, तरच नवल ! म्हणूनच कवीच्या जीवनविचारावर त्यांचाही प्रभाव पडला असणे साहजिक आहे; कारण या सर्वांची चळवळ कामगारामधला माणूस जागृत करण्यासाठीच होती.सुर्वे यांच्या कवितेतील कामगारामधला माणूस संवेदनशील असा आहे. काम करून करून तो मुर्दाड मनाचा झाला नाही. आपल्या कष्टामधून सुंदर ब्रह्म निर्माण होते, याची त्याला जाणीव आहे. इतरांच्या दृष्टीने जगाच्या निर्मितीत वैभवाची भर घालणाऱ्या कामगाराचे म्हणूनच सुर्वे मुंबईमध्ये दुःख व्यक्त करून जातात.

' नरकासम चाळीत राहूनच स्वच्छ
करतो तुझे रस्ते,
उठवले जातो कधी दंडकेवाले जसे
उठतात फिरस्ते. '

हा कामगार मुंबईत चैनीसाठी किंवा व्यापारी वृत्तीने आलेला नाही. त्याच्याकडे नाण्यामध्ये मोजता न येणारे असे भांडवल आहे, ते म्हणजे श्रम. सुर्वे यांच्या कवितेतील कामगारांचा त्यांच्या श्रमांवर दांडगा विश्वास आहे; म्हणूनच सकाळ होण्यापूर्वीच ' पाय कारखान्याकडे वळतात ' किंवा रात्रीचे सर्व व्यवहार बंद असले तरी ' पोरं पोस्टर चिकटवण्यासाठी पळतात. ' पोट भरण्यासाठी मिळेल ते कष्ट करण्याची त्याची तयारी आहे. पण दोनवेळची रोटी अनीतीच्या मार्गाने जाऊन कमावू पाहणारा असा हा कामगार दिसत नाही; कारण ' चार शब्द ' कवितेमध्ये सांगितल्याप्रमाणे रोटीपेक्षाही... ' रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे याचसाठी माझे जग राजमुद्रा घडवीत आहे. ' रोटीपेक्षाही दुसरे काहीतरी

हवे आहे, म्हणून इज्जतीने काम तो करीत आहे. कामगाराच्या श्रमाला आणि त्याच्या जीवनाला इतरांसारखी प्रतिष्ठा मिळायला हवी आहे. हा कामगार आपल्याबरोबर इतरांचीही सुख–दुःखे जाणणारा आहे; म्हणूनच नेहरूंसारख्या नेत्याचे दुःखद निधन त्याला घायाळ करते, ' पाठ शेकीत बसलेली घरे कलकलली ' यातून या जगाच्या दुःखाची प्रतिक्रिया कवी व्यक्त करतो. पोट भरणे म्हणजे जगणे नव्हे, त्यापलीकडेही काही तरी आहे हे त्याला माहीत आहे; पण रात्रंदिन कष्ट करणारा कामगार कर्जातच वाढतो आणि कर्जातच जाऊन आपल्या मुलाबाळांना मागे कर्जाचे हिस्सेकरी बनवतो. त्याची सर्व जिंदगी दुसरीकडे वेळ देतच नाही. ' दोन दिवस 'मध्ये म्हटल्याप्रमाणे...

' भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली ' तरीही हातातोंडाची म्हणावी तशी गाठ पडतच नाही; कारण ' हे हात माझे सर्वस्व दारिद्र्याकडे गहाणच राहिले ' अशी या कामगारांची वास्तव परिस्थिती असते. त्या वेळी जगणे संताप–चीड आणणारे असले तरी ' दररोज स्वतःला धीर देत ' तो जगतोच. असे जगणे, त्याच्या सहनशीलतेबाहेर गेलेले असले तरी, बंड करून उठू पाहणाऱ्या मनाला सावरीत, पुन्हा नव्या उमेदीने जगण्यास तत्पर होणारा कामगार हा विलक्षणच म्हटला पाहिजे. लाचारीने भिकेसाठी हात पसरणारा हा कामगार नाही. एकंदरीत सुर्व्यांची कविताही तशी नाही. ' सुर्व्यांची कविता भुकेच्या शमनार्थ भीक मागणारी कविता नाही, तर भुकेचे गाठोडे खांद्यावर वाहून नेताना तिथेही त्या आत्म्याशी बेइमान न होता माणुसकीचा कळ जपणारी कविता आहे, ' हे प्रा. नरहर कुरुंदकरांचे भाष्य यथार्थच आहे. कित्येक युगांपासून या कामगारांच्या पिढ्या हेच काम करीत आल्या आहेत. दुःख आहे तसेच आहे. सुखाच्या दिवसांची वाट पाहत तो आपल्या जीवनाचा जणू हिशेब करीत आहे.

' दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दुःखात गेले,
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे. '

दुःखाचे दिवस कधी संपणार ? हा सर्वांनाच कवीप्रमाणे पडलेला प्रश्न आहे.

नारायण सुर्वे यांच्या कवितेतील कामगारविश्वात एका जातीची व एका व्यवसायाची माणसे नाहीत तर निरनिराळ्या जातींची (आपापली जात विसरून कामगार हीच जात समजून) व निरनिराळ्या व्यवसायांची माणसे कामगार म्हणून एकत्र येतात. त्यांत लॉस एंजिलीसचा निग्रो आफ्रिकन, चाचा याकूब, नालबंदवाला, चंद्रा नायकीण, गिरणी गेटवरचा जिवबा असे जीव जमा झालेले आपणास दिसतात, हा कामगार मिळेल ते काम करून घरच्या मंडळींबरोबर वाटचाला येईल, ते खाणारा आणि जागा भेटेल तिथे पथारी टाकून विसावणारा आहे का ? इतके नियमित

त्याच्या वाटचाला आले की, आपले जीवन कृतार्थ झाले, असे समजणारा आहे का ? तर नाही. नव्या युगाची स्पंदने जाणणारा तो आहे. खऱ्या माणसाच्या माणुसकीसाठी तो तडफडतोय. या उघड्या जगात वावरताना, 'अशा नंग्यांच्या दुनियेत चालावयाची वाट, लक्षात ठेव खाणाखुणा' हे तत्त्वज्ञान ध्यानात ठेवूनच तो जीवन जगतोय. धक्के खात चाचपडत जगताना भलीबुरी अनेक माणसे भेटली. कित्येकांनी यांना हातोहात फसवले, तरी माणसाच्या सर्जनावरचा कवीचा व या कामगाराचाही विश्वास नष्ट झालेला नाही. त्याचा माणसाच्या सर्जनावर विश्वास आहे.

सुर्वे यांच्या कवितेतला कामगार म्हणूनच केवळ कामगार न उरता, तो सर्जनशीलही बनतो. तो नेहमी मनुष्यत्वाच्या मर्यादेने जगण्याचा प्रयत्न करताना दिसतो. हा कामगार दारूच्या धुंदीत काम विसरणारा, कामचुकारपणा करणारा, मालकाचे मुद्दाम नुकसान करणारा असा आहे का ? तो अमानुष किंवा अतिमानुष आहे का ? तर नाही. इतर माणसांसारखाच आहे. मानवी स्वभावाला धरून त्याच्यातही काही गुण–दुर्गुण असणे साहजिक आहे. त्यालाही मन, भावना असतात. औदार्य त्याच्या ठिकाणी असते. त्याला विमनस्कता ग्रासू शकते. सर्वसाधारण माणसाला येणारे अनुभव त्याच्याही वाटचाला येऊ शकतात; म्हणूनच 'श्रमणाऱ्यांचा सूर्य आहे सांगाती' असे म्हणणारा कामगारही कधी कधी गलबलून जातो. अशा वेळी त्याला गुरूही कामगारांमधूनच भेटतात.

'टरकावले घामेजले खमीस त्याचा क्रेनवर
वावटा फडफडला
अडकवून तिथेच देह माझा गुरू
पहिले वाक्य बोलला'

तडफदार उसळत्या रक्ताचा गुरू अद्वितीयच म्हणावा लागेल. विश्वास ठेवावा अशी काळजातली माणसे भेटतात आणि कामगारांचे जोवाभावाचे असे जग निर्माण होते. त्यांच्याकडे पाहिले, तर ते जीवनाच्या लढाईवर निघालेले (क्रांतिवीराच्या आवेशाने) योद्धेच वाटतात. अन्यायाविरुद्ध आवाज उठवताना आत्मबलिदान द्यावे लागले, तरी ते तयार असतात.

मनुष्यव्यवस्थेनेच अस्मानी संकटसुद्धा या जगतापुढे वाढून ठेवले आहे. पावसाळा एरवी सर्वांना आनंदित करणारा; पण गुडघ्या-मांड्याइतक्या पाण्यातून–

'आता ह्या वाटेवरून
दोन पोरांना धरून
ती कशी जाईल ?'

अशी धास्ती कामगाराच्या मनात असते. पण ती तितक्यापुरतीच; कारण कामगार

तसा धीरगंभीर प्रवृत्तीचा आहे, धीट, निधडचा छातीचा आहे. श्रम आणि जीवन यांची सांगड कामगार विसरत नाही; पण श्रम झेलून जीवन पेलताना नरकतुल्य यातनांतून जावे लागते. 'श्रमिकांच्या जगण्याचे भेदक, वास्तवदर्शी चित्र नाटचात्म पद्धतीने व्यक्त करणारी सुर्वे यांची कविता आहे,' हे प्रा. रवींद्र किंबहुनेंचे विधान बरोबर वाटते. विविध रेखाटलेल्या व्यक्तिरेखांमुळेही ही कवितेमध्ये नाटचात्मता आली आहे, असे वाटते.

'तेव्हां एक कर...
खुशाल खुशाल तुला आवडेल
असे एक नवे घर कर'

असे सांगणारी जगावेगळी व्यक्तिरेखा सुर्व्यांच्याच कवितेत भेटते. व्यक्तिरेखेला उठाव देण्याच्या त्यांच्या शैलीतही ही नाटचत्मकता दडलेली आहे.

'देख ये मेरा पाय
साक्षी को तेरी आई काशीबाय'
'मी खाटिक आहे बेटा – मगर
गाभणवाली गाय कभी नहीं काटते'

असा करुणेचा विचार सांगणारा मुस्लिमबंधू भेटतो.

दारिद्रचामुळे आपले जीवन फुलल्याविनाच वार्धक्याकडे झुकलेल्या (सुखाचे क्षण मनात बाळगणाऱ्या) स्त्रीने –

'शांतपणे तिने माळलेले गजरे
खिडकी खाली सोडून दिले'

चैनीने किंवा अंगातील मस्तीने नव्हे तर कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी देहविक्रय करणारी, सदोदित गावाकडे पत्र पाठविणारी एक वेश्या म्हणते :

'आंग ठनाकतंय पर म्हनावं
गावापेक्षा बरं हाय'

ती दारिद्रचाची शिकार झाली आहे. हे कामगार पशुपातळीवर जीवन जगणारे, नित्य नवी मरणे मरणारे, तरी जिवंत असलेले. ऊर फुटून घाम निघेपर्यंत काम केले नाही तर, 'पोट कसे भरणार ?' हा प्रश्न सतत छळणारा. या कामगारांना फारसे वैयक्तिक जीवन जगायला मिळत नाही. निसर्गानुसार प्राप्त झालेले शरीरकर्मही तो कसेतरीच (गजबजलेल्या चाळीच्या एका झोपडीत अनेक माणसे असली तरी एका कोनाडचात) उरकतो आणि पोटाच्या काळजीने सकाळीच लोकल पकडण्यासाठी धावतो. सुर्वे यानी आपल्या कवितेत चित्रित केलेला कामगार जीवनसंघर्षातल्या

अनेक जखमा अंगा–खांद्यावर घेऊन वावरणारा आहे. मुले, स्त्रिया, म्हातारे हे सर्वच कामाच्या रगाडयात सापडलेले जीव आहेत. त्यातून त्यांची सुटका नाही. दारिद्रय–उपासमार, छळ–अपमान चालू आहे; पण जगण्याची जिद्द संपत नाही. घरी आलेल्या पाहुण्यांसमोरही घरातील सर्वच माणसांना वस्त्रे सोडून, लाजलज्जा गुंडाळून रात्र काढावी लागते. का तर –

' झोपतं घडुतं टराकलं तर भाईर पडायची
मोत हुईल बगा मोत '

ही भीती मानगुटीवर दारिद्रयाने लादलेली असते.

अशा फाटक्या जगाचे फाटकेपण कसे सांधता येईल ? हा प्रश्न आहे; पण हा शूर कामगार न डळमळता उद्याच्या सुखाच्या स्वागतासाठी आज आहे, ते नीटनेटके करून ठेवण्याचा सल्ला प्रियेला देतो –

' आणखी एक काम तू करावे
फाटक्या कोटासही टाके घालून ठेव
फुले हुंगीतच जाऊ दोघेही गर्दीतून
तुझी रेशमासारखी बोटे दंडात ठेव. '

उद्या आपल्यासाठी उज्ज्वल दिवस उगवणार आहे याची त्याला केवढी खात्री ! आजच्या अर्थव्यवस्थेने कामगारांचे केवळ शोषणच चालवले आहे, असे नाही तर माणसामाणसांतील माणुसकीही नष्ट केली आहे. ज्याच्याकडे ही ' अर्थ ' थैली फुगते आहे, त्याच्या दृष्टीने सामान्य माणसाची किंमत कवडीपेक्षाही कमी झाली आहे.

' शीगवाला 'तील दाऊदचाचा हा कामगार आपल्या आयुष्यातील अनुभवावरून –

' आता आदमी झाला सस्ता, बकरा म्हाग झाला
जिंदगीमध्ये पोरा पुरा अंधेरा आला,
आणि सब्दाला जगवेल असा कोन हाये दिलवाला
सबको पैसेने खा डाला '

असे मानवी जीवनातील सत्य कथन करतो. कामगारांच्या वेदना मांडतानाच नारायण सुर्वे यांची कविता आणखी काहीतरी अधिक सांगते. म्हणूनच ठराविक साच्याचीही ती होत नाही. सुर्वे यानी मराठी कवितेला एक अनोखे विश्वच नाही तर प्रा. अविनाश सहस्रबुद्धे यानी म्हटल्याप्रमाणे, ' मराठी कवितेला वेगळे वळण

देण्याचे व वाङ्मयातील परिवर्तनाची नांदी ठरविण्याचे काम नारायण सुर्वे यांच्या कवितेने केले आहे.'

कामगार वर्ग व बहुजन समाज यांच्या दुःखाचे, आशा–आकांक्षांचे चित्रण करण्याचे कार्य नवकाव्याने सुरू केले होते. त्याला विस्तारित करण्याचे व त्याच्या चित्रणाने मनात घालमेल उत्पन्न करण्याचे वादळी कार्य नारायण सुर्वे यांच्या कवितेने केले आहे; म्हणूनच कामगारांच्या वास्तवपूर्ण व्यथावेदना अस्सलपणे मांडण्याचे श्रेय नारायण सुर्व्यांना द्यावे लागते.

७

गो. नी. दांडेकरांची मुलाखत

देवगड येथे 'जहाज' या बाळकृष्ण प्रभुदेसाईंच्या कथासंग्रहाचे प्रकाशन करायला आलेले आप्पासाहेब (गो. नी. दांडेकर), त्यांच्याशी मनमोकळेपणाने चार गप्पा मारता याव्यात म्हणून मुलाखत घ्यावी, असे माझ्या मनात आले. त्या हेतूने दोन-तीन वेळा त्यांच्याकडे जाऊनही आलो; परंतु त्याना काही वेळ मिळण्याचे चिन्ह दिसेना. ते परतणार त्या सकाळी म्हणाले, 'गायकवाड, तुम्ही असे करा. सध्या आता आम्ही किल्ला पाहायला जातो आहोत. जमले तर जामसंडेला श्री. आप्पासाहेब गोगटेंकडे या. त्या ठिकाणी आपणाला भरपूर वेळ मिळेल.' आप्पांना किल्ले पाहायचे विलक्षण वेड. तेव्हा मी म्हणालो, 'ठीक आहे.' परंतु जामसंडे व आप्पासाहेब गोगटे माहीत नसल्याची माहिती आमचे प्राचार्य मयेकर यानी माझ्या चेहऱ्यावर वाचून ते तात्काळ म्हणाले, 'तुम्हाला आप्पासाहेब गोगटे यांचे घर माहीत नसणार ? बसने जा, विचारा कोणीही सांगतील.' श्री. पु. बसलेले होते. ते म्हणाले, 'आप्पासाहेब गोगटे या ठिकाणी गाडी घेऊन येणार आहेत.' प्राचार्य लगेच उद्‌गारले, 'मग तर ठीकच झाले की. आप्पासाहेबाना सांगा, मला तुमच्या घरी यावयाचे आहे म्हणून. ते घेऊन जातील.'

सर्व मंडळी किल्ला पाहण्यासाठी निघून गेली. मी मात्र त्या शुकशुकाट वाटणाऱ्या गेस्ट हाऊसवर बसून राहिलो. तेवढ्याच एक पांढरी कार आली. नजर इकडे–तिकडे फिरवीत असलेला गृहस्थ मला विचारू लागला. त्याना मी

आप्पा दांडेकरांविषयी माहिती दिली व लगबगीने विचारले, ' आप्पासाहेब गोगटचांची हीच का गाडी ?' ' होय ' म्हणताच त्यांच्या ' वसा ' म्हणण्याची वाट न पाहताच मी पाठीमागे जाऊन बसलो. रस्त्याने बोलत असताना खुद्द आप्पाच कार चालवणारे आहेत असे कळल्यावर मनातल्या मनात फार खजील झालो. किल्ल्याकडे निघालो असता वाटेतच आप्पासाहेब दांडेकरांचीही गाडी भेटली. मग त्यांच्यापाठोपाठ आम्ही जामसंडेकडे मोर्चा वळविला. आप्पासाहेब, प्रा. गोलतकर व मी समोर तर पाठीमागे सौ. दांडेकर, ' सत्यकथे 'च्या सेक्रेटरी व आप्पासाहेब दांडेकर किल्ल्याशेजारीच आमच्या गाडीत बसले होते. किल्ले पाहण्याबरोबरच निसर्गाचे फोटो घेण्याचा आप्पासाहेब दांडेकराना भारी छंद. १५ मिनिटांच्या आतच एक रोल संपवून दुसरा रोल त्यानी विकत घेतला होता.

जामसंडचात पोहोचलो, जेवणाची पाने वाढली. आप्पासाहेब कॅमेरा घेऊन शेजारच्या खाडीवर लहानशा होडीतून काळचाभिन्न अंगाने माशासाठी जाळे फेकणाऱ्या कोळचाचे छायाचित्र घेण्यासाठी अवघड ठिकाणी उभे राहून कॅमेरा सेट करीत होते. लांबून येणाऱ्या फोटोत मजा नाही; म्हणून होडीतून त्याच्याजवळ जाऊन फोटो घेण्याचे त्यानी ठरवले आणि होडीत आम्ही बसलो. होडीत बसण्याची माझी पहिलीच वेळ. कसेतरीच वाटत होते; पण बसायला मिळाल्यामुळे बरेही वाटले; पण मला सतत वाटू लागले की, अशातच वेळ निघून जाणार आणि मुलाखत तशीच राहणार. केवळ दोन आप्पांच्या मिलाफात त्यांच्याशी गप्पाही मारता येणार नाहीत. एकदाचे खाडीबाहेर आलो व जेवायला बसलो. तत्पूर्वी शहाळे व कच्चे नारळ खाऊन पोट भरलेच होते.

तेव्हा तर आप्पासाहेबांच्या आग्रहाखातर कुणीही पानावरून लवकर उठले नाही. जेवताना हास्यकारक गप्पा मारीत आमचे जेवण आप्पासाहेब दांडेकर जिरवीत होते. त्यात तुपाच्या धारेवरून ब्राह्मणांतील प्रकार ओळखावे, ते लग्नातील घरलेल्या बत्त्यापर्यंत आले. अनेक विषय झाले आणि ढेकर देत मंडळी बाहेर पडली. तेव्हा श्री. पु. मला हळूच म्हणाले, ' गायकवाड तुम्ही असे करा. ' मी म्हणालो, ' कसे ?' कान देऊन ऐकू लागलो. ' प्रश्न एका कागदावर लिहून आप्पांना पत्राने पाठवा. ते उत्तरे लिहून पाठवतील. मग समर्पक मुलाखत होईल. '

मला वाटले, आता मुलाखत घेतल्यासारखेच झाले; परंतु आप्पासाहेबांचे फार बारीक लक्ष. मुलींना काहीतरी गमतीजमती दाखवीत असतानाही ते उठले व म्हणाले, ' गायकवाड, चला तुमच्या मुलाखतीला सुरुवात करू या ! ' विश्रांती वगैरेंची पर्वा न करताच थोडेसे अंथरुणावर अंग टाकीत ते बोलू लागले, ' तुम्हाला नवीन वाटणारी व मला तीच असणारी मी उत्तरे देईन. विचारा प्रश्न ! '

मी काहीसा गंभीरपणाचा व प्रौढतेचा आव आणून आप्पासाहेबांकडे न पाहताच पहिला प्रश्न विचारला,

' आपासाहेब, आपण वाङमयीन जीवनाला केव्हा सुरुवात केली ? '

' मी माझी लेखनसाधना वयाच्या तिसाव्या वर्षी सुरू केली आणि गंमत अशी की, लग्न झाल्यावर ते मला जमू लागले. त्याअगोदर पुढे कधी वाङमयीन निर्मिती करीन असे चुकूनसुद्धा किंवा स्वप्नातसुद्धा वाटले नाही. '

मग मी दुसरा प्रश्न विचारण्यासाठी तयारीत राहिलो. मोठ्या लेखकाविषयी सर्वांनाच वाटते की, एवढा मोठा लेखकाचा पिंड घडविण्यास कोणत्या नियतकालिकाचा किंवा संपादकाचा वाटा आहे ? तेव्हा मी घरगुती पद्धतीने सहज प्रश्न विचारला, ' सुरुवातीचे आपले लेखन कोणत्या मासिकातून अथवा नियतकालिकातून प्रसिद्ध झाले ? '

तेव्हा आप्पा एकदम उत्तरले, ' मी कोणत्याच नियतकालिकातून किंवा मासिकातून लेखक म्हणून ओळखण्यापूर्वी लिहीत नव्हतो; परंतु माझे लिखाण एकदमच पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले आणि जिकडे मी लिखाण पाठविले तिकडून ते परत म्हणून आले नाही. तेव्हा इतर नवोदित लेखकांच्या बाबतीत ' साभार परत ' हे वारंवार घडते, ते काही माझ्या बाबतीत घडले नाही. '

आप्पासाहेबाना लवकरच गावाकडे निघायचे होते. तेव्हा प्रश्नांमधून प्रश्न निर्माण होणारे, ते विचारण्याचे मी टाळले व ठोकळ असेच प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

वाङमय हे विविध प्रकारांनी फोफावले आहे. काही लेखकांचा वाङमयातील एकेक प्रकार हा आवडता असतो. मी आप्पासाहेबाना विचारले,

' आपण कोणत्या वाङमयप्रकाराची सातत्याने साधना केलीत ?'

' माझे तसे काही नाही. मी सर्वच वाङमयप्रकार हाताळले; परंतु नंतर कादंबरी हा प्रकार मला आवडू लागला व तो माझ्या वृत्तीला साजेसा आहे, असे वाटायला लागले; कारण फिरत राहणे, निरनिराळे किल्ले पाहणे आणि कादंबरीत करावी लागणारी वर्णने विशेषतः भरपूर काळाशी ती बांधलेली नसतात. बराचसा काळ गेलेला असतो. विस्तारितपणा खूप असतो तेव्हा कादंबरीलेखनच सध्या तरी मोठ्या प्रमाणात मी करतो आहे. माझ्या वयोमानाप्रमाणे मी जास्त काही यापुढे लिहीन असे वाटत नाही; परंतु हृदय उचंबळून आले की मी लेखणी चालविणार, थांबविणार नाही. '

लेखक किंवा कलाकाराविषयी लेखन करताना तो ज्या ध्येयातून आपले

लिखाण फुलवीत असतो किंवा अलीकडे समीक्षेच्या क्षेत्रात अनेक प्रश्न निर्माण होतात, वाद माजतात, तेव्हा साहजिकच माझीही उत्सुकता जागृत झाली व आप्पासाहेबाना मी विचारले, ' साहित्यातील कलावाद व जीवनवाद ' याविषयी आपले मत काय ? '

तेव्हा मात्र आप्पासाहेब काहीसा त्रासिकपणाचा भाव चेहऱ्यावर आणीत जणू आपण त्या गावचे नाहीतच अशा आविर्भावित उद्‌गारले, ' गायकवाड, हे पहा ! मी वादात कधी पडलो नाही आणि कोणता आग्रहही धरला नाही. ज्या गोष्टीत आपले मन नाही, त्या गोष्टींचा विचार करायचा कशाला ?' म्हणजे ज्या गावाला जावयाचेच नाही, तर त्या गावाचा रस्ता कशाला विचारावा ? असे म्हणाल्यासारखेच.

माझ्या मनात अगदी मुलाखतीला बसल्यापासूनचा एक प्रश्न उचंबळून येत होता. तो आता विचारल्याशिवाय गत्यंतर नाही. नाही तर उगीचच अस्वस्थता वाढेल म्हणून मी तो विचारलाच.

' दलित साहित्याविषयी आपणास काय वाटते ?'

एखाद्या संकटावर आक्रमक पवित्रा घेऊन उभे राहावे, त्याप्रमाणे आप्पासाहेब लेटलेले असतानाही गडबडीत उठून बसले व शांतपणे बोलू लागले, ' दलित साहित्य म्हणजे दलितांची एक भूमिका व बाजू मांडणारे साहित्य. शतकानुशतके दलित चेपले गेले, मूकपणे अनेक अन्याय-अत्याचार साहत राहिले, तेव्हा आता कोठे थोडीशी प्रकाशाची तिमिर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे पाहायला मिळते आहे व क्रांतिपणा दलितांत आला आहे; म्हणून आपल्या भावना व्यक्त होताना थोडासा आक्रोश होतो आहे. परंतु गायकवाड, खरे सांगू ? अशा प्रकारचा आरडाओरडा न करताही दलित साहित्यात भर टाकता येईल. तुम्हाला किती आणि काय सांगावे ? दुःख हे मोठे सुंदर असते. दलितांच्या आणि ' स्मरण-गाथे 'तील नायकांच्या समस्या एक प्रकारे सारख्याच आहेत. त्या बिचाऱ्याच्या अंगावर फाटके कपडे असतात. तो रानोमाळ भटकत असतो. लोक त्याला छी-थू करीत असतात. असो !

' एक मात्र खरे की, तुम्हाला जीवनात सुखी व्हायचे असेल तर तळातील माणसाकडे पाहायला शिकले पाहिजे व दुःखी व्हायचे असेल तर वरच्या माणसाकडे पहा. तेव्हा दलित साहित्याच्या रूपाने त्यांची वेगळी संस्था आहे, यावर माझा विश्वास नाही आणि आज तरी दलित साहित्य म्हणून वेगळे लेखन करणारे बहुतेक सर्व प्रोफेसर निदान काहीजण एम. ए., बी. ए तरी आहेत. तसेच त्यांच्यापैकी दुःख भोगलेली माणसे आहेत. तेव्हा दुःखाला जात नसते. महाराष्ट्रातही काही गावे अशी आहेत की, काडचाची पेटी आणण्यासाठी दहा-पंधरा कोस जावे लागते. तसेच

आपली पोरं सावकाराकडून पैसे काढल्यामुळे त्याच्या ताब्यात गुलामासारखी वागणूक मिळत असली तरी द्यावी लागतात आणि स्पष्ट सांगू, दया पवार, गंगाधर पानतावणे यांचा आक्रोश आता नकली होत चालला आहे. ते माझे मित्र आहेत. त्यांना राग आला, तरी हरकत नाही; कारण त्यांच्याकडील काही कविता अस्सल, तर काही केवळ अस्सलांची नक्कल होत आहेत. अस्पृश्यांमध्येच दलित साहित्य किंवा त्यांच्यात सुधारणा घडाव्यात म्हणून प्रयत्न करणारे आहेत असे नाही, तर स्पृश्यांमध्येही आहेत. परंतु दलित साहित्याची जशी हेळसांड होते आहे, तसेच त्यांचेही झाले. उदा. महर्षी रामजी शिंदे व श्री. म. माटे यांना महार शिंदे व माटे म्हणून ओळखत. तेव्हा प्रगल्भ साहित्याच्या बाबतीत हे ना घडावे, म्हणून त्यात वेगळ्या धर्तीने लिखाण करूनही प्रखरपणा आणता येईल.'

वयोमानाप्रमाणे आणि गावाकडे जाण्याची तयारी झाली तरीही अंगात स्फूर्ती यावी व एखाद्या वक्त्याने भाषण द्यावे, त्याप्रमाणे या प्रश्नाचे उत्तर आप्पासाहेबांनी दिले. तेव्हा त्यानाही वेळ होतो आहे हे जाणून मी मुलाखतीच्या उत्तरार्धाकडे वळत म्हणालो,

'आतापर्यंतच्या आपल्या आयुष्यात लेखनात खंड पडला का ? तो कोणत्या कारणामुळे पडला ?'

'कधीही लिखाणात खंड पडला नाही. भ्रमंतीचे मला विलक्षण वेड आहे. तेव्हा रानावनात खूप भटकावे म्हणून बाहेर पडतो. उंच मानेने, पुढे छाती करून दऱ्याडोंगरांवर उभे असलेले किल्ले मला बोलावतात, तेव्हा त्यांच्याकडे रानातून जात असताना रानच होऊन जावे वाटते; तर कधी त्या रानावरची माणसे जशी राहतात तसे राहण्याचा प्रयत्न करतो. ते जे खातात, ते खातो. कधी कण्या, कधी चटणी, कंदमुळे जे मिळेल ते आणि या आनंदाच्या वेळात लिखाण मात्र तेवढ्या वेळेपुरते थांबते. तसा लिखाण करण्याचा मला मनस्वी कंटाळा आहे; पण उचंबळून आलेले मन मला स्वस्थ कधीच बसू देत नाही.'

आणि आता मात्र मुलाखत घेत असताना काहीसा मी त्यांच्या जीवनाच्या प्रवाहाबरोबर वाहत आल्यासारखा झालो होतो. त्यांचे वयही होत आलेले आहे, पिकले पान केव्हा गळून जाणार, हे काही सांगता येत नाही. आजकाल मोठ्या व्यक्तींना व कलावंतांना अनेकांकडून जो न चुकता प्रश्न विचारला जातो, तो विचारावा की नाही याबद्दल मी मनातल्या मनात घोळत ठेवला होता. अखेर आप्पासाहेबांची परत परवानगी घेऊन तोही विचारलाच.

'आजकाल मोठ्या व्यक्तीला त्याच्या मृत्यूबद्दल विचारले जाते, तेव्हा तुम्हाला त्याविषयी काय वाटते ?'

तेव्हा ते चटकन उत्तरले, 'काही वाटत नाही. मरण जसे येईल, तसे सामोरे जाण्याची माझी इच्छा आहे. परंतु इतरांप्रमाणे साहजिकच मला कधी कधी वाटते, की' मध्येच त्यानी मला विचारले, 'तुम्ही माझा 'माचीवरचा बुधा' वाचला का ?' मी म्हणालो 'नाही !' 'हा प्रश्न विचारलात म्हणून तरी निदान वाचा. तरीही मी थोडेसे स्पष्ट करतो; इतरांप्रमाणेच मलाही वाटते. 'मरण कसे गोड असावे. ते शांतपणे यावे, कुणाचाही उःसास त्यात असू नये. थंड वृक्षाच्या सावलीत, आकाशात ज्या ठिकाणी काळा ढग असावा, त्याखाली डोंगराच्या कुशीत आपले निर्जीव धड कोल्ह्या–कुत्र्यांनी ओढीत नेऊन खावे. आमच्या बऱ्याचशा मित्रमंडळींचे बहुतेक असेच ठरलेले आहे. माझे कवीमित्र बा. भ. बोरकरही एकदा असेच म्हणाल्याचे मला आठवते, की 'जीवनभर मी ज्या माश्यांवर जगलो तेव्हा मी मेल्यास माझे प्रेत समुद्रात टाकून द्या. एकदा तरी विचाऱ्यांना खाऊ द्या.'

संत गाडगे महाराजांच्या मृत्यूची दाट छाया आप्पासाहेबांच्या आपल्या मृत्यूविषयीच्या कल्पनेत पडलेली मला आढळली.

जाण्यासाठी तत्पर असलेली मंडळी माडीच्या खाली खोळंबून बसली होती. सौ. नीराताई दांडेकरही महिलांमधून बाहेर पडत होत्या. आप्पासाहेब उठत असता-नाही मी व प्रा. गोलतकरानी शेवटचा प्रश्न विचारलाच,

'आपण नेहमी फिरतीवर असता, काही आडकाठी येत नाही का ?'

तेव्हा आप्पासाहेब थोडेसे हसून म्हणाले, 'मी तशी कोणती नोकरी करीत नाही. त्यामुळे मी कुणाच्या बांधल्यात नाही व कुणा बॉसचेही माझ्यावर नियंत्रण नाही; पण आमचा एक बॉस आहे आणि तो फार सोपा आहे. त्याला एक छानपैकी सुंदर वेणी आणून दिली, की निघालो कुणीकडेही मन मानेल तसा.'

बोलत आम्ही कारच्या जवळही पोहोचले होतो. आप्पासाहेब कारमध्ये बसले, तेव्हा सौ. नीराताई दांडेकरानी विचारले, 'गायकवाड, घेतली का मुलाखत?' मी 'होय' म्हणालो. आप्पांची कार धुरळा उडवीत निघून गेली. आम्ही मात्र दुसऱ्या कारमध्ये बसून तिच्या वेगाबरोबर मुलाखत मनामध्ये आठवीत जामसंडा बसस्टँडवर पोहोचलो.

८

मराठी कथात्मक साहित्यातील स्त्रीचे बदलते चित्रण

आज जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत स्त्री पुरुषाच्या बरोबरीने कार्य करीत असताना दिसते. साहित्यात मानवी जीवनाचे प्रतिबिंब उमटते; म्हणून त्यात स्त्री-जीवनाचे चित्रण येणेही क्रमप्राप्त आहे. स्त्री–पुरुष मानवी जीवनाची प्रमुख अंगे आहेत. स्त्रीविना पुरुष किंवा पुरुषाविना स्त्री ही कल्पना माणसाच्या जीवनात कमतरता आणणारी गोष्ट आहे. स्त्री ही अनेक नात्यांनी पुरुषाच्या जीवनात येते. अशा या स्त्रीचे मराठी कथात्मक साहित्यातील चित्रण लक्षात घेण्यापूर्वी तिचे भारतीय संस्कृतीत काय स्थान होते व आहे, याचा थोडासा विचार केला, तर वावगे ठरणार नाही.

भारतीय संस्कृतीतील स्त्रीचे स्थान

मनुस्मृती, वेद, पुराणे व भगवद्गीता इ. हिंदुधर्मग्रंथांतील विचारांवर भारतीय जीवनपद्धत आधारलेली पाहावयास मिळते. हजारो वर्षांपासून या ग्रंथांतील विचारांनी भारतीयांच्या जीवनाचे नियमन केलेले दिसून येते. ही वर्णाश्रित संस्कृती आजही अस्तित्वात असलेली दिसून येते. ' चार्तुवर्ण्यं मयासृष्टम् गुणकर्म विभागशः ' असे श्रीकृष्णाने भगवद्गीतेत सांगितले. समाजाचा गाडा सुरळीत चालण्यासाठी त्याची आवश्यकता होती, अशी पुष्टीही जोडली आहे; पण येथील पुरुषप्रधान

संस्कृतीने यापुढे जाऊन ' स्त्री 'चा पाचवा वर्ग कल्पून तिला आपल्या मनाप्रमाणे रावबून घेण्याचा अनिष्ट पायंडा सुरू केलेला दिसतो. एकीकडे ' स्त्री 'चा जगन्माता, देवी म्हणून गौरव करायचा तर दुसरीकडे ' मोक्षमार्गातली धोंड ' म्हणून तिची अवहेलना करायची, अशा दुटप्पी धोरणात भरडणारी स्त्री आपल्यापुढे उभी राहते.

' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:
यत्रैतास्तुन पूज्यन्ते सर्वास्तत्राफला क्रिया. ' [१] ३/५६

असे म्हणणारा मनूच दुसऱ्या ठिकाणी ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' असे सांगून स्त्री-जातीला गुलामगिरीचे जीवन बहाल करतो. स्त्रीने त्या वेळी पित्याच्या, पतीच्या व मुलाच्या आधारे जगावे,असे सांगून तिला अबला किंवा दुबळी ठरवतो. येथेच तो पुरुष जातीला स्त्रीपेक्षा वरचढ लेखतो, पुरुषाला अमर्याद स्वातंत्र्य देतो. यातूनच पुरुषप्रधान संस्कृतीची निर्मिती झाली असावी. पिता कुटुंबाचा प्रमुख गणला गेला की त्याची कुटुंबावर अमर्याद सत्ता असणे ओघानेच आले. या सत्तालालसेतून स्त्रीला समाजात/कुटुंबात दुय्यम स्थान मिळाले असावे. या काळात स्त्री पुरुषाच्या मालकीची वस्तू मानली जाऊ लागली. तिला स्वत:च्या मनाने वागणे कठीण झाले. एकार्थाने तिला गुलामच समजले गेले. हिंदुधर्म चांगल्या गोष्टींबरोबरच असा गुलामीचा धडा देणाराही आहे.

या धर्मातील एका समाजगटाने काल्पनिक देव-धर्म निर्माण करून व स्वार्थासाठी वेद-पुराण आदी काल्पनिक ग्रंथ रचून स्वर्ग व नरकाची भ्रामक कल्पनाही वास्तव आहे, असे भासवून स्त्री-शूद्रांना अज्ञानात ठेवून लुबाडले. त्यांचा छळ केला. आपले वर्चस्व टिकून राहावे, म्हणून देवाधर्माच्या नावाखाली जितक्या काही क्लृप्त्या करता येतील, त्या केल्या. स्त्रीच्या माथी पातिव्रत्याची कल्पना मारून तिने विवाहबाह्य कामव्यवहार केला, तर भयंकर अपराध मानला गेला. त्यातूनच एकपतिव्रत आले व पती मेला तरी तिने आजन्म दुसरे लग्न न करताच राहिले पाहिजे, अशी सक्ती करण्यात आली. त्यातूनच सती जाणे, केशवपन करणे, पुनर्विवाह न करणे इ. पाशवी अत्याचार स्त्रीवर होऊ लागले. पुत्र झाला तर वंश टिकतो व मोक्षप्राप्ती मिळते, या खुळचट समजुती पसरविल्यामुळे पुत्र नसलेल्या व वांझ स्त्रीचा छळ होऊ लागला. प्रपंच करूनही परमार्थ साधता येतो असे सांगणाऱ्या एकनाथांसारख्या संतांनी स्त्रीची निंदा केलेली पाहावयास मिळते. ते ' एकनाथी भागवता 'त म्हणतात :

' पुरुषासी द्यावया दु:ख । स्त्री संगची आवश्यक ।
पुत्रपौत्राद्वारा देख । नाना दु:ख भोगवी ॥ ७-५९८ ॥

नको स्त्रियांची भेटी । नको स्त्रियांची गोष्टी
स्त्री देखिताची दिठी । उठाउठीं पळावे ॥ [१] ८–१२५ ॥

संतांनीच असे म्हटल्यावर संतांच्या समागमात रंगलेला मराठी माणूस तरी स्त्रीची उपेक्षा करण्यात कसा मागे राहील ? या सांस्कृतिक पार्श्वभूमीतूनच भारतीय साहित्यात स्त्रीचे चित्रण केलेले आहे, असणार असे म्हणता येईल. स्त्रीला कशाप्रकारचे जीवन जगावे लागले, तिचा कसा छळ झाला, याचे मराठीतील कथा-कादंबऱ्या व नाटके यांतून बऱ्याच प्रमाणात चित्रण झालेले पाहावयाला मिळते. मराठी साहित्यात स्त्रीचे चित्रण कशाप्रकारे झाले आहे, त्यात काही फरक पडला आहे का, याचा आता विचार करू.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील स्त्रीच्या चित्रणाचे स्वरूप

१८५७ साली प्रसिद्ध झालेल्या बाबा पद्मनजी यांच्या ' यमुनापर्यटन ' या मराठीतील पहिल्या स्वतंत्र कादंबरीने वास्तववादी चित्रण करण्यास सुरुवात केली. विधवांचे दुःख मांडणे व धर्मप्रसार करण्याच्या उद्देशाने ही कादंबरी लिहिलेली असल्यामुळे स्त्रीजीवनाच्या विविधांगांचा म्हणावा तसा विचार साहजिकच या कादंबरीत झालेला आढळत नाही. मराठी साहित्यात स्वतंत्ररीत्या लेखन होऊ लागल्याचा काळ सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा होता. यापूर्वीच म. फुले यांनी स्त्री–शूद्रांदिकांना शिक्षण देण्याचे व विधवाविवाह घडवून आणण्याचे कार्य सुरू केले होते. शिक्षण नसल्यामुळे स्त्री व शूद्रांना येथील आर्यभटांनी छळले. ते शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना म्हणतात.

' विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली ।
नीतीविना गति गेली, गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले ॥ '

पुढे आगरकरांच्यानंतर आपटेसारख्या सुधारक वृत्तीच्या लेखकांनी आपल्या लेखनातून हिंदुधर्मातील दुष्ट रूढी व घातक परंपरांवर आघात करण्यास सुरुवात केली. पाश्चिमात्य मूल्य व इंग्रजी वाङ्मयाच्या अध्ययनाने हरी नारायण आपटे यांसारख्या कादंबरीकाराला स्त्री–स्वातंत्र्याचे महत्त्व पटू लागलेले दिसून येते. स्त्रीला मिळत असणारी अमानवी वागणूक व तिचा होत असणारा छळ पाहूनही या कालखंडातील लेखकांचे लक्ष स्त्री–जीवनाच्या चित्रणाकडे वळले असावे. हरिभाऊ आपटे यांच्या ' पण लक्षांत कोण घेतो ? ' या कादंबरीत संयुक्त कुटुंबपद्धतीमुळे व परंपराग्रस्त माणसांमुळे स्त्रीला किती दुःख सहन करावे लागते, याचे वेधक चित्रण येते. जबरी विवाह, जरठ-कुमारी विवाह व विधवेला मिळणारी अमानुष वागणूक याविषयीचे कादंबरीत प्रत्ययकारी चित्रण येते. स्त्रीला शिक्षण दिले तर तिचे दुःख

कमी होईल, हा विचार प्रामुख्याने कादंबरीत येतो. या दृष्टीने यमू मुंबईला जाऊन शिकते, सभेत व्याख्याने देते, असे थोडेसे चित्रण येते.

आपटेंनंतरच्या (१९२०–४७) या काळात आपल्या कादंबऱ्यांतून स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे व तिच्यात जागृती कशी होईल, या विचाराने स्त्रीचे चित्रण करणारे वा. म. जोशी, श्रीधर व्यंकटेश केतकर, भा. वि. वरेरकर, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, साने गुरुजी, ग. त्र्यं. माडखोलकर, पु. य. देशपांडे हे प्रमुख कादंबरीकार होत. या प्रमुख कादंबरीकारांबरोबरच विभावरी शिरूरकर, गीता साने इ. लेखिकाही दिसून येतात. या कालखंडात स्त्रीकडे सहानुभूतीने पाहिले जात होते. स्त्रियांत सुधारणा होऊन त्यांचे जीवनमान उंचवावे, अशी तळमळही या लेखकांच्या मनात होती; त्यामुळे या लेखकांनी सुधारणावादी दृष्टिकोनातून स्त्रियांची चित्रे काढलेली पाहावयास मिळतात. बालविवाह होऊ नयेत, हुंड्याची प्रथा अनिष्ट आहे, पुनर्विवाह व्हावा, स्त्री–पुरुषांत समानता असावी, प्रेमविवाह घडून यावेत, स्त्रीवर पुरुषांची जाचक बंधने असू नयेत, अशा प्रकारचे विविध विषय या लेखकांनी हाताळलेले दिसतात.

वा. म. जोशी यांच्या ' रागिणी ' (१९१५) या कादंबरीतील रागिणी ही सुशिक्षित असून, परंपरागत मूल्ये जोपासणारी, तर उत्तरा ' स्वत्वा 'चे भान झाल्यामुळे ती मूल्ये नाकारणारी अशी चित्रित होते. ' नवऱ्याला विनंती करूनही रागिणीला नवरा बरोबर घेऊन जात नाही. तिची होणारी हेळसांड बघून आनंदराव भैय्यासाहेबांची कानउघाडणी करतो. तेव्हा ती म्हणते, ' दादा, माझ्या दुर्दैवाला दोष दे. भलत्याला कशाला देतोस ?' रागिणी शिकलेली म्हणून वाईट पायाची आहे. तिचा नवरा मेल्यानंतर सासरा तिचा छळ करतो; पण ती मूकपणे सर्व सहन करते. ' या उलट ' स्त्रीला तिचे हक्क मिळत नसतील, तर तिने ते झगडून मिळविले पाहिजेत. प्रेमविवाह झाले पाहिजेत. केवळ दयेच्या दृष्टीने पुरुषांनी चांगले वागवू नये, तर मनापासून वागवावे. ' असे म्हणणारी निर्भीड व वादविवादात कुशल असलेली उत्तरा कादंबरीच्या शेवटी विवाहानंतर एका प्रसंगी म्हणते, ' आपल्या माणसाशी कोणी वाद करतं वेडे ? वाद न करता नम्रतेने प्रश्न विचारावेत, सेवा करीत राहावं, असंच मला वाटतं. ' एक प्रकारे ती पुरुषवर्गापुढे शरणागती पत्करताना दिसते. ' जर आपल्या ध्येयाच्या आड विवाहासारखा प्रसंग येत असेल, तर बायकांनी विवाह करू नयेत .' असे नलिनी म्हणते. यावरून पुरुषाप्रमाणे स्त्रीच्या मनात शिक्षणामुळे समाजाविषयी कार्य करण्याची इच्छा निर्माण होत होती, हेच वा. म. जोशी याना दाखवायचे होते, असे वाटते.

त्यांच्या ' सुशीलेचा देव ' या कादंबरीतली नायिका ' ध्येय हाच देव '

मानणारी असून, प्रचलित विवाहसंस्थेबद्दलची तिची मते बदललेली आहेत. 'नवरा दारूबाज असला आणि तो जर पोरा–बाळांच्या आयुष्याचा नाश करीत असला, तर असल्या नवरोबाला सोडून मुलाबाळांचं रक्षण केलं, तर पाप नाही; उलट पुण्य आहे.' 'पुरुषांनी पुनर्विवाह केला, तर तुम्ही व्यभिचार म्हणत नाही ना ? मग बायकांनाच निराळा न्याय का ?' असा रोखठोक प्रश्न विचारणारी सुशीला चित्रित होते. यानंतरची वा. म. जोशी यांची 'इंदू काळे व सरला भोळे' (१९३४) ही पत्रात्मक कादंबरी महत्त्वाची आहे. 'ध्येय गाठण्यासाठी स्त्रीने पुरुषाला सहकार्य करावे. त्याच्या आड येऊ नये. पुरुषाचे ध्येय ते तिचेही ध्येय समजावे, असे ती सांगते. व विनायकरावाच्या मागे चालते.' सरलाही सुईमागून दोरा जावा किंवा व्यक्तीमागून तिची सावली जावी तशी पतीच्या मागोमाग जाणारी भारतीय पतिव्रतांच्या मालिकेतील एक स्त्री आहे,'[१] हे म. ग. नातू यांचे मत योग्य वाटते. स्त्रीचे मन व भावना विचारात न घेता जोशीनी एकांगी चित्रण केल्यासारखे वाटते. आपले तत्त्वज्ञान वाचकांच्या गळी उतरविण्यासाठी जोशीनी आपल्या लेखनातील स्त्रिया रावविल्या आहेत, असे वाटते. स्त्रीने शिक्षण घेतले तरी आपले घर स्त्रीने सांभाळावे, हाच पारंपरिक विचार वा. म. जोशी सांगताना दिसतात. 'विचारलहरी' या पुस्तकात ते म्हणतात, 'स्त्रियांनी आधी घर आणि मग समाज ही वृत्ती स्वीकारावी, असं माझं मत आहे .. स्त्रियांना अप्रत्यक्ष कार्य करणे पुष्कळ शक्य आहे. पुरुषमंडळींना चांगले जेवायला वाढले तर तेदेखील मोठे समाजकार्य होईल.'[२] (पृ. ४४, ४७) यावरून पारंपरिकता व आधुनिक विचारात वा. म. जोशींची दोलायमानावस्था झालेली जाणवते; त्यामुळे स्त्रियांचे प्रश्न ते न्यायपूर्ण रीतीने मांडू शकले नाहीत.

विवाहपूर्व प्रेम हा श्रीधर व्यंकटेश केतकरांच्या बहुतेक कादंबऱ्यांचा विषय असतो. समाजशास्त्रीय अभ्यासातून त्यानी आपले लेखन केले. स्त्री–पुरुषातील प्रेमसंबंध, वैवाहिक जीवनातील विसंवाद, ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद, वेश्यावृत्ती व वेश्याकन्यांच्या उन्नतीचा प्रश्न, अशा प्रकारचे विषय त्यानी कादंबऱ्यांतून हाताळले आहेत. 'गोंडवनातील प्रियंवदा,' 'परागंदा,' 'गावसासू' व 'ब्राह्मणकन्या' इ. कादंबऱ्यांतून स्त्रीचित्रण आलेले आहे. 'पुरुषांशिवाय जगणे जमायचे नाही, म्हणून कालिंदी शिवरणप्पासारख्या व्यापाऱ्याची रखेल होऊन राहणे पसंत करते,' असे 'ब्राह्मणकन्या' कादंबरीत केतकर स्त्रीचे चित्रण करतात. येथेही पुरुषाच्या आधाराशिवाय स्त्रीला जगता येत नाही, हाच विचार प्रभावी झालाय, असे वाटते.

स्त्रियांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे लेखन करणारे भा. वि. वरेरकर हे एक या काळातील प्रमुख लेखक आहेत. 'बापाला हुंडा देता येत नाही, म्हणून बंगालमधल्या स्नेहलता नावाच्या मुलीने स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या केली.' या घटनेचा

त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. त्यातून त्यांचे 'हाच मुलाचा बाप' हे नाटक जन्मास आले. वरेरकरांचे सर्व साहित्य बोधवादी आहे. त्यांच्या साहित्यातील स्त्रिया धीट आहेत. 'विधवांना कुंकू लावण्याचा व माहेरचे नाव लावण्याचा अधिकार मिळावा,' असा आग्रह धरणाऱ्या स्त्रियांचे चित्रण 'विधवाकुमारी' या कादंबरीत येते. 'पुरुषापेक्षा आपण काही कमी नाही, हे दाखविण्यासाठी 'गोदू गोखले' कादंबरीतील नायिका वकील होते, तर आपल्या करारी स्वभावाने बाळासाहेबाना हतबल करणारी वेणू वेलणकर या कादंबरीची नायिका पाहायला मिळते. पांढरपेशा माणसाशी लग्न लावण्यापेक्षा खानावळी व हॉटेल उघडून स्वतंत्र जीवन जगणे व जमल्यास पुरुषाला सोडूनही जगणे पसंत करणाऱ्या स्त्रिया वरेरकर चित्रित करतात. 'पुरुषाच्या बरोबरीने मोटारीत बसून ड्रायव्हरसहित सर्वांची चेष्टा करणारी 'बिजली' म्हणूनच ते रंगवू शकतात. वास्तवातील स्त्रियांची चित्रे काढण्याची वरेरकरांची इच्छा असते; पण आपल्या आदर्शवादी कल्पनांत गुंतल्यामुळे काहीशी उदात्त वाटणारी स्त्रीचित्रे ते काढतात. अशा वेळी त्यांच्या स्त्री व्यक्तिरेखा एकारल्यासारख्या वाटतात.

ना. सी. फडके यानी प्रीतिभावनेचे आपल्या साहित्यातून विविधांगी चित्रण केलेले आहे. त्यांच्या साहित्यातील स्त्री केवळ तारुण्यसुलभ प्रेम करण्यासाठीच अवतरते; म्हणून ते सुंदर, गुणवान, कर्तृत्ववान व शीलवान अशा नायिकांची निवड करतात. प्रेमभंग झाला तरी या स्त्रियांना फारसे दुःख होत नाही. एकाकडून फसली गेली तरी दुसरा प्रेमवीर ती शोधू शकते. पुरुषामुळे आपले व्यक्तिमत्त्व कुंठित होतंय, याची स्त्रीला चिंता नसते. इतकेच नाही तर पुरुषाकडून बलात्कार होऊन गर्भ राहिला तर त्या खचत नाहीत. ते सर्व निस्तारून पुढच्या जीवनप्रवासाला त्या मोकळ्या होतात. प्रेम विषयात त्यांची कुटुंब अथवा समाजाकडून कुचंबणा होत नाही. त्या सुशिक्षित असून समाजकार्यातही सहभागी होतात. जीवनातील इतर दुःखांचा विचार करण्यापेक्षा त्या प्रीतीत दंग होऊन राहणेच पसंत करतात; पण 'आर्थिक स्वातंत्र्यानेच स्त्रीचे प्रश्न सुटतात असे नव्हे, तर ते अधिक व्यापक स्वरूपाचे आहेत व त्याप्रमाणे समाजाच्या नैतिक कल्पनाही बदलणे भाग आहे.' असा 'उद्धार,' कादंबरीत मोलाचा विचारही स्त्री–चित्रणाच्या अनुषंगाने फडके सांगून जातात.

फडके यांच्याप्रमाणे वि. स. खांडेकर हे (सानेगुरुजींना काहीएक प्रमाणात वगळता) बोधवादी व रंजकवादी लेखक म्हणावे लागतील. प्रेमाचा त्रिकोण नसला तरी रम्य चित्रण या दोघांच्याही साहित्यातून घडते. सानेगुरुजींचे सर्वच वाङ्मय संस्कारक्षम आहे. 'श्यामची आई' मध्ये स्त्रीचे प्रेमळ रूप यापलीकडे आपणास

दुसरे काही पाहता यायचे नाही; पण त्यांच्या १९४४ साली प्रसिद्ध झालेल्या 'रामाचा शेला' या कादंबरीत सरला जन्मल्यानंतर तिची आई मरते. पुढे तिचे लग्न होते; पण पंधरा दिवसांतच तिचा नवरा मरतो; म्हणून तिचा बाप (तिला 'पांढऱ्या पायांची' म्हणून) छळ करतो. अशा रूढीला बळी पडलेल्या स्त्रीचे चित्रण सानेगुरुजी त्या काळच्या वास्तवतेला धरून करतात.

आपल्या मनातील ध्येये व्यक्तिरेखांच्या माध्यमाने पूर्ण झालेली पाहण्यासाठीच की काय खांडेकर व्यक्तिरेखांचे चित्रण करतात, म्हणून त्यांच्या वाङ्मयातील स्त्रियाही एखाद्या ध्येयाने झपाटलेल्या तरुणाच्या प्रेमात पडतात; अशा कार्यात पुरुषाला उदासीनतेने घेरले, तर त्याची उदासीनता घालविण्याकरिता 'कांचनमृग' या कादंबरीमध्ये चित्रित केल्याप्रमाणे सुंदर व तरुण बालविधवा असलेली सुधा असते. तसेच उन्मादक सौंदर्य लाभलेली करुणाही हजरच असते. 'दोन मने-' मधील फिल्म अभिनेत्री बाळासाहेब (श्रीचा बाप) व श्री अशा दोन पुरुषांशी (बापलेकांशी) प्रेम करू शकते. ती सत्याग्रहाच्या ध्येयाने झपाटलेल्या 'श्री'च्या मागे शुटिंगच्या निमित्ताने खेड्यातही जाऊन राहते. माईला विधवावस्थेतच बाळासाहेबांकडून 'श्री' होतो; पण बाळासाहेब तिला त्या अवस्थेत टाकून जातात. तरी तिला त्याचे दुःख होत नाही. 'दरिद्री पण सामाजिक मूल्यांशी जागरूक ध्येयोन्मुख प्रियकर यांच्यात खांडेकरांची नायिका झुलत असते.'[५] हे डॉ. चंद्रकांत बांदिवडेकरांचे म्हणणे त्यांच्या बहुतेक सर्वच स्त्री–व्यक्तिरेखांना लागू पडणारे आहे. या दृष्टीने 'दोन ध्रुव'मधील वत्सलाचे चित्रणही लक्षात घेण्याजोगे आहे. ती रमाकांतशी विवाहबद्ध होते; पण तो तिला टाकून देतो. स्त्रियांचा पुरुषी वर्चस्व परंपरेला विरोध नसतो किंवा आपल्या परवडीबद्दल त्यांना खंत वाटत नाही. पुरुषांनी फसवलेल्या खांडेकरांच्या लेखनातील स्त्रिया सुखनैव समाजसेवेचे व्रत घेऊन जगतात; म्हणून खांडेकरांचे स्त्रीजीवनाचे चित्रण त्यांच्या आदर्शवादाने झाकाळून गेल्यासारखे वाटते. केवळ प्रणयिनीचे त्यागमय स्त्रीचे रूपच ते चित्रित करतात.

ग. त्र्यं. माडखोलकरानी परंपरागत पुरुषप्रधान विचारांशी मिळतेजुळते घेणाऱ्या स्त्रिया आपल्या कादंबऱ्यांतून चित्रित केलेल्या आहेत. त्यांच्या लेखनातील स्त्री सोशिक, समर्पणशील व त्यागी असते. पुरुषाच्या वर्चस्वाखाली राहून जगण्यात धन्यता मानणारी असते. 'भंगलेले देऊळ' या कादंबरीमधील अनू नवऱ्यापासून वेगळी झाली तरी तिला विवाहसंस्थेची गरज वाटतेच. 'शाप' कादंबरीमधील कांता 'स्त्रीने कोंडमारा सहन करून जगले पाहिजे' असे सांगते, तर 'चंदनवाडी-' तील रखमा नवऱ्याच्या माघारी मन मारून विधवेचे जीवन जगण्यापलीकडे दुसरे

काही करू शकत नाही. पुरुष लेखकांबरोबरीने या कालखंडात कृष्णाबाई (मुक्ताबाई दीक्षित), लक्ष्मीबाई टिळक, कमलाबाई टिळक, आनंदीबाई किर्लोस्कर, कुसुमावती देशपांडे इ. प्रमुख लेखिका लेखन करताना दिसून येतात. कृष्णाबाई यांच्या 'आमचे दास' या कथेत मॅट्रिक झालेली मुलगी लग्न न करण्याचा निर्णय घेते; पण पुढे तिचे एका प्राध्यापकाबरोबर लग्न होते; पण पुढे त्याच्यात तिला हुकूमशहाचा प्रत्यय येतो. पुढे ती बी. ए. होऊन समाजसेवा करते; पण त्याही ठिकाणी तिला खोटेपणाच दिसून येतो; म्हणून पुन्हा ती आपल्या पतीच्या घरी येते. अशी 'स्त्रीस्वातंत्र्या'ची हार दाखविली आहे. या कथेत पारंपरिक दृष्टिकोनातूनच स्त्रीचे चित्रण होते. त्यांच्या 'वर्षाव' या कथेतील प्राध्यापिका लग्नाबद्दल उदास आहे. 'एकदा ती अभ्यासात मग्न असताना एका प्राध्यापकाने तिला बाहुपाशात ओढले तरी ती प्रतिकार करीत नाही.' म्हणजेच एकटेपणाने राहण्यास स्त्री असमर्थ आहे, असाच विचार कृष्णाबाईना या कथेतून मांडावयाचा आहे असे वाटते.

१९३३ साली प्रसिद्ध झालेल्या विभावरी शिरूरकर (मालती बेडेकर) यांच्या 'कळचांचे निःश्वास' या कथासंग्रहात स्त्रियांची दुःखे वास्तवरीत्या व्यक्त झाली आहेत. स्त्रियांनी मन मारून का जगावे ? यांसारखे प्रश्न निर्माण करणाऱ्या त्यांच्या कथा आहेत. स्त्रीत्वाच्या नैसर्गिक इच्छा दडपून आई–बाप व बहीण-भावांची देखभाल करण्यासाठी अविवाहित राहिलेली एक प्रौढ कुमारिका विचारते, 'बाबांचा संसार माझा कसा होणार ?' त्यांच्या 'अविनाश' या कथेतील एक बाप मुलीच्या मनाविरुद्ध तिचे लग्न एका श्रीमंत माणसाशी लावून देऊन तिचे जीवन बरबाद करतो असे चित्रण येते. मुलगी शिकली तरीही कोणत्याही गोष्टीचा निर्णय ती अजूनही घेऊ शकत नाही, हाच विचार या कथेद्वारे शिरूरकर सांगतात.

अशा रीतीने या कालखंडातील लेखकांनी त्यांना भावेल तशी व जशी स्त्री दिसली, तसे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीला शिक्षण देऊन तिची जागृती घडवून आणणे व त्यायोगे तिच्यात हक्कांची जाणीव निर्माण करणे, हा या कालखंडातील लेखकांचा स्त्रीचे चित्रण करण्यामागे उद्देश दिसतो; म्हणून स्त्री-बद्दलच्या सहानुभूतीने या लेखकांनी प्रबोधनाचा हेतू ठेवून चित्रण केलेले आहे; पण मराठी लेखकाचे अनुभवविश्व मर्यादित आहे कुटुंबाच्या मर्यादेत राहूनच ते स्त्रीचे चित्रण करतात; म्हणून तिच्या मानसिकतेचे प्रभावी असे चित्रण या कालखंडात म्हणावे तेवढे येत नाही. स्त्रीचित्रणात म्हणावी तेवढी सखोलता येत नाही. केवळ रंजकतेने प्रेमात मग्गुल असणाऱ्या स्त्रियाच ते रंगवितात. स्त्रीच्या जीवनात कशी व का दुःखे निर्माण होतात, याचे हे लेखक चित्रण करीत नाहीत. डॉ. भालचंद्र फडके यानी म्हटल्याप्रमाणे 'मराठीत जगणारे वेगळे आणि लिहिणारे वेगळे,'[६] यामुळेच स्त्रीचे यांत्रिक पद्धतीने चित्रण झालेले पाहावयास मिळते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रीच्या चित्रणाचे स्वरूप

स्वातंत्र्यानंतर मराठी साहित्यात वेगवेगळ्या समाजांतून विविध विषयांवर लेखन करणारा लेखकवर्ग पुढे आला. स्वातंत्र्यामुळे भारतीयांच्या जीवनावरचे औदासीन्य दूर झाले होते. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराला मान मिळू लागला. यापूर्वी थोडेफार शिक्षण घेऊन कचेरीत व इतरत्र कामास जाणारी स्त्री आता पुरुषापेक्षाही अधिक शिक्षण घेऊन मानाच्या जागेवर काम करू लागली होती. विज्ञानाच्या प्रगतीमुळे व औद्योगीकरणामुळे एकंदरीत मानवी जीवनातच झपाटचाने बदल घडून येत होता. संततीनियमन, अर्थार्जन व समान संधी यांमुळे स्त्रीच्या जीवनातही लक्षवेधक बदल घडत होता. आपल्या जीवनाबद्दलची तिची जाणीवही तीव्र स्वरूपात व्यक्त होत होती, अशा या बदलत्या कालखंडात मराठी साहित्यात स्त्रीचे चित्रण कशा प्रकारे झालेले आहे, याचा आपण विचार करू. या कालखंडात गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, चि. त्र्यं. खानोलकर, उद्धव शेळके, जयवंत दळवी, भालचंद्र नेमाडे, रणजित देसाई इ. प्रमुख लेखकांनी लक्षात घेण्याजोगी साहित्यनिर्मिती केलेली आहे.

चि. त्र्यं. खानोलकर, श्री. ना. पेंडसे, जी. ए. कुलकर्णी व गो. नी. दांडेकर यांच्या साहित्यातील स्त्रिया त्यांच्या वाटचाला आलेल्या जीवनाबद्दल तक्रार करीत नाहीत. चि. त्र्यं. खानोलकर व जी. एं.च्या कथा–कादंबरीतील स्त्रिया नियतीचा भोगवटा म्हणून आपल्या जीवनात असे घडते, म्हणून गप्प राहतात. पुरुष आपला गुलामासारखा उपयोग करून घेतोय, याची जाणीव पेंडसे यांच्या लेखनातील स्त्रियांना होत नाही. आपल्या मालकाच्या सांगण्यावरून खुळचा वाटणाऱ्या रावजींशी लग्न करणारी व त्याच्या सांगण्यावरून त्याच्याकडे जाणारी राधा पेंडसे 'गारंबीचा बापू' या कादंबरीत चित्रित करतात, 'रथचक्र' या कादंबरीतील स्त्रीचे एका संन्यासी वृत्तीच्या माणसाशी लग्न होते. तो चार मुले झाल्यावर तिला सोडून जातो. तरीही ती त्याला जाब विचारीत नाही उलट घरच्या माणसांकडून तिचा छळच होतो.

वर उल्लेखिलेल्या लेखकांच्या लेखनातील स्त्रिया देहाने मजबूत असतात. भोगवस्तू म्हणूनच कादंबरीकाराने त्यांना आपल्या लेखनात प्रवेश दिलेला असतो. स्त्रियांच्या परवडीचे चित्र काढण्याऐवजी आपले लेखन रंजक व्हावे, या हेतूनेच त्यांच्या जीवनाचे चित्रण करतात. त्यांच्या देहाचे, पुरुषाबरोबरच्या समागमाचे चित्रण समरसतेने केलेले असते. या बाबतीत चि. त्र्यं. खानोलकरांच्या 'पाषाणपालवी' या कादंबरीतले स्त्रीचे चित्रण लक्षात घेण्याजोगे आहे. 'आपल्याशी प्रियकराने कसा

प्रणय केला, ते बाई आपल्या टी. बी.ने आजारी असलेल्या नवऱ्याला सांगते. 'वसंतरावाने माझ्या अंगावरची वस्त्रे फेडली आणि माझं शरीर तापून निघालं. माझे दोन्ही स्तन असे काही कुस्करले की...' असेच त्यांच्या 'अगोचर' या कादंबरीतही चित्रण येते. 'भक्तगण नंदिनीच्या देहावर नंगानाच घालीत होते. कुणी तिच्या झिंज्या ओढत होते, तर कुणी तिची चोळी फाडून तिचे घट्ट स्तन चुरगाळत होते.' अशा रीतीने पुरुषांच्या वखवखलेपणाला स्त्रिया बळी पडत होत्या, हे दाखविण्याचा खानोलकरांचा प्रयत्न असला तरी या स्त्रियांना रतिक्रीडेशिवाय कुठलेही काम नाही किंवा त्याच एका कारणाने त्यांची होरपळ होते, असे चित्रण येते.

दांडेकरांच्या 'शितू' या कादंबरीतली शितू तिचे दोन नवरे मेल्यामुळे पांढऱ्या पायांची ठरते, तर त्यांच्याच 'जैत रे जैत' कादंबरीमधली चिंधी नवरा बावळट निघाल्यामुळे दुसरे लग्न करते. कुण्यातरी साधूच्या जीवनात प्रेम फुलविण्यासाठी यशोदा 'कुणा एकाची भ्रमणगाथा' या कादंबरीमध्ये येते. दांडेकरांच्या लेखनातील या सगळ्या स्त्रिया परंपरेप्रमाणेच जगणाऱ्या आहेत.

ऋषीचे वेड बरे व्हावे, म्हणून आपले मन मारून त्याची सेवा करणारी शेवंती बा. भ. बोरकरांच्या 'भावीण' या कादंबरीत येते, तर फुलिया चेटकीण आहे, अशी अफवा उठवून तिच्याकडे त्याच भावनेने आदिवासी लोक बघतात. ते सहन न होऊन फुलिया डोहात झोकून घेऊन आत्महत्या करते. अशा रीतीने दुर्गा भागवत यांनी 'महानदीच्या तीरावर' या कादंबरीत स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराचे काही-एक प्रमाणात चित्रण केलेले आढळून येते.

व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्यातील स्त्री व्यक्तिरेखा ठाशीव स्वरूपाच्या असतात. वास्तवातल्या स्त्रीच्या जगण्या–भोगण्यात आणि त्यानी चित्रित केलेल्या स्त्रीव्यक्तिरेखांत तसा फरक वाटत नाही. 'शेकूला शेतीसाठी एक बैल नसतो, पेरणी तर करायला पाहिजेच; तेव्हा एका बाजूला एक बैल व दुसऱ्या बाजूला शेकूची बायको स्वतः जुंपून घेऊन पेरणी करतात. रात्रीच्या वेळी शेकू बायकोची दुखरी पाठ तुडवीत होता.' माडगूळकरानी ग्रामीण भागातील स्त्रियांची मोठी निर्भीड चित्रे काढली आहेत. 'सोनाराची पोर तिच्या पाठीमागे लागणाऱ्या बाहेरख्याली भगाचे गोड बोलून कोयत्याने नाक कापते आणि म्हणते, 'खेटरखाऊ द्वाडा, तारण्याताठचा पोरींची इज्जत घेतोस, नाही का ? गावच्या पाटलाचा पोरगा म्हणून वळूवानी गावात हिंडायची मुभा मिळाली व्हय तुला ?' असे चित्रण माडगूळकरांच्या 'असलं लई बघितल्यात' या कथेत येते.

१९६० नंतरच्या कालखंडातील स्त्रीच्या चित्रणाचे स्वरूप

१९६० नंतर मराठी वाङ्मयात घडलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे दलित

साहित्याची निर्मिती होय. आजपर्यंत प्रामुख्याने पांढरपेशा वर्गाच्या जीवनावर पांढरपेशीय लेखकच लेखन करीत असलेला दिसतो; पण या पुढच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे शिकलेला तळागाळातला माणूसही लेखन करू लागला. या वेळी आपल्या जगण्याचे वास्तव चित्रण करण्याची प्रथा सुरू झाली. जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, अरुण साधू, आनंद यादव, बाबूराव बागूल, यांसारखे सिद्धहस्त लेखक दीनदलितांचे तसेच स्त्रियांच्या व्यथा-वेदनांचे चित्रण करू लागले. तसेच जन्मामुळे दलित म्हणविणारे लेखकही आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांचे चित्रण करू लागले.

जयवंत दळवीनी 'कन्यादान,' 'पुरुष' तसेच विजय तेंडुलकरानी 'गिधाडे,' 'सखाराम बायंडर' व 'कमला' यांसारख्या नाटकांतून स्त्रीवर्गावर होणारा अत्याचार चित्रित केलेला आहे. दळवी 'चक्र' या कादंबरीतूनही दलित स्त्रीचे दिशाहीन जगणे चित्रित करण्याचा प्रयत्न करतात; पण त्यांच्यातल्या रंजक लेखकाने 'उकिडवी बसलेली अम्मा शरीराचा सारा भार हातातल्या दगडावर देऊन झटपट खोबरं-मिरच्यांचे वाटण करीत होती; त्यामुळे तिचा नितंब पसरट दिसत होता. पाटयावर वरवंटा सरकवण्यासाठी दिलेल्या प्रत्येक हिसक्याबरोबर तिचे गुबरे स्तन टक्टक् हालत होते.' (चक्र, पृ. ४२) असे वाचकांच्या लैंगिक भावना चेतावणारेच चित्रण करून ते स्त्रीत्वाच्या समस्यांना बगल देताना दिसतात. त्या मानाने मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील नलिनीचे व्यक्तिचित्र वास्तव वाटते. नलिनी सुशिक्षित असूनही सासरा, दीर व नवरा यांना द्यायचा तेवढा मान देऊन वागणारी; पण वेळप्रसंगी त्यांच्याकडून विपरीत घडले तर त्यांना खडसावणारी अशी स्वाभिमानी स्त्री चित्रित करण्यात कर्णिक यशस्वी झाले आहेत.

अरुण साधू यांच्या 'बहिष्कृत' या कादंबरीतली हेडमास्तराची मुलगी सुमित्रा एम. ए. होऊनही कुटुंबाच्या बंधनात अडकून झुरते. त्यांच्याच 'त्रिशंकू' या कादंबरीतली वैशाली पंडित आधुनिक आहे. ती स्वतंत्रपणे नोकरी करते. घटस्फोटित असलेली ही स्त्री वरून आनंदी वाटते; पण आपला बेगडी अहंभाव दडवून पुरुषाकडे ओढली जाते, असे चित्रण येते. आनंद यादव यांच्या 'नटरंग' या कादंबरीत नवरा तमाशात गेला असताना त्याच्या माघारी पुरुषाप्रमाणे राबून जगणाऱ्या द्वारकीचे चित्रण येते. तिची अभिलाषा धरून रात्री घरी येणाऱ्या शिर्पाला ती म्हणते, 'तसलं काय येरं करू नका. गुमान वस्तीला जावा. मांगोडघात कळलं, तर मांगोडा धरून बडवंल तुम्हास्नी.' (पृ. १३५) अशा कणखर बाण्याच्या द्वारकीलाही शेवटी सुरक्षिततेसाठी आपल्या आईवडिलांचा आसरा घ्यावाच लागतो.

बाबूराव बागुलानी आपल्या कथा व कादंबऱ्यांतून विविधांगांनी स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण केलेले पाहावयास मिळते. सासू, नवरा, मुलगा व समाजाकडून होणारा तिचा छळ व कोंडी, याचे ते प्रत्ययकारी चित्रण करतात. त्यांच्या 'सूड' या दीर्घकथेतील नायिका जानकी मुरळीची मुलगी असून तिच्या असाहाय्यतेचा फायदा घेऊन रसूल तिला बकरीला विकावे तसे विकतो. नायकिणीने तिला धंद्याला काढले; त्यामुळे तिचा अनेक रंगांच्या व वयाच्या पुरुषांकडून छळ होतो, पुरुषी अत्याचारामुळे तिला आपल्या स्त्रीदेहाची घृणा येते; म्हणून ती 'ज्वालाप्रसाद' बनून हिंडते; पण शेवटी एका साधूच्या संगतीत आल्यामुळे तिचे स्त्रीत्व उफाळून येऊन ती पुरुषाकडे ओढली जाते.

'रूनाची आई तमाशाचा धंदा सोडून देऊन संसाराला लागते. त्यानंतर रूना होते. 'अक्करमाशी' म्हणून त्यांची समाज हेटाळणी करतो; पण ती ताठ मानेने वागून रूनाचे शिक्षण पूर्ण करते,' असे बाबूराव गायकवाडांच्या 'झळ' या कादंबरीत चित्रण येते. वेश्येला संतती झाल्यानंतर पुढे समाजात तिची व संततीची कशी अवहेलना होते, त्यामुळे वेश्येला कोणत्या वेदना सहन कराव्या लागतात, याचे चित्रण अमिताभच्या 'सत्यवद जाबली' या कथेत येते. दलित स्त्री सवर्ण स्त्रीपेक्षाही दलित म्हणून तिच्या दुःख–व्यथांना पारावार नाही. या स्त्रियांना हरघडी संकटांना सामोरे जावे लागते, त्या अन्याय–अत्याचाराच्या दुहेरी बळी आहेत. एक म्हणजे पुरुषी अरेरावी व त्यांच्या वाटचाला आलेल्या हीन जातीमुळे तिचा दुसरीकडून छळ होतो. पोट भरण्यासाठी मानमरातब या गोष्टी तिला गुंडाळून ठेवाव्या लागतात. दलित आत्मकथनांतून असे अवमानित जिणे जगणाऱ्या अनेक स्त्रिया दिसून येतात.

'एखादी स्त्री पोट भरण्यासाठी कुंटणखान्यातील वेश्यांची पातळे धुण्यासाठी जाते तेव्हा एखादे गिऱ्हाईक या स्त्रियांची मागणी करते.' असे दया पवारांच्या 'बलुतं' या आत्मकथनात चित्रण येते. भटक्या जमातीत स्त्रियांना गुलामाप्रमाणे गहाण ठेवण्याची प्रथा असते; त्यामुळे स्त्रियांच्या अब्रूचे धिंडवडे निघतात, याचे चित्रण लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या आत्मकथनात येते. 'पहिला नवरा मारण्यासाठी अंगावर येताच त्याचा हात धरून धीटपणे त्याला म्हणते, 'वागवाचं अशीन तं नीट वागवा. नाईत मले नाई नांदायाचं तुमच्या घरी.' दुसराही नवरा पहिल्यापेक्षा वरचढ निघाला; त्यामुळे ती भावाबरोबर माहेरी येते व पुन्हा लग्न न करताच तशीच जीवन जगते.' असे चित्रण सुखराम हिवराळे यांच्या 'तीन नवरे' या कथेत येते.

दलित साहित्यात मात्र असे बंड करणाऱ्या बऱ्याच स्त्रीव्यक्तिरेखा पाहावयास

मिळतात. पतित स्त्रियांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न करणारी 'बेघर'ची नायिका काही काळ आपल्या संसारापासून वंचित होते. तिची अगतिकता, कुटुंबापासूनचे तुटलेपण मोठ्या ताकदीने शांता निसळ दाखवून देतात. आज स्त्री मुक्तीची चळवळ प्रभावी व्हावी, म्हणून 'मुलगी झाली हो'सारखी नाटके लिहून रंगभूमीवर आणली जाताहेत; पण खरंच स्त्रीमुक्ती झाली का? असा प्रश्न पडतो. १९६० नंतर मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात आत्मचरित्रे व आत्मकथने लिहिली जाताहेत. त्यात स्त्रियांच्या आत्मचरित्राचा भरणा अधिक आहे. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रा'पासून व पूर्वीही अनेक स्त्रियांनी आत्मचरित्र हा प्रकार हाताळला आहे; परंतु त्या सर्वांतून स्त्रीचे पारंपरिक जिणेच व्यक्त झालेले आहे. 'टिळकांच्या लहरी व विक्षिप्त स्वभावामुळे कितीही दुःख, त्रास झाला, तरीही आत्महत्या करावी वाटूनही केली नाही,' असे लक्ष्मीबाई सांगून जातात.

स्त्री आत्मचरित्र लेखिकांमध्ये स्नेहप्रभा प्रधान यांचे 'स्नेहांकित' व हंसा वाडकर यांचे 'सांगत्ये ऐका' ही आत्मचरित्रे काहीशी वेगळी आहेत. या आत्मचरित्रांतील स्त्रियांनी पुरुषांशी काही प्रमाणात विरोध दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. 'चित्रपटातल्या अफवा ऐकून हंसाबाईचा नवरा बंदरकर त्याना बेल्टने मारतो. त्याचा राग येऊन त्याच्यावर सूड उगविण्यासाठी त्या भरपूर दारू पितात. मराठवाड्यातल्या जोशीबरोबर त्याच्या घरी जाऊन राहतात. पण ती त्या घराच्या फाटकापर्यंत गेल्यामुळे जळणाऱ्या लाकडाने तिला मारतो.' अशा फजित जगण्याची कहाणी हंसा वाडकर सांगतात. कमावत्या स्त्रीची अवस्था ही पुरुष जनावरासारखीच करतो, हेच त्याना जणू सूचित करायचे आहे, असे वाटते. मल्लिका अमर शेखांनाही 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' या आत्मकथनात आपल्या स्वतंत्र वृत्तीमुळे नवऱ्याकडून कसा आपल्याला त्रास झाला, याचे परखड कथन केलेले आपणास पाहावयास मिळते.

सध्या गाजत असलेले 'आहे मनोहर तरी' हे सुनिता देशपांडे यांचे आत्मचरित्रही स्त्रियांना अंतर्मुख करायला लावणारे असे आहे. माधवी देसाई यांच्या 'नाच गं घुमा' या आत्मचरित्रातले 'स्त्रीचे जगणे' मनाचा थरकाप करणारे असे आहे. माधवीचे बालपणही सुखात गेले नाही. तारुण्य तर ओढग्रस्तीत गेलेले व प्रौढपणाचा कालखंड पराधीनावस्थेत. ज्याच्यावर विश्वास टाकून त्या आल्या, त्या पतीच्या घरीच त्याना परावलंबीपणाचे जिणे जगावे लागले. असे स्वातंत्र्य व पारतंत्र्य यांच्यामधील अवस्थेत झोके घेणारी स्त्री त्यानी प्रातिनिधिक रूपात रेखाटलेली पाहावयास मिळते.

या कालखंडातील स्त्री–जीवन चित्रणाकडे सामग्र्याने नजर टाकली, तर

स्वातंत्र्यानंतरच्या काळात स्त्रियांत झालेली ' स्वत्वाची ' जाणीव आता विस्तारली आहे, असे म्हणता येईल, पण या जाणिवेचा पुसटसा उल्लेख करून किंवा टाळून स्त्री-पुरुष संबंधात व स्त्रीचे लैंगिक जीवन भडकपणे रंगविण्यातच या लेखकांनी अधिक रुची दाखविली आहे, असे म्हणावेसे वाटते.

एकंदरीत मराठी वाङ्मयातील स्त्रियांच्या चित्रणाचा विचार करायचा ठरवले तर स्वातंत्र्यपूर्व कालखंडातली स्त्री शिक्षण घेऊन अडगळीच्या खोलीतून बाहेर आली; पण तिच्या मनावरचे गुलामीचे संस्कार गेले नाहीत. पुरुषाच्या अधिपत्याखाली राहूनच आपले स्वातंत्र्य ती शोधण्याचा प्रयत्न करू लागलेली दिसते. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडातील स्त्रीमध्ये समानतेचा हक्क मागण्याइतकी धिटाई आली. सभा-संमेलनांत भाग घेऊन आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांविरुद्ध ती दाद मागू लागली, तरी तिच्याकडे बघण्याचा पुरुषाचा पारंपरिक दृष्टिकोन काही बदलला नाही. पुरुषवर्गाने तिचे गरजेपुरते स्वातंत्र्य मान्य करून ' भोगवस्तू ' या पलीकडे तिला काही किंमत दिलीय, असे वाटत नाही. १९६० नंतर स्त्रीमुक्तीच्या चळवळीला जोर चढला; तरीही हुंड्याचा जो प्रश्न सुरुवातीच्या काळात होता, तो आता बिकट झालेला दिसतो. मुलीला हुंडा द्यावा लागतो म्हणून मुलीपेक्षा मुलगा झालेला फायद्याचा, हा विचार बळावला व त्यापोटी ' मुलीचा असलेला गर्भ मारण्या 'चा, एक प्रकारे स्त्रीजातीवर पाशवी अत्याचार करण्याचा प्रकार सुरू झाला.

लग्न होऊन हुंडा नसल्यामुळे हुंडीबळीमुळे स्त्रियांना जीवास मुकावे लागते आहे. आजची स्त्री सुशिक्षित, कितीही बुद्धिमान, कर्तृत्वशाली असली तरी आपले स्त्रीत्व, पावित्र्य टिकविण्याची ही जबाबदारी तिच्यावर पुरुषसंस्कृतीने लादलेली आहेच; म्हणून तिला घराबाहेर पडल्यास समाजाचे भय हे उरतेच. स्त्री ही पतीची निष्ठा व श्रेय यांत गुंतली की तिचे स्वतंत्र अस्तित्व राहत नाही. स्वतंत्र वृत्तीने तिने जगण्याचा प्रयत्न केला, की तिची सुरक्षितता धोक्यात येण्याचे भय तिला असते. अशा या गर्तेत पूर्वीसारखीच आजचीही स्त्री उभी आहे; म्हणून ' खऱ्या अर्थाने समाजघटक म्हणून कुटुंबात व समाजात स्त्रीचे आजही गौणच स्थान आहे. '[१०] हे डॉ. भालचंद्र फडके यांचे म्हणणे आजच्या स्त्रीजीवनावर व मराठी साहित्यातील बदलत्या स्त्रीचित्रणावरही प्रकाश टाकणारे आहे.

माणसातला अहंभाव नाहीसा होऊन द्वेषाची भावना नाहीशी झाली तर स्त्री-पुरुष समानतेचे व नव्या स्त्रीचे चित्रण यापुढील मराठी वाङ्मयात निर्माण झालेले पाहावयास मिळेल, असे मला वाटते. स्त्री असो की पुरुष, जोपर्यंत त्यांच्या मनात परस्परांविषयी दुजाभाव राहील, तोपर्यंत स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा

दृष्टिकोन पारंपरिकच असेल आणि तिचे साहित्यातील चित्रणही त्याच भूमिकेतून होत राहील, हेही येथे नमूद करावेसे वाटते.

संदर्भ ग्रंथ

१) मनुस्मृती, अध्याय ३–५६

२) एकनाथी भागवत, ७–५९८ व ८–१२५

३) विवेकाची गोष्टी, पृ. ६९

४) विचारलहरी, पृ. ४४, ४७

५) मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा, पृ. ५९

६) मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, प्रास्ताविक पृ. ५९

७) कित्ता, पृ. २४



९

वाटा-आडवाटा : दलित कथेतील वेगळी वाट

' बेनवाड, ' ' येळकोट, ' ' वारसदार ' या कथासंग्रहांनंतरचा ' वाटा-आडवाटा ' हा वामन होवाळ यांचा चौथा कथासंग्रह होय. वामन होवाळ हे दलित साहित्यातीलच नव्हे तर एकूण मराठी साहित्यातील एक चांगले कथाकार आहेत. त्यांच्या ' येळकोट ' या कथासंग्रहाला राज्य पुरस्कार देऊन महाराष्ट्र सरकारने त्यांचा गौरव केलेला आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव व बाबूराव बागूल यांच्यानंतर दलित साहित्यात कसदार लेखन करणाऱ्यांत उत्तम बंडू तुपे, अमिताभ, सुखराम हिवराळे, बाबूराव गायकवाड, अविनाश डोळस व वामन होवाळ या कथाकारांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्यात वामन होवाळ यांचे कथालेखन विविधांगी व सातत्याने सुरू आहे.

दलित साहित्याचा उदय होऊन पंचवीस वर्षे होऊन गेली आहेत. आज ते काहीएक बाबतींत प्रगतावस्थेत आहे. वेगवेगळ्या समाजगटांतून व जातींमधून लेखकवर्ग लेखन करीत आहे. दलित लेखकांच्या लेखनामुळे मराठी साहित्यात विविध जीवनानुभवांची भर पडत आहे, ही आनंदाची गोष्ट म्हटली पाहिजे. ' वाटा-आडवाटा ' या कथासंग्रहातील बहुतेक कथा मानवी जीवनातील वृत्ती-प्रवृत्तींवर आधारलेल्या आहेत. या कथांतून ग्रामीण भागातील माणसाच्या जीवनाचे

वास्तव चित्रण होवाळ करतात. थापा मारणारी, दुसऱ्यावर विश्वास ठेवणारी, हातोहात फसविणारी, लबाड बोलणारी व कुणावर सूड उगविण्यासाठी अस्वस्थ होणारी अशा अनेकविध प्रवृत्तींची माणसे सदर कथासंग्रहात आपणास भेटतात. ही माणसे त्यांच्या बोलण्या–वागण्यातून होवाळ साक्षात उभी करतात; म्हणून ठसठशीत व्यक्तिचित्रण हे या कथांचे एक वैशिष्ट्य आहे.

ग्रामीण भागातील माणूस रोखठोक बोलतो. सहज बोलतानाही त्याच्या तोंडून शिवी बाहेर पडते. कुणाचा राग आला म्हणून तो शिवी देत नाही, तर त्याच्या बोलण्याची ढबच तशा प्रकारची असते. या दृष्टीने ' सोयरिक ' या कथेतील चित्रण लक्षात घेण्याजोगे आहे. गाडी आली तरी ताराबाईचा नवरा लवकर उठत नाही. ' हां, जाऊ या की ! ' म्हणत रेंगाळतो. तेव्हा ताराबाई म्हणते, ' ह्राड सदान्‌कदा म्हव पेल्यासारखं ! ' त्यावर काकी विचारते, ' कोन हाय गं तारा ?'

' कपाळाचं कुक्कू ! अन् दुसरं कोन ? चलाखी अशी अंगातच नसते ह्यांच्या. न्हेमी न्हेमी रेड्यावर बसल्यासारखं ! अवं चला ! ' असे बायको नवऱ्याला अपमानित केल्यासारखं बोलते; पण ग्रामीण भागात अशा बोलण्याचा खोलपणा कोणी विचारात घेत नाही.

भोळेभावडे माणूस बघून गोड गोड बोलणारी व घरची माहिती काढून घेऊन फसवणारी इरसाल माणसे खेड्यापाड्यांतही असतात, याचे चित्रण सदर कथेत येते.

या संग्रहातील बहुतेक कथा दलितांच्या जीवनावरच्या आहेत; पण दलित जीवनाचेच चित्रण करण्याच्या हेतूने या लिहिल्या आहेत, असे वाटत नाही; म्हणून या कथांतून चित्रित होणाऱ्या माणसांच्या ठिकाणी अकारण ऊरबडवेपणा, आक्रस्ताळेपणा, बंडखोर वृत्ती किंवा विद्रोही जाणीव प्रामुख्याने दिसून येत नाही. इतर माणसे जशी असावीत तसेच होवाळ दलित माणसांचेही चित्रण करतात; म्हणूनच या संग्रहातील कथांमधून माणसांच्या जातीची किंवा त्या त्या समाजाची काहीएक वैशिष्ट्ये आढळून येत नाहीत, हे वामन होवाळांचे वेगळेपण येथे मुद्दाम नोंदवावेसे वाटते.

स्वार्थासाठी भांडणाऱ्या भावांचे व त्यांच्या युक्त्या–प्रयुक्त्यांचे ' खोडा ' या कथेत चित्रण येते. आईवडिलांची किंवा भावांची भीडमूर्वत न ठेवणाऱ्या माणसांचे होवाळ प्रत्ययकारी चित्रण करतात.

' आम्ही सतत ह्या बाळूदादाला अन् महादूला शेतीसाठी पैसा पुरवीत होतो. त्यांच्या मुला–बाळांना कापडलत्ता पाठवीत होतो. ' शामूअण्णा म्हणाला.

'कुणी ? आमी कवा बॉटभर चिठ्ठी लिहून तरी तशी मागणी केली होती का ? ' बाळूदादा म्हणाला. एवढेच म्हणून तो थांबत नाही तर, ' घरदार, जमीन, भांडीकुंडी त्याचं समान चार हिस्सं करा; पण त्याबरोबरच शामराव अन् रामराव ह्यांना मिळालेल्या फंडाच्या रक्कमेचंही समान चार भाग करा. तरच हे वाटप होईल; न्हायतर न्हाय ! ' असे सांगतो, यावरून खेडेगावातील बेरकी माणसांचे दर्शन घडते.

जेथे जाईल तेथे मेहुण्याचे नाते सांगून वेळ मारून नेणारा, कुणाचे ताट, कुणाची वाटी तर कुणाचा टॉवेल लंपास करणारा भुरटा चोर ' नाना 'चे व्यक्तिचित्र ' धडा ' या कथेत येते. माणसे सारासार विचार न करताच वागतात व आपलेच नुकसान कसे करून घेतात किंवा दुसऱ्याला धडा शिकविण्याच्या फंदात पडून आपणच कसा धडा शिकतात, याचे चित्रण सदर कथेत वामन होवाळ प्रत्ययकारीपणे करतात.

खेडेगावातील गटबाजीच्या राजकारणात दलितांची कोंडी करण्याकडे गावातील पुढाऱ्यांचा कल असतो. सर्वसाधारण ग्रामीण भागात अशा प्रकारचे चित्र पाहावयास मिळते; पण याला अपवाद या संग्रहातील ' पाटीलकी ' ही कथा वाटते. सवर्ण तात्याबा यादव त्याच्याविरुद्ध असलेल्या पार्टीला शह देण्यासाठी सीताराम नावाच्या अस्पृश्य माणसाला पाटील म्हणून निवडून आणतो व त्याला गोड गोड बोलून पाटीलकीची सारी सूत्रे तोच चालवितो; त्यामुळे सीताराम केवळ नावाचा पाटील उरतो. सीतारामच्या बायकोकडून राशन दुकान चालविण्याच्या निमित्ताने दर महिन्यास पगार तात्याबाच उपटतो. हे बरेच दिवस चालल्यानंतर सीतारामला तात्याबाची लबाडी समजते. थोडासा सुशिक्षित असलेला सीताराम पाटलाच्या दहा-बारा एकर जमिनीचा उतारा आपल्या नावावर लावून घेऊन त्याची बोटं त्याच्याच डोळ्यांत घालतो, असे प्रत्ययकारी चित्रण येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीमुळे खेडेगावातील सुशिक्षित दलित माणूसही डोळसपणे दलितेतर समाजातील माणसाला जशास तसे वागवू शकतो, हे होवाळांनी सदर कथेत खुबीने दाखवून दिले आहे.

जातधर्म वेगवेगळे असले तरी माणसाच्या ठिकाणच्या प्रवृत्ती सर्वसाधारणपणे सारख्याच असतात. खोटी प्रतिष्ठा व एखाद्या भ्रमात राहून दलित माणसे आपापसांत वैरभाव ठेवून वागतात व पोलीस ठाण्यात जाऊन आपले हसे कसे करून घेतात, याचे चित्रण ' नोंद ' या कथेत येते. समाजसेवक म्हणवून घेणाऱ्या दत्त साळवे याची मुलगी व त्याच्या जवळपास राहणारा व दारूचा अड्डा चालविणारा ' इंजा ' यांचे प्रेमसंबंध असतात; त्यामुळे दत्तू साळवेची मुले इंज्याला मरेस्तोर

मारतात. इंज्या व इन्स्पेक्टर जगदाळे यांचे आपुलकीचे संबंध असतात; त्यामुळे जगदाळे या प्रकरणी दत्तू साळवे यांच्या बायकोचे व इंज्याचे जुजबी जबाब नोंदवून घेऊन प्रकरण निकालात काढतात; त्यामुळे दुखावलेला दत्तू साळवे अतिशय नाराज होऊन त्याच्या ओळखीच्या डी. एस. पी. खाडे यांच्या निदर्शनास वरील गोष्ट आणतो; पण जगदाळे यानी दोन्ही बाजूंच्या समजदार व्यक्तींच्या जबानीने प्रकरण निकालात काढल्यामुळे डी. एस. पी. खाडेही इन्स्पेक्टर जगदाळे याना ताकीद देऊ शकत नाहीत. त्यामुळे दत्तू साळवेप्रमाणेच त्याच्याच जातीतला इन्स्पेक्टर वानखेडेही हिरमुसला होतो, याचे सदर कथेत होवाळ स्वाभाविक वाटावे असे वर्णन करतात. अर्थपूर्ण व खटकेबाज संवादांमुळे कथेतील व्यक्तिरेखा लक्षात राहतात.

आपल्या मुलाने डॉ. आंबेडकरांसारखे शिकावे, आपल्यासारखे सनई वाजवून देव जागवणं करून लाचारीने जगू नये, यासाठी राघूदादा आपल्या मुलासह बौद्ध धम्माची दीक्षा घेतो व वंशपरंपरागत चालत आलेली सनई देवळातील खुंटीला टांगून ठेवतो; पण त्यामुळे पाऊस पडत नाही, असा गावकऱ्यांचा समज होऊन ते राघूदादास मारहाण करतात. सनईने देव जागविल्यामुळे नाही तर माझ्या नेकी-पणामुळे उद्या पाऊस पडेल, असा राघूदादा गावकऱ्यांना विश्वास देतो व दुसऱ्या दिवशी खरोखरच मुसळधार पाऊस पडतो. पुन्हा काही वर्षांनंतर तसेच आवर्षण पडते. तेव्हा गावकरी राघूदादास सनई वाजवून देव जागविण्याचे आवाहन करतात, तरीही राघूदादा आपल्या निश्चयापासून ढळत नाही. 'तू हलका महार म्हणून इतर महार तुला दूर ठेवतात व तुझ्या मुलाला मुलगी देत नाहीत. मग तू बौद्ध होऊन काय उपयोग ?' असे गावकरी म्हणताच, 'आमच्या पिढ्यान्‌पिढ्या गेल्या; पण आमी देवी आन् सनई उशिरा का होईना, टाकून दिली नव्हं ? आमच्या मंडळींचंही तसंच हाय ! जरा उशिर का होईना, त्यांच्यात बदल घडंल... मला पुन्हा त्या देवी अन् कांडपिपाणीकडं जायला सांगू नका. मला ते जमायचं न्हाय !' असे कथेतील नायक राघूदादा गावकऱ्यांना ठणकावून सांगतो.

एक प्रकारे परंपरा नाकारणाऱ्या व्यक्तीचेच राघूदादा सौम्य हे व्यक्तित्व होवाळांनी या कथेत चित्रित केले आहे. कथेतील निवेदन संथ असले तरी मनाची पकड घेणारे आहे. प्रक्षोभाची ठिणगी पडणार असे वाटत असतानाच सारे वातावरण शांत करण्याची किमयाही होवाळांच्या लेखणीत आहे. अस्पृश्यतेमुळे दलितांच्या वाट्याला येणारी दुःखं, त्यांच्यावर होणारा अन्याय–अत्याचार व त्यांची होणारी कोंडी इ. प्रकारचे वर्णन होवाळानी या कथासंग्रहातून अभिनिवेशाने केलेले नाही. या कथासंग्रहातील दलित माणूसही दलितेतरांसारखाच खाऊन–पिऊन सुखी व चार पैसे बाळगणारा आहे. इतरांसारखीच दैनंदिन व्यवहारातल्या अडचणींबद्दलची चिंता त्यालाही वाटते. या दृष्टीने 'हातचा मळ' ही कथा लक्षात घेण्याजोगी आहे. घर

आणि ऑफिस एकत्र असल्यामुळे तंग झालेली सावळेबाई कासेगावला बदली व्हावी, म्हणून मंत्रालयात वशिला घेऊन जाते. त्या वेळी तिच्या मनाची होणारी तगमग कथेत चित्रित केलेली आहे.

या कथासंग्रहात चित्रित झालेली माणसे ही दलित असण्यापेक्षा प्रथमतः ती मनुष्य म्हणून येतात. (ही जाणीव होवाळांनाही असावी ?) म्हणून दलित माणसांच्या वाटचाला आलेल्या समस्या ह्या दलित जीवनाच्या संदर्भातल्या फारशा नसतात. त्या सामान्य माणसांच्या जीवनातही घडू शकतील, अशा असतात. क्वचित प्रसंगी दलितांची दुःखं, त्यांच्या आकांक्षा ' पाटीलकी, राघूदादा, हातचा मळ व ढवाळं ' यांसारख्या कथांतून आल्यासारखी वाटत असल्या, तरी त्यातून उगीचच आक्रोश, आक्रस्ताळेपणा व बंडखोरपणा दाखविला जात नाही. होवाळांची कथा ग्रामीण जीवनात घडत असल्यामुळे खेडूत माणसांचा राग, रुसवा व रांगडेपणा घेऊन ती आकार घेते. प्रेमळ माणसाप्रमाणे वाचकांना बरोबर घेऊन जाते. एखादा प्रसंग, एखादा विचार ती सावकाशपणे मनावर बिंबवते व मनाला प्रसन्न करून जाते. दलित जीवनावरील कथांच्या वाचनानेही मन प्रक्षुब्ध होत नाही, उलट एखादा नवा विचारही कथा कुशलतेने वाचकांच्या गळी उतरविते.

काही कथांतून दलित जाणिवाही व्यक्त झालेल्या आहेत; पण अशा कथांचे मूल्यही वरच्या दर्जाचे आहे. गढूळ पाण्याखालीही स्वच्छ पाण्याचा झरा असावा, तसा होवाळांच्या दलित कथेतील नकार येतो. ' आपल्या बापाप्रमाणे पोतराजकीचं जीवन जगायला नको; पण बापाचे मनही दुखवायला नको (दुखवले तर संघर्ष अटळ. तो होवाळांना टाळायचा आहे. हेच बुद्धाचे व बौद्ध धम्माचे मुख्य तत्त्वज्ञान आहे.) म्हणून हनमा बापाच्या मनाखातर एक दिवस पोतराज होऊन शंकर-नानाच्या सुनांना दमछाक होईपर्यंत नाचवतो व बापाची इच्छा पूर्ण होताच ' आईच्या नावावर भीक मागायचं सोडून दे. आजपास्नं सारा तमाशा बंद ! आजच सारं कॅस भादरून काढतो. तू म्हणत असशील, तर तुजंबी केस काढून टाकतो. तसं करायचं नसलं, तर मी माझ्या मार्गाने (बौद्ध धम्माच्या) जातो. ' असा काहीसा समंजस नकार तरुण पिढीतील हनमाकडून व्यक्तविला जातो. आशय-घन, प्रवाही व अर्थवाही असे ठसठशीत संवाद तसेच मोजक्या शब्दांत व्यक्तीचे अंतःकरण उलगडून दाखविण्याचे सामर्थ्य हे होवाळांच्या भाषाशैलीचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

' वाटा–आडवाटा ' या कथेद्वारे वामनरावांच्या ठिकाणी असलेल्या गोष्ट सांगण्याच्या कलेचा प्रत्यय येतो. ' केशव कुलकर्णी सारखा विचार करीत होते, ' या वाक्याने मनाला ओढ व उत्कंठा लावणारी सुरुवात होते. साधीसोपी वाक्य-

रचना, मोजकेच प्रसंग व घटना यांनी ही कथा मनाची पकड घेते. माणसाच्या जीवन जगण्याच्या तऱ्हां (वाटा–आडवाटा) चा मनावर ठसा उमटत जातो. शेवटी आंतरजातीय विवाहाने कथेचा शेवटचा भाग संपत असला तरी नवविवाहितांच्या मानसिक आंदोलनात ही कथा संपते. सध्याच्या परिस्थितीनुसार तरुण पिढीने मनावर घेतले तर दलित–दलितेतर यांच्यातील भेद कमी होण्यास मदत होईल, अशा प्रकारचा आशावाद या कथेतून व्यक्त केला जातो.

या संग्रहातील बहुतेक कथांतून बोधवादी सूर जरी निघत असला, तरी समाजजागृतीसाठी आजही त्याची गरज आहे, हे तितकेच खरे ! होवाळानी अनेक विषयांना समर्थपणे स्पर्शच केला आहे, नव्हे तर त्या विषयांचे त्याना उत्तम आकलनही असलेले जाणवते. हा कथासंग्रह दलित साहित्यातच नव्हे तर एकंदर मराठी कथासाहित्यातही मोलाचा ठरणारा आहे; म्हणून आजपर्यंतच्या दलित कथासाहित्यात या संग्रहाने स्वतःची अशी एक वेगळी वाट निर्माण केली आहे, असे म्हणावेसे वाटते.

REFBK-0026938

मराठी साहित्यात एक दमदार कवी, कथाकार, कादंबरीकार व नाटककार म्हणून डॉ. बाबुराव गायकवाड याना ओळखले जाते. त्यांच्या ' दृष्टिक्षेप ' या समीक्षा-ग्रंथाने त्याना उल्लेखनीय समीक्षक म्हणून मान प्राप्त करून दिला आहे.

डॉ. गायकवाडांचे ' आकलन ' हे समीक्षात्मक लेखनाचे दुसरे पुस्तक. याही ग्रंथात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक वैशिष्ट्ये स्पष्ट झाली आहेत. मुळातच त्यांची वृत्ती आस्वादकाची आहे; पण आस्वाद घेत घेतच एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन ते वस्तुनिष्ठपणे, तटस्थतेने व अस्मितेने करताना दिसतात; मग हे आकलन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या थोर विचारवंताच्या जीवनकार्याचे असो अथवा मराठी साहित्यातील एखाद्या वाङमयीन दृष्टिकोनाचे असो; त्यात त्यांच्या सम्यक् दृष्टीचा व चिंतनशील वृत्तीचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही.

प्राचीन व अर्वाचीन साहित्य तसेच दलित साहित्याचे त्यांचे आकलनही सारखेच आहे. या ग्रंथातून त्यांच्या समतोल वृत्तीचे आकलन झाल्याशिवाय राहणार नाही. मराठी अभ्यासकांसाठी डॉ. बाबुराव गायकवाड यांचा हा समीक्षा-ग्रंथ उपयुक्त ठरेल, यात संदेह नाही.